म. ग्रं. सं. ठाणें

विषय
चरित्र

ग्रहालय क्रमांक
६
४००

लेखक वि. ना. भागवत

सन
१८…

पुस्तकाचें नांव लार्ड राबर्ट क्लैव

४००

६
(चरित्र)

सं.च.
९८
नं. २०८
Presented to the Marathi Grantha Sangrahalaya by

हरि शिवराम शृंगारपुरे.

खासगी लायब्ररी.

नंबर २८४

(९८८) ५१९८

सं.क्र. २८
२०/८/४९

# Dakshiná Prize Book Series.

## No. 7.

---

# LIFE OF LORD ROBERT CLIVE,

FROM LORD MACAULAY'S ESSAY.

TRANSLATED BY

VINÁYAK NÁRÁYAN BHÁGAVAT.

REVISED BY

VISHṆU PARASHURÁM SHÁSTRÍ PAṆḌIT.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे सन

**PRINTED AND PUBLISHED**

WITH THE PERMISSION OF

**HE DIRECTOR OF PUBLIC INSTRUCTION AND THE PRESIDENT OF THE DAKSHINÁ PRIZE COMMITTEE**

BY

HE PROPRIETORS OF THE "INDU-PRAKASH" PRESS.

Bombay:

1873.

---

*(Registered under Act XXV. of 1867.)*

*Price Annas Eleven.*

Bombay:
PRINTED AT THE "INDU-PRAKASH" PRESS.

दक्षिणा प्रैज कमितीनें बक्षिसें दिलेल्या
ग्रंथांची माळा.
नंबर ७.

# लार्द राबर्त क्लैव

याचा वृत्तांत.

हा ग्रंथ

लार्द मकाले यांच्या इंग्रजी निबंधावरून
विनायक नारायण भागवत
यांनीं लिहिला

तो
मे. दैरेक्तर आफ् पब्लिक इनस्त्रक्शन व मे. दक्षिणा
प्रैज कमितीचे अध्यक्ष यांच्या आज्ञेवरून
विष्णु परशुराम शास्त्री पंडित
यांनीं तपासला व
मुंबईत
इंदुप्रकाशाच्या मालकांनीं आपल्या छापखान्यांत
छापून प्रसिद्ध केला.

इसवी सन १८७३.-शके १७९५.

(हा ग्रंथ १८६७ च्या २५ व्या आक्ताप्रमाणें नोंदला आहे.)

किंमत ११ आणे.

# प्रस्तावना.

---

या भरतवर्षांतील प्रस्तुतच्या सार्वभौम ब्रितिश सरकारच्या राज्याचा पाया या देशीं कोणत्या ठिकाणीं, कोणत्या वेळीं, कोणत्या पराक्रमी पुरुषाच्या हातून व हा देश कोणत्या स्थितींत असतां घातला गेला; त्या गोष्टीस एतद्देशीय कोणते लोक साधन झाले; तो पाया घालणारानें साम, दान, भेद, दंड यांतून कोण कोणत्या उपायांची योजना केली होती इत्यादि गोष्टींचें ज्ञान एतद्देशीय लोकांस अत्यंत आवश्यक आहे. पश्चिमेकडील पांच हजार कोशांवरील युरोपांतल्या इंग्लंद[1] देशाहून कांहीं थोडयाशा व्यापारी लोकांनीं या अति विशाल देशांत येऊन एका शंभर वर्षांत सर्व देशच पादाक्रांत करून टाकला, त्यावरून या चमत्कारिक स्थितीस पुढील दोन गोष्टींपैकीं कोणती तरी एक गोष्ट अवश्य कारण असली पाहिजे असें होतें. त्या दोन गोष्टी या:—

या देशाचे लोक शारीर अथवा मानसिक सामर्थ्यानें किंवा दोहोंनींही युरोपांतील लोकांपेक्षां कमी असून त्यांत एकी नसावी. अथवा हे व्यापारार्थ आलेले ब्रितिश वगैरे युरोपियन लोक तरी शरीरानें अथवा मनानें

---

१. याखेरीज युरोपांतल्या फ्रान्स, पोर्तुगाल, हालंद या देशांतील लोकांनींही येथें व्यापारार्थ येऊन आपआपल्या राज्याचे पाये घालण्याचे इलाज चालविले होते.

किंवा दोहोंनींही विशेष समर्थ असून त्यांत एकी असावी. या दोहोंपैकीं एक गोष्ट असल्यावांचून थोड्याशाच लोकांनीं आरंभीं मिळविणें व मिळविलेला जय वाढत जाऊन अखेरीस एक शतकाच्या आंतच सार्वभौम पद प्राप्त होणें हें अशक्य आहे. तर या दोन गोष्टींपैकीं ब्रितिशांस भारतवर्षीय सार्वभौमपदप्राप्तीविषयीं कोणती गोष्ट साधक झाली व तीस आणखी अवांतर कोणकोणत्या गोष्टी साक्षात अथवा परंपरया साधक झाल्या हें सप्रमाण समजण्यास हिंदुस्थानांत ब्रितिश राज्याचा स्थापक जो लार्ड क्लैव त्याच्या वृत्तांताच्या यथार्थ माहितीप्रमाणें दुसरीं थोडींच साधनें आढळतील. शिवाजी राजा जसा या देशांत मराठ्यांच्या राज्याचा आद्य स्थापक होऊन गेला तसाच लार्ड क्लैव हा ब्रितिशांच्या राज्याचा आद्य स्थापक होऊन गेला. एतद्देशीय लोकांस शिवाजीराजाचें चरित्र थोडें बहुत तरी माहीत असतें, तसेंच लार्ड क्लैव याचें चरित्रही माहीत असणें फार जरूर आहे. पीतर धी ग्रेत, वाशिंग्तन, नेपोलियन बोनापार्त यांसारख्या परदेशी पराक्रम करणाऱ्या पुरुषांचीं चरित्रें जर आह्मांस उपयुक्त आहेत तर आमच्याच देशांत पराक्रम करणारा लार्ड क्लैव याचें चरित्र आह्मांस किती अधिक उपयुक्त होईल बरें. खेरीज मोठ्या पुरुषाच्या प्रसंगविशेषाच्या वर्तनांत जे कांहीं गुणदोष पाहावयाचे ते त्यासारखाच दुसरा मोठा एखादा पुरुष त्याप्रकारच्या प्रसंगीं कसा वर्तला वगैरे विचार मनांत आणून व त्या वेळेचें व ते ज्या कामांत गुंतलेले असतात त्या कामाचें महत्त्व मनांत आणून पाहिले

पाहिजेत. या गोष्टीकरितांही लार्ड क्लैव याचा वृत्तांत अत्यंत उपयुक्त आहे.

रा. रा. विनायक नारायण भागवत, एल्फिन्स्तन कालेजांतील माजी विद्यार्थी व हल्लीं कांठेवाडांत लिमडी संस्थानांत कारभारी आहेत त्यांनीं, लार्ड मकाले यांनीं इंग्लिश भाषेंत जो लार्ड क्लैव याचा वृत्तांत लिहिला आहे त्याचें भाषांतर करून तें कांहीं वर्षांवर "दाक्षिणा प्रैज कमिती" हीस नजर केलें होतें. तें त्या कमितीस पसंत होऊन त्याबद्दल भागवत यांस योग्य बक्षीस देण्यांत आलें.

भाषांतरकर्त्यानें मूळग्रंथांतला कितीएक ठिकाणचा जो भाग एतद्देशीय लोकांस समजण्यास दुर्बोध व अनुपयुक्त असा होता तो गाळून टाकला आहे.

विष्णु परशुराम शास्त्री पंडित.

मुंबई, ता. १८ दिसेंबर
१८७३ इसवी.

क्र. ९८ ... १२०९

# लार्ड क्लैव याचा वृत्तांत.

रावर्त क्लैव ह्मणजे हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्याचा स्थापक पुरुष हा इंग्लंदामध्यें श्रापशैर प्रांतांत मार्केतद्रेतन या नांवाच्या खेड्याजवळ एक वाडी होती तेथें इसवी सन १७२५ सांत सप्तंबर महिन्याच्या २९ साव्या तारखेस जन्मला. तो जेथें जन्मला तें त्याच्या वडिलांचें वतनी गांव होतें; तें विशेष मोठें होतें असें नाहीं. तेथें याचे वडील बाराव्या शतकापासून राहिलेले होते. पहिल्या जार्ज राजाच्या वेळीं या पुरातन वतनाचा मालक मि. रिचर्द क्लैव हा होता. हा मनुष्य साधा होता. याच्या अंगीं विशेष बुद्धि किंवा युक्ति होती असें दिसत नाहीं. हा लहानपणीं कायदे शिकला होता, आणि मोठा झाल्यानंतर वकिलीचा धंदा करून, व आपल्या लहानशा वतनवाडीचा कारभार पाहून कालक्षेप करीत असे. यानें मांचेस्तर येथील ग्यासकिल्ल या नांवाच्या एका स्त्रीबरोबर लग्न केलें होतें. तिजपासून त्याला पुष्कळ संतति झाली; तींत रावर्त क्लैव हा वडील होता.

रावर्त हा लहान असतांच याच्या मोठेपणचे कितीएक गुण याच्या आंगीं दिसून येत होते. याच्या सातव्या वर्षीं याच्या कितीएक नातलगांनीं लिहिलेलीं पत्रें अद्यापि आहेत, त्यांवरून असें कळून येतें कीं,

त्या अल्पवयांतही याच्या बुद्धीचा निश्चय इतका दृढ असे आणि वृत्ति अशी तीव्र असे कीं, त्यानें अमुक एक गोष्ट करायाची असें एकदां ह्मटलें कीं, कसेंही करून ती करावयाचीच. यामुळें हा कोणत्या वेळीं काय करील कोण जाणे अशी याच्याविषयीं त्या नातलगांना मोठी भीति होती. हा स्वभावानें मोठा हूड व धीट असे, त्यामुळें केव्हां केव्हां असें वाटे कीं, याच्या मनांत विचार पक्का व खोल आहे किंवा नाहीं कोण जाणे. याचा एक मामा असें लिहितो कीं, "भांडण्याची याला विलक्षण खोड असल्यामुळें हरएक क्षुल्लक कारणावरून यास आवेश येतो आणि हा अतिशय संतापून भांडूं लागतो." मार्केतद्रेतन येथील देवळाच्या उंच घुमटावर चढून त्याच्या जवळील पाण्याच्या दगडी नळावर तो बसला ह्मणजे आसपासच्या लोकांस फार भीति वाटे अशा दंतकथा तेथील लोकांत अद्यापि चालत आहेत. तो गांवांतील सर्व टवाळ पोरांची एक झुंड जमवून दुकानदारांस धाक घालून त्यांजकडून पैसे व फळें उपटी, आणि तितकें मिळालें ह्मणजे "तुमच्या खिडक्यांच्या भिगांना ढका लागायाचा नाहीं" ह्मणून त्यांस सांगे. त्याला अनेक शाळांत पाठवून पाहिलें; परंतु सांगण्यासारिखें तो कोठें कांहीं शिकला नाहीं, आणि जिकडे जाई तिकडे "हा पराकाष्ठेचा द्वाड आहे" अशी कीर्ति मात्र मिळवी. असें सांगतात कीं, त्याचा एक पंतोजी चांगला धूर्त होता त्यानें मात्र सांगितलें होतें कीं, हा सध्या उनाड दिसतो खरा, तथापि पुढें हा लोकांत मोठ्या नांवारूपास चढेल; परंतु बहुतेक लोक

असें ह्मणत असत कीं, "राबर्त हा मूढ आहे, आणि हा बहकून गेला आहे असें ह्मटल्यासही चिंता नाहीं." आणि अशा अप्रबुद्ध व आपढंगी मनुष्याच्या हातून कांहीं होईल असें त्याच्या नातलगांसही वाटत नव्हतें. ह्मणून तो अठराच वर्षांचा असतां ईस्त इंदिया कंपनीच्या पदरीं त्याला एक रैतरची (कारकुनीची) जागा सांगून आली ती त्यांनीं कबूल केली आणि पुढें तो तेथें रोगानें मरो अथवा दैवास चढो, काय पाहिजे तें होऊ अशा विचारानें त्याला गलबतांत घालून मद्रासेस पाठवून दिलें.

सांप्रत जे तरुण गृहस्थ येथें विलायतेहून चाकरीकरितां सरकारमार्फत दरसाल येतात त्यांजप्रमाणें क्लैव याचें हिंदुस्थानांत येऊन कल्याण होण्याचा संभव नव्हता. त्यावेळेस कंपनी ह्मटली ह्मणजे केवळ व्यापारी मंडळी होती; तिच्या अमलांत फक्त पांच चार कोस जमीन होती, व तिचेंही ती एतद्देशीय राजांना भाडें देत असे. वखारींच्या संरक्षणासाठीं जे तिचे तीन चार आबडधोबड बांधलेले किल्ले होते, त्यांजवरून तोफखाना सुरू करण्यास पुरे इतकी देखील सेना तिच्या जवळ नव्हती. त्या सेनेंत एतद्देशीय लोक फार असत व त्यांना अद्यापि कवाईत शिकवलेली नव्हती. त्यांतल्या कितीएकांजवळ ढालतरवारी व कितीएकांजवळ तर तिरकमटेच असत. सांप्रत जसे सनदी कामगार येथें येऊन या विस्तीर्ण देशांतील न्यायाचीं, जमाबंदीचीं व राजकीय हीं कामें करूं लागतात, त्या प्रकारचीं त्यावेळीं कंपनीच्या चाकरांचीं कामें नव्हतीं, तर माल

पदरांत घेणें, कोष्ट्यांना आगाऊ पैसा देणें, गलवतावर माल चढवणें आणि विशेषेंकरून कंपनीशिवाय दुसरे कोणी लोक व्यापार करतील तर सूक्ष्म नदर ठेवून तो न होऊं देणें, अशीं होतीं. खालच्या प्रतीच्या रैतरांचा पगार इतका कमी असे कीं, कर्ज काढल्याशिवाय त्यांचा उदरनिर्वाह चालला ह्मणजे ते मोठें भाग्य मानीत. जे वरिष्ठ असत ते स्वत: व्यापार करून पैसा मिळवीत; आणि कंपनीचे मुख्य कारभारी होत तोंपर्यंत जे राहात, ते मात्र बहुधा पुष्कळ संपत्ति मिळवीत.

त्यावेळीं कंपनीचीं जीं व्यापाराचीं ठाणीं होतीं, त्या सर्वांत मद्रास हें मोठें होतें. पूर्वीच्या शतकामध्यें तेथें एका माळजमिनीवर तिनें "सेंतजार्ज" हा किल्ला बांधला होता; त्याजवळील बंदरांत भयंकर लाटा चाललेल्या असत. एशिया खंडांत शहरें मोठीं त्वरित वाढतात, त्याप्रमाणेंच या किल्ल्याच्या आसमंतात् एतद्देशीय हजारो लोकांनीं भरलेलें असें एक नवेंच शहर वसलें होतें. त्या गांवाबाहेर आसमंतात् बगीचांमधून पुष्कळ बंगले झाले होते. तेथें कंपनीचे जे मुनीम श्रीमान् असत ते दिवसभर व्यापाराचें काम करून थकल्यावर, संध्याकाळीं बंगालच्या अखातांतून जो गार वारा सुटतो, तो घेण्यास जात असत. या बडे व्यापाऱ्यांच्या ऐषआरामाच्या चाली, सांप्रतच्या न्यायाच्या व राजकीय खात्यांतल्या मोठमोठ्या हुद्देदारांच्यापेक्षां विशेष खर्चिक, मिजाशी आणि डामडौलाच्या अशा असत; परंतु त्या लोकांस सुख

करून घेण्याच्या युक्ति सांप्रतच्या लोकांप्रमाणें समजत नसत. ज्या कितीएक तजविजींनीं आतां उष्णता कमी करतां येते, प्रकृति नीट राहते, आणि आयुष्य वाढतें, त्या त्यावेळीं माहीत नव्हत्या. युरोपखंडाबरोबर दळणवळण सांप्रतच्यापेक्षां पुष्कळच कमी असे. इंग्लंद देशास जाण्याचा मार्ग सुएझकडून सुरू नसल्यामुळें केपाकडून तारवांतून जावें लागे व तेंही सांप्रत जसें कधीं कधीं तीन महिन्यांच्या आंतच जाणें होतें तसें होत नसे. बहुधा सहा महिन्यांपेक्षां कमी काळ तर पुरतच नसे. एखादे वेळीं तर वर्षावरही वेळ लागे. जे लोक विलायतेहून इकडे येत असत, ते स्वदेशापासून सांप्रतच्यापेक्षां विशेष वेगळे पडलेसे होत. त्यांना एतद्देशीय चाली विशेष लागत आणि युरोपांत परत गेल्यावर तेथील लोकांत मिसळण्यास त्यांस सांप्रतच्या लोकांपेक्षां विशेष कठीण पडे.

मद्रास येथील किल्ल्याच्या सभोंवार जी जमीन असे तिजवर एतद्देशीय राजांची परवानगी घेऊन ते इतर जमीनदारांप्रमाणें, पुष्कळ अधिकार चालवीत असत; परंतु आपणास स्वतंत्र अधिकार चालविण्यास मिळेल असें त्यांच्या स्वप्नींही नव्हतें. या किल्ल्याच्या भोंवतालचा प्रांत कर्नाटकाच्या नबाबाच्या स्वाधीन होता. हा नबाब निजाम ह्मणून जो दक्षिणेचा सरसुभेदार त्याच्या ताब्यांत होता. व निजाम हाही ज्याला पूर्वीं मोगलबादशाह ह्मणत असत त्याच्या पदरचा फक्त एक सुभेदार असे. हीं जीं पूर्वींचीं

प्रख्यात व भयंकर नांवें त्यांतून कितीएक अद्यापिही चालू आहेत. अद्यापि कर्नाटकाचा नबाब ह्मणून एक आहे खरा; परंतु सांप्रत निर्वाहार्थ इंग्रज सरकार त्याला त्याच्या पूर्वजांच्या मुलखाच्या जमाबंदींतून पेनशन देतें. त्याचप्रमाणें अद्यापि निजामही आहे. परंतु त्याला धाकांत ठेवण्यासाठीं त्याच्या राजधानीच्या शहराजवळ इंग्लिशलोकांची मोटी छावणी आहे. इंग्लिशांकडूनच त्याच्या दरबारीं एक रेसिडेंत नेमले-ला असतो, तो त्याला सल्ला या नांवानें जे हुकूम करीत असतो ते त्यानें हरकत न घेतां मानले पाहिजेत.

त्या काळच्या मानानेंही क्लैव याला हिंदुस्थानांत पोंचावयास फार दिवस लागले. त्याचें तारूं कितीएक महिने ब्रेझिल येथें राहिलें होतें. तें तेथें असतां त्यानें पोर्तुगीज भाषेचें ज्ञान करून घेतलें व आपल्या जवळ-ची सर्व खर्ची संपवून टाकिली. तो अखेरीस हिंदुस्थानांत येऊन पोंचे तोंपर्यंत एक वर्ष लोटून गेलें. मद्रास येथें आल्यावरची त्याची स्थिति फार दुःखावह झाली. त्याच्या जवळची सर्व खर्ची पूर्वीं संपून गेलीच होती. त्याचा पगार लहान असून त्याला कर्जही झालें होतें; त्याचें बिऱ्हाडही वाईट होतें. युरोपियन लोकांस या देशांत ही अडचण लहान आहे असें नाहीं. त्यांच्या बंगल्यांत हवाशीर व मोठमोठाल्या खोल्या असल्या तर मात्र त्यांच्यानें दिवस काढवतात. त्यानें आपणा-बरोबर एका गृहस्थास शिफारसपत्रें आणिलीं होतीं; परंतु हा मद्रासेस येऊन पोंचण्याच्या पूर्वींच तो विला-यतेस निघून गेला होता. क्लैव याचा स्वभाव मग्रूर

असून पुनः भिडस्तही असे, त्यामुळें तो आपण होऊन परकीय लोकांच्या ओळखी करीत नसे. तेव्हां अर्थात् तो हिंदुस्थानांत येऊन कितिएक महिने झाले तथापि त्याची एकाही गृहस्थाच्या घरीं ओळख पडली नव्हती. त्यांत आणखीं असें झालें कीं, नवीन हवेमुळें त्याची प्रकृति विघडली व त्याच्या मनाची हुशारी कमी झाली. त्याजकडे जें काम होतें तें त्याच्या धीट व कडक स्वभावास योग्य नव्हतें. या सर्व कारणांमुळें त्याला स्वदेशीं जावें असेंच फार वाटूं लागलें. यावेळीं आपल्या नातलगांस त्यानें जीं पत्रें लिहिलीं त्यांत भाषा अशा रीतीची कोमल व दुःखप्रदर्शक लिहिली होती कीं, पुढें जी याच्या अंगीं निष्ठुरता आली तिजवरून व लहानपणाच्या स्वेच्छाचारीपणावरून हा ह्मणजे असें लिहील असें कोणासही वाटणार नाहीं. तो एका पत्रांत असें लिहितो कीं, " मी आपला देश सोडून निघाल्यापासून एकही दिवस सुखाचा असा घालविला नाहीं." दुसऱ्या एका पत्रांत असें लिहितो कीं, " मधून मधून माझी प्रियकर जन्मभूमि जो इंग्लंद देश, त्याचें जेव्हां मला स्मरण होतें तेव्हां तर मला अगदींच चैन पडेनासें होतें. यापुढें दैववशात् जर मी आपल्या देशास परत गेलों, आणि मुख्यत्वेंकरून माझ्या अभीप्सित सर्व सुखांचें मुख्य स्थान, जें मांचेस्तर तें पुन्हा माझ्या नजरेस पडलें तर, माझे जे जे सर्व हेतु आहेत आणि मी ज्या गोष्टी इच्छीत आहें त्या सर्व एकदम मजपुढें येऊन उभ्या राहतील. "

या सर्व दुःखांमध्यें त्याला एक उत्तम प्रकारचें समाधान प्राप्त झालें होतें. तें असें कीं, तेथील गवर्नर याजवळ ग्रंथसंग्रह चांगला होता, त्यांतील पुस्तकें त्यानें क्लैव यास वाचायास परवानगी दिली होती, त्यामुळें तो आपला बहुतेक रिकामा काळ पुस्तकें वाचण्यामध्यें घालवीत असे. याला सर्व जन्मामध्यें पुस्तकांचें ह्मणून जें ज्ञान झालें तें बहुतेक याचवेळीं झालें. कां कीं, लहानपणीं याणें आपला काळ टवाळकींतच घालविला होता, आणि मोठा झाल्यावर अशा गोष्टींत मन घालण्यास याला इतर उद्योगांमुळें फावलेंच नाहीं.

परंतु दारिद्र्य, वाईट हवा, अभ्यास, किंवा स्वदेशीं परत जावें असें मनांत फार असल्यापासून जें दुःख होतें तें, यांतून कोणत्याही गोष्टीनें याचा जो अविचार व दांडगेपणा तो कमी होईना. पूर्वीं पंतोजीबरोबर जशी याची वर्तणूक असे, तशीच यानें आतांच्या आपल्या वरिष्ठांबरोबर चालविली, त्यामुळें अनेक वेळा याची चाकरी जाण्याचे प्रसंग आले. रैतर लोकांसाठीं जो बंगला बांधला होता त्यामध्यें राहत असतां, यानें दोनवेळा आपणाला गोळी मारून घेण्याचा यत्न केला; परंतु दोन्ही वेळा याचें पिस्तूल डोक्याला रोखलेलें असून रंजुक प्यालें, तेव्हां तें भरलेलें होतें खरें अशी खात्री करून घेऊन तो ह्मणाला कीं, मला ईश्वरानें कांहीं तरी मोठ्या कृत्यासाठीं वांचविलें आहे.

याच सुमारास अशी एक गोष्ट घडून आली कीं, तेणेंकरून याच्या सर्व ऐहिक आशा संपल्या असेंच

प्रथम वाटलें; परंतु तसें न होतां तेणेंकरून योग्यतेस चढण्याचा दुसराच एक मार्ग याच्या नजरेस पडला. युरोपामध्यें कांहीं वर्षांपासून एक मोठी लढाई चालली होती, तिजमध्यें एका पक्षाकडे इंग्लंद देश मदतीस होता, आणि दुसरा पक्ष फ्रान्स व स्पेन यांनीं स्वीकारिला होता. त्यावेळीं देखील आरमारामध्यें इंग्लंदाचें वर्चस्व होतें, तरी सांप्रत ज्याप्रमाणें पृथ्वींतील इतर सर्व आरमारें एकत्र झालीं असतांही त्यांस पुरून उरण्यासारिखें इंग्लंदाचें आरमार आहे तसें नव्हतें, त्यामुळें फ्रान्स व स्पेन या दोन्ही देशांबराबर लढणें त्याला कठीण पडलें होतें. हिंदुमहासागरामध्यें फ्रान्स देशास आधिपत्य मिळालें. त्याचा मारिशस येथील मोठा बुद्धिमान् व सद्गुणी गवर्नर जो लाबर्दोने त्यानें इंग्रजी आरमाराचें कांहीं चालूं न देतां, आपलें आरमार हिंदुस्थानांत आणलें; आणि त्यावरील लोकांस किनाऱ्यावर उतरून सेना तयार करून मद्रासेवर स्वारी केली, आणि तेथील किल्ल्यांतील व सर्व शहरांतील सेनेस शरण आणिलें. किल्लेकऱ्यांनीं किल्ला त्याच्या स्वाधीन केला. सेन्तजार्ज किल्ल्यावर फ्रेंच लोकांनीं आपला झेंडा लाविला; व कंपनीच्या वखारीमध्यें जो माल होता तो त्यानें लूट ह्मणून घेतला. त्यावेळीं जो करार झाला त्यांत असें ठरलें होतें कीं, सर्व इंग्रज लोकांनीं फ्रेंच लोकांच्या हातीं सुटे कैदी राहावें, व तें शहर इंग्लिश लोक खंड देऊन सोडवीत तेथपर्यंत फ्रेंच लोकांच्या स्वाधीन असावें. लाबर्दोने यानें आपल्या पतीवर असें खास

वचन दिलें होतें कीं, सुटका करण्याबद्दल जो पैका घ्यावयाचा तो फार मागितला जाणार नाहीं.

परंतु लाबर्दोनें याचा जय झाला हें पाहून पोंदेशरी येथील फ्रेंच लोकांचा गवर्नर दुप्ली याच्या मनामध्यें मत्सर उत्पन्न झाला. तशांत दुप्ली याच्या मनां पूर्वींच मोठाले बेत घोळत होते ते सिद्धीस जाण्या मद्रास ही पुन्हा इंग्रज लोकांच्या हातीं जावी हें ठी नव्हतें. यामुळें तो असें ह्मणूं लागला कीं, लाबर्दो यानें जें वचन दिलें तें त्यानें आपल्या अधिकाराबाह दिलें; हिंदुस्थानदेशामध्यें फ्रेंच लोकांची फौज प्रांत मिळवील त्याची व्यवस्था करणें माझ्याशिवा दुसऱ्या कोणाच्या हातीं नाहीं, आणि मी तर मद्रा शहर जमीनदोस्त करून टाकणार. लाबर्दोनें या तें बोलणें मान्य करणें प्राप्त झालें. किल्ला हस्तग करतेवेळीं झालेला जो करार तो अशा प्रकारें मोड गेला हें पाहून इंग्लिशांना राग आला; आणि कंपन चे जे मुख्य मुख्य नोकर त्यांची दुप्ली यानें गैरशि रीतीनें अप्रतिष्ठा केली हें पाहून तर ते फारच संत पले. तो प्रकार असा—इंग्लिश लोकांचा गवर्नर दुसरे कितीएक पहिल्या प्रतीचे लोक यांजबरोबर प रा देऊन त्यांना पोंदेशरी येथें नेलें; नंतर आप जयजयकार दाखविण्यासाठीं हजारो लोकांच्या दे शहरामधून त्यांस धिंडीप्रमाणें वाजत गाजत फिरवि पूर्वींचा जो फ्रेंच सरकारच्या तर्फेनें उघड भरंवसा दिले होता, तो अशा दांडगाईनें मोडला गेला, याव मद्रास येथील इंग्लिश लोकांनीं असें मनांत आ

कीं, लाबर्दोने याजबरोबर केलेल्या कराराप्रमाणें वर्तणें आतां आह्मांस अवश्य नाहीं; हा त्याचा विचार योग्यच होता. नंतर क्लैव हा मुसलमानाच्या वेषानें रात्रीं शहरांतून पळून गेला आणि सेंत देविद किल्ल्यांत जाऊन शिरला. हें इंग्रजांचें मद्रासेखालचें एक लहानसें व्यापाराचें ठिकाण होतें.

असा प्रसंग येऊन पडला तेव्हां हिशेब करणें आणि मालाच्या गठ्ठ्यांची परीक्षा करणें, यापेक्षां त्याच्या धाडशी आणि चंचळ स्वभावास योग्य असा जो शिपायगिरीचा धंदा तो पतकरणें क्लैव याच्या मनामध्यें सहजच आलें; त्यावरून त्यानें एनसैन ह्मणून फौजेंतील, जी शेवटची पदवी ती कंपनीच्या पदरीं मिळण्याविषयीं अर्ज केला, आणि ती मिळून तो एकविसावे वर्षीं शिपायगिरीचा धंदा करूं लागला. हा रैतर असतां सेंत देविद येथील सेनेंत कोणी एक हुद्देदार होता, त्याला तेथील सर्व लोक थर कांपत असत. त्याबरोबर क्लैव यानें कुस्ती करून लोकांच्या लक्षांत राहण्यासारखें आपल्या शौर्याचें उदाहरण दाखविलें होतें. त्या उदाहरणामुळें व त्यानंतर लागलींच जीं त्यानें शौर्याचीं अनेक कृत्यें केलीं त्यांमुळें शेकडो शूर लोकांमध्यें त्याची प्रख्याति लवकरच झाली. दुसरें असें कीं, शहाणपण, धूर्तता, व वरिष्ठाचा अधिकार मानणें हे गुण पूर्वीं दृष्टोत्पत्तीस आले नव्हते तेही याच्या अंगीं आहेत असें आतां दिसूं लागलें. फ्रेंच लोकांबरोबर ज्या लढाया झाल्या त्यांमध्यें याची अनेक वेळा फार ख्याति झाली, आणि त्यावेळीं इंग्रज

लोकांचा हिंदुस्थानांतील सर्वांत हुशार योद्धा जो मेज-
र लारेन्स, त्याच्या मनांत तो विशेष भरला.

क्लैव यानें शिपायगिरीचें काम थोडकेच महिने
केलें, इतक्यांत फ्रान्स आणि ग्रेतब्रितन यांचा तह
ठरल्याची वातमी येऊन पोंचली. त्या तहाप्रमाणें मद्रा
स इंग्लिश कंपनीच्या स्वाधीन करणें दुप्ली याला प्राप्त
पडलें; आणि क्लैव हा पुनः पूर्वींचा धंदा करण्यास
मोकळा झाला. तो पुनः रैतरचें काम करूं लागल
खरा, परंतु पुनः थोड्याच दिवसांनंतर एतद्देशी
लोकांचे लहानसान वखेडे मोडण्यामध्यें मेजर लारेन्स
हा गुंतला होता, त्याला मदत करावयास तो गेला.
मोडल्यावर तो पुनः व्यापाराचें काम करूं लागल
याप्रमाणें कधीं लढण्याचें काम व कधीं व्यापारा
काम तो करीत असतां कितीएक विना अशा घडू
आल्या कीं, तेणेंकरून आपण धंदा कोणता करा
हा त्याचा एकदा अखेरचा निश्चय झाला. या सुमार
हिंदुस्थानांतील राज्यकारस्थानें पूर्वींपेक्षां अगदीं ब
लून गेलीं होतीं; इंग्रज आणि फ्रेंच या लोकांम
विलायतेंत तर सल्ला झाला होता खरा; परंतु फ्रेंचक
नी आणि इंग्लिशकंपनी यांच्यामध्यें स्पर्धा उत्पन्न हो
असें मोठें युद्ध सुरू झालें कीं, त्यापासून तैमूर या
वंशजांकडे असलेलें जें हिंदुस्थानचें दिव्य राज्य
त्या दोघांतून कोणाला तरी एकाला मिळावें
दिसत होतें.

बाबर याणें आपल्या मोगल लोकांच्या मदत
सोळाव्या शतकामध्यें जें राज्य स्थापन केलें होतें

फारकाळ पर्यंत चाललें असून, पृथ्वींतील जीं मोठीं भव्य आणि विस्तीर्ण राज्यें त्यांतीलच तें एक होतें. सर्व युरोप खंडामध्यें या राज्यांतील प्रजेइतकी प्रजा एकाच राजाच्या हाताखालीं कोठेंही नव्हती, अथवा याच्याइतकी जमाबंदीही एका राज्याची नव्हती. हिंदुस्थानचे स्वामी यांणीं जीं मंदिरें बांधलीं होतीं त्यांचें सौंदर्य व भव्यता हीं इतकीं होतीं कीं, जे लोक युरोपांतील मोठमोठीं प्रख्यात मंदिरें पाहून गेलेले होते तेही तीं पाहून चकित होत असत. ज्या डोळ्यांनीं युरोपांतील मोठमोठाल्या राजांच्या स्वाऱ्या व वैभव पाहिलेलें, ते डोळे दिल्लीच्या तक्ताची शोभा आणि स्वाऱ्या पाहून दिपत असत. फ्रान्स किंवा जर्मनी येथील बादशहांच्या हाताखालील प्रजेइतकी प्रजा मोगल बादशहाचे जे मोठमोठे सर सुभेदार होते त्यांतून कितीएकांच्या हाताखालीं असे; या सर सुभेदारांच्या खालचे जे सुभेदार असत त्यांच्या अमलांतील मुलूख व त्यांची जमाबंदी हीं लक्षांत आणिलीं असतां त्यांस तस्कनी अथवा साक्सनी संस्थानांच्या बरोबरीस लावण्यास हरकत नाहीं.

हें विस्तीर्ण राज्य बाह्यात्कारी पाहिलें असतां बलाढ्य आणि आबाद दिसे खरें, परंतु त्याच्या उत्तमावस्थेंत देखील, सांप्रत युरोपामध्यें जीं अगदीं वाईट रीतीनें चाललेलीं राज्यें आहेत त्यांच्यापेक्षांही वाईट रीतीनें तें चाललें होतें. एशिया खंडस्थ जे जे स्वेच्छाचारी राजे त्यांच्या राज्यव्यवस्थेमध्यें जीं व्यंगें असतात तीं यामध्यें होतीं. एक जातीच्या लोकांचा अंमल

दुसऱ्या जातीच्या लोकांवर झाल्यापासून जे वाईट परिणाम अवश्य होतात तेही यामध्यें झालेले होते. या शिवाय बादशाहाच्या घराण्यांतील जे राजपुत्र, त्यांचे राज्यपदाविषयीं परस्परांत तंटे होऊन नेहमीं हाणामाऱ्या चालल्या असत व राज्यांत विपत्ति येऊन पडत. कधीं कधीं महत्वाकांक्षी सुभेदार अपणास स्वतंत्रता प्राप्त करून घेण्याची इच्छा बाळगूं लागत. हिंदूमध्यें जे लढाऊ व शूर लोक होते ते आपल्यावरील परचक्र उडवावें ह्मणून वारंवार करभार देण्याचें बंद करीत, आणि त्यांचीं राहण्याचीं जीं डोंगर वगैरे विकट स्थानें तेथें जमून बादशाही फौजेचा पराजय करीत, व वसाहत झालेल्या प्रांतांत हाणामारी करण्यास त्यांच्या झुंडीच्या झुंडी येऊन पडत. परंतु अशा प्रकारें जरी बहुत करून नेहमी व पुष्कळ अव्यवस्था होत होती, आणि कधीं कधीं असे प्रसंग येत कीं, त्यांपासून सर्व राज्याची स्थिति हालून जाई, तरी सरासरी वरवर पाहिलें असतां हें विस्तीर्ण राज्य कितीएक पिढ्यांपर्यंत बाहेरून तरी एक, बलाढ्य आणि भव्य आहे असें दिसत होतें. पुढें हें राज्य औरंगजेब बादशाहानें जरी मोठ्या मसलतीनें आणि पराक्रमानें चालविलें, तरी त्याच्या मोठ्या कारकीर्दींतच तें त्वरित लयास जात चाललें होतें. तो बादशाह सन १७०७ त मरण पावला तेव्हांपासून तर हा लय फारच लवकर होत चालला. या राज्याच्या इमारतीस अखेरीस बाहेरून मोठमोठाले धक्के बसूं लागले आणि आंतून घुशी-उंदीर यांची पोखरणी चालली, तेणें करून थोड्या

काळांत सर्व बादशाहीची इमारत ढासळून जमीन-दोस्त झाली.

औरंगजेबानंतर चाळीस वर्षें पर्यंत जे नामधारी तक्ताधिपति होऊन गेले, ते आळस आणि दुर्व्यसनें यांमध्यें निमग्न होऊन, राजमंदिरांत भांग खाऊन अथवा कसबिणींबरोबर मौजा मारून अथवा खुषमसकऱ्यांच्या थट्टा ऐकून, काळाचा व्यय करीत असत. असें झाल्यानें हिंदुस्थानच्या संपत्तीचें रक्षण करण्यास कोणी नाहीं असें पाहून, ती नेण्यासाठीं पश्चिमेकडून पर्वतांतून क्रूर लोकांच्या एकामागून एक झुंडी येऊं लागल्या. एक योद्धा इराणांतून येऊन सिंधुनद उतरून दिल्ली शहरांत आला, आणि जयजयकार करून, जी संपत्ति पाहून युरोपियन प्रवासी चकित झाले होते ती, व युरोपांतील कुशळ कारागिरांनीं अतिमौल्यवान् रत्नें ज्यास बसविलीं होतीं असें जें मयूरसिंहासन तें, व कोहिनूर ह्मणून जो प्रख्यात हिरा तो, हें सर्व तो घेऊन गेला. इराणी लोकांच्या धुमाळींतून जें उरलें त्याचा आफगाण लोकांनीं विध्वंस केला. रजपूतस्थानांतील जे लढाऊ लोक त्यांनीं मुसलमानांचा अधिकार मानण्याचें सोडून दिलें. रोहिलखंड हें फौजेंतल्या एका शिपायाच्या टोळीनेंच बळकाविलें. सिंधुनदाच्या तीरावर सिक लोकांचें राज्य स्थापित झालें. यमुनेच्या तीरावरच्या प्रांतांत जाट लोकांनीं धुमाळी उडविली. परंतु याही सर्वांपेक्षां भयंकर असे एक जातीचे लोक, हिंदुस्थानच्या पश्चिमकिनाऱ्याजवळ जो डोंगरी मुलूख आहे त्यांतून निघाले.

या लोकांना बहुत वर्षें पर्यंत सर्व एतद्देशीय राजे थरकांप भीत असत; व हे अखेरीस इंग्लिश लोकांच्या फक्त नशिबानें व बुद्धीनेंच त्यांच्या हातून मोडले गेले; परंतु ते मोडण्यास मोठमोठ्या अशा अनेक मोठ्या निकराच्या लढाया कराव्या लागल्या. त्या लढायांचा परिणाम कोणत्या पक्षास अनुकूळ होईल याचा अदमास करणेंही त्यावेळीं कठीण होतें. हे कडवे व लुटारू मराठे लोक औरंगजेब बादशाह राज्य करीत असतां प्रथम आपल्या डोंगराळ मुलुखांतून निघाले, आणि तो मेला नाहीं तों त्याच्या विस्तीर्ण राज्यांतील कोनाकोपऱ्यास देखील त्यांचें नांव ऐकतांच सर्व लोक थरकांप भिऊं लागले. पुष्कळ सुपीक प्रांतांनीं भरलेले सुभे त्यांनीं जिंकून घेतले. आणि दक्षिणहिंदुस्थानाच्या पश्चिमकिनाऱ्यापासून तों पूर्वकिनाऱ्यापर्यंत सर्व राज्य त्यांचेंच झालें. पुणें, ग्वालेर, बडोदें, नागपूर आणि तंजावर येथें मराठी सरदार राज्य करूं लागले. त्यांना मोठमोठालीं राज्यें प्राप्त झालीं तरी त्यांनीं लुटण्याचा धंदा सोडून दिला असें नाहीं. तर आपल्या पूर्वजांची जी पुंडाई करण्याची चाल ती त्यांनीं राखिलीच होती. आणि जेथें त्यांचा अंमल स्थापन झाला नाहीं तो मुलूख त्यांनीं लुटून फस्त केला. त्यांच्या डंक्याचा शब्द ऐकिला ह्मणजे शेतकरी लोक आपलें शिधासामान पोत्यांत घालून आणि त्यांच्या जवळ जे चार पैसे असत ते कंबरेस बांधून मुलेंमाणसें घेऊन रानांत पळत; मग तेथें वाघाचें किंवा तरसाचें भय असलें तरी तें त्यांना यांच्यापेक्षां पतकरे. अनेक प्रांतांमधील लोक आपल्या

शेताचा नाश होऊं नये ह्मणून त्यांना खंड देण्याचें पतकरून परत लावीन. जे नामधारी बादशाह दिल्लीच्या तक्तावर बाहुल्याप्रमाणें बसलेले असत, त्या बिचाऱ्यांना देखील असा खंड देण्याचें पतकरून हीनपणा कबूल करणें प्राप्त पडे. एका लुटारू मराठी सरदारानें दिल्लीच्या तटाजवळ जाऊन डेरा दिला होता. दुसरा भोंसला ह्मणून एक होता तो आपल्या अगण्य घोडेस्वारांस घेऊन प्रत्येक वर्षीं बंगाल प्रांतावर स्वारी करीत असे. जे युरोपियन व्यापारी तेथें होते त्यांच्या मनामध्यें देखील आपल्या वखारीचें काय होतें याचा धाक सुटला; आणि त्यांच्या सेनेपासून कलकत्त्याचा बचाव होण्यासाठीं तेथें मजबुदी करणें प्राप्त पडलें. मराठ्यांचा खंदक ह्मणून जो आतां तेथें अहे त्याजवरून असा प्रसंग आल्याचें स्मरण अद्यापि होतें.

या धुमाळींतून जे मोगलाचे सुभेदार बचावले गेले ते स्वतंत्र राजे झाले; मग ते तैमूरलंग याच्या वंशजांचा अधिकार तोंडानें कबूल करीत, कधीं कधीं त्यांना नजराणे पाठवीत, व कधीं कधीं त्यांजपासून मरातबही मागीत; परंतु वास्तविक पाहिलें असतां बादशाह पाहिजे तेव्हां त्यांस काढूं शकता, असे ते त्यांच्या ताब्यांत राहिले नव्हते; केवळ वंशपरंपरेचे राजेच होऊन बसले होते. कितीएक वर्षांपूर्वीं बंगाल व कर्नाटक प्रांतांत जीं मुसलमानाचीं घराणीं राज्य करीत असत, त्यांचा आरंभ याप्रमाणेंच झाला, आणि हैदराबादेमध्यें जो निजामाचा वंशज सांप्रत परअमलाखालीं

असून राज्यपदाचे कितीएक अधिकार चालवीत आहे त्याचेंही मूळ याप्रमाणेंच आहे.

या सर्व धांदलीचा परिणाम तरी काय होणार? हे वखेडे शेंकडो वर्षेंपर्यंत असेच चालणार कीं काय? या घोटाळ्यांत दुसरें एकादें मोठें राज्य उत्पन्न होणार कीं काय? हिंदुस्थानचें आधिपत्य मुसलमानांस मिळणार अगर मराठ्यांस मिळणार? किंवा दुसराच एकादा पर्वतवासी पराक्रमी पुरुष काबूल व खोरासान येथील बलाढ्य लोक बरोबर घेऊन या श्रीमान्, परंतु कमकुवत अशा लोकांवर चालून येणार काय? असे अनेक प्रश्न विचारी लोकांच्या मनांत उत्पन्न होऊं लागले होते व त्यांतून केवळ असंभाव्य असा एकही दिसत नव्हता. परंतु जी एक केवळ व्यापाऱ्यांचीच मंडळी हिंदुस्थानापासून सात हजार कोशांवर पडलेली, आणि जिच्या ताब्यांत व्यापारासाठीं घेतलेली जी थोडीशी जमीन ती मात्र होती, ती मंडळी शंभर वर्षांच्या आंत कन्याकुमारी भूशिरापासून तों निरंतर बर्फानें आच्छादित जो हिमालय पर्वत तेथपर्यंत, मुलूख काबीज करील, अथवा मुसलमान आणि मराठे यांस, परस्परांतील तंट्याचा विसर पाडवून एका परचक्राखालीं आणील, मोठ्या बलाढ्य मोगल बादशाहाचा देखील अंमल ज्यांणीं मानला नाहीं असे जे अनेक जातींचे कडवे लोक त्यांना गरीब करून सोडील, आणि कोट्यावधि लोक एका कायद्याखालीं आणून, ब्रह्मपुत्रा नदीच्या पूर्वेस लांबपर्यंत व पश्चिमेस जाहिलम नदीच्या पलीकडे लांबपर्यंत

झेंडा लावील, आवा येथें जाऊन तेथील राजाकडून आपलें बोलणें कबूल करवील, अथवा आपल्या पदरच्या राजाला कंदाहारच्या गादीवर नेऊन बसवील असें, कोणी मनुष्य कितीही धूर्त व चाणाक्ष्य असता तरी त्याच्यानेंही भाकित करवलें नसतें.

अशा या मोडून गेलेल्या मोगली राज्याच्या ठिकाणीं युरोपियन लोकांची बादशाही स्थापितां येईल, ही कल्पना प्रथम दुप्ली याच्या मनांत आली. त्याच्या चंचळ, विशाळ आणि सूचक अशा बुद्धीमुळें ज्या वेळीं ही कल्पना त्याला सुचली त्या वेळीं इंग्रजी कंपनीच्या मोठ्या हुशार नौकरांना देखिल मालाच्या यादी व जमाखर्च यांशिवाय दुसरें कांहीं दिसत नव्हतें. दुप्ली याला हें राज्य प्राप्त करून घ्यावयाचें सुचलें इतकेंच नाहीं; तर तें प्राप्त करून घेण्यास साधनें कोणतीं असलीं पाहिजेत, त्याविषयींचीही योग्य कल्पना स्पष्टरीतीनें त्याच्या ध्यानांत येऊन चुकली होती. एतद्देशीय राजांनीं कितीही फौज जमा केली तरी उत्तम कवाईत शिकलेले व युरोपियन रीतीनें लढाया मारणारे थोडेसे लोक जरी असले, तरी यांच्या पुढें त्या फौजेचें कांहीं एक चालायाचें नाहीं असें त्याच्या मनांत स्पष्ट येऊन चुकलें होतें. दुसरें त्याला असेंही सुचलें कीं, युरोपियन सरदार ठेवून जर एतद्देशीय लोकांची फौज तरबेज केली तर तीही उत्तम होईल. मोठी घडामोड व उलाढाल करणारे जे युरोपियन लोक त्यांना भरतखंडामध्यें राज्य चालविण्याचा सुलभ मार्ग ह्मटला ह्मणजे हाच कीं, एखादा नामधारी

नवाब किंवा निजाम करून ठेवून त्याला राजाचा डौल आणून त्याचा कारभार आपल्या हातीं ठेवावा, आणि आपणाला जें बोलणें तें त्याच्या मुखांतून वदवावें, ह्मणजे उत्तम काम चालेल, हें त्याला पक्कें कळत होतें. लढाईच्या व राज्यकारभाराच्या ज्या कल्पना इंग्रज लोकांनीं पुढें कांहीं वर्षांनीं चालवून झेंडा लाविला, त्या सर्व त्या काल्पनिक व महत्वाकांक्षी फ्रेंच सरदाराच्या मनामध्यें पूर्वींच येऊन चुकल्या होत्या व त्याप्रमाणें तो वर्तूंही लागला होता.

या वेळीं हिंदुस्थानाची स्थिति अशी होती कीं, कोणत्याही प्रकारचा मनुष्य जरी राज्य बळकावण्यास पुढें सरसावला असता, तरी त्याला जुन्या कायद्याप्रमाणें अथवा आलीकडील वहिवाटीप्रमाणें कांहीं तरी सबब सांगण्यास मिळतीच मिळती. कोणत्याही प्रकारचा हक्क निश्चित राहिला नव्हता; तशांत ज्या युरोपियन लोकांनीं एतद्देशीय तंटयांमध्यें मन घातलें, त्यांणीं तर एशियाखंडांतील राजकारस्थानांस युरोपखंडांतील राजांचे कायदे लागू करून हा झालेला गोंधळ कमी न करतां उलटा अधिकच वाढविला. जर एकाद्या नवाबाबरोबर तो स्वतंत्र आहे असें समजून वागणें सोईवार दिसलें, तर तसें करावयास उत्तम सबब तयार होती, कां कीं खरोखर पाहिलें असतां तो स्वतंत्रच होता. बरें तो दिल्लीच्या बादशाहाचा केवळ सुभेदार असें मानणें जरी आपणाला फायद्याचें वाटलें, तरी अडचण नव्हती, कारण तो मूळचा तसाच होता. त्याचा हुद्दा वंशपरंपरेचा

आहे किंवा एकपुस्त आहे, किंवा बादशाहाची मर्जी असेल तेंथपर्यंत राहावयाचा आहे, यांतून जो प्रकार फायद्याचा वाटेल त्या प्रत्येक पक्षास कारणें व पूर्वींच्या वहिवाटींचा आधार दाखवितां येत होता. ज्या पक्षाच्या हातीं बाबर बादशाहाचा वारस होता, तो पक्ष असें ह्मणे कीं, सर्वांचा वास्तविक, पुरा आणि स्वतंत्र स्वामी काय तो हाच वारस होय, व याच्या हाताखालचे जे असतील त्यांनीं त्याचा अधिकार मानला पाहिजे. आतां जे लोक या पक्षाच्या विरुद्ध होते त्यांचें ह्मणणें असें होतें कीं, सर्व बादशाही मोडून गेली आहे, आणि जो मोगलवंशांतील पुरुष तक्ताधिपति ह्मणवितो त्याला मान देणें हें जरी योग्य आहे, (कां कीं तसा मान त्याच्या वंशाला फार दिवसांपासून मिळालेला आहे), तरी त्याला यापुढें सर्व हिंदुस्थानाचा वास्तविक स्वामी ह्मणणें हें बरोबर नाहीं. या दुसऱ्या पक्षाच्या ह्मणण्यासही आधाराचा तोटा होता असें नव्हतें.

दिल्लीची बादशाही मोडल्यावर जे अतिबलाढ्य स्वतंत्र राजे झाले, त्यांतिल एक निजाम उल्मुल्क ह्मणजे दक्षिणेचा सर सुभेदार हा सन १७४८ सांत मरण पावला. त्यामागें याचा मुलगा नासिरजंग हा त्याच्या अधिकारावर आला. याच्या अमलामध्यें जे प्रांत होते त्यांत कर्नाटक हा अतिविस्तीर्ण व अतिसंपत्तिमान् असा प्रांत होता. तो एका पुरातन नवाबाच्या अमलांत होता. त्याला इंग्रज लोक अनावर्दीखान असें ह्मणत.

परंतु ही सुभेदारी व तिच्या पोटांतील कर्नाटक प्रांत यांवर आपला वारसा आहे असें ह्मणणारे दुसरे लोक होते. निजाम उल्मुल्क याचा नातु मिर्जाफाजंग हा नासिरजंगावरावर वारसा सागूं लागला; आणि पूर्वीच्या एका नवावाचा जावई चंदासाहेब हा कर्नाटक प्रांतावर वारसा करूं लागला. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें या काळीं हिंदुस्थानांत सर्व कायदा अशाश्वत होऊन गेला होता; यामुळें मिर्जाफाजंग आणि चंदासाहेब या दोघांनाही आपआपल्या बोलण्यास कांहीं कारण लावण्यास अडचण पडली नाहीं; आणि सर्व देशभर अगदीं पक्की अव्यवस्थाच होऊन गेली होती त्यामुळें त्या दोघांना अनुसरणारे लोभी लोक मिळण्यासही अडचण पडली नाहीं. त्या दोघांनीं एकमेकाच्या फायद्यावर नजर देऊन कर्नाटकावर स्वारी केली; आणि आलीकडे पूर्व किनाऱ्यावर जी लढाई झाली तींत इंग्रजांचा पराजय होऊन फ्रेंच लोकांचा जय झाला होता त्यामुळें फ्रेंचांची प्रख्याति झाली होती, त्यावरून त्या दोघांनींही त्यांची मदत मागितली.

मोठा मसलतदार व महत्वाकांक्षी असा जो दुप्ली तो तर अशा गोष्टीची वाटच पाहत वसला होता. कर्नाटकाच्या गादीवर नवाब बसविणें, दक्षिणेमध्यें सर सुभेदार नेमणें, आणि त्यांच्या नांवानें सर्व दक्षिण हिंदुस्थानाचा राज्यकारभार चालविणें हीं आपल्या हातीं येतील अशी कल्पना करून दुप्ली हा मोठा लुब्ध होऊन गेला. त्यानें हे जे स्वमतानें झालेले वा-

रस त्यांचा पक्ष स्वीकारला. आणि त्यांच्या मदतीला चारशें फ्रेंचशिपाई व दोन हजार कवाईत शिकलेले काळे लोक असे पाठवून दिले. पुढें लढाई झाली तींत फ्रेंच लोकांनीं मोठी तलवार मारिली. अनावर्दीखानाचा पराभव होऊन तो मारला गेला. त्याचा मुलगा महमदअल्ली हा जी थोडी उरलेली फौज होती ती घेऊन त्रिचनापल्ली येथें पळाला. तेणेंकरून एकाच सपाट्यानें बहुतेक कर्नाटक या विजयी पक्षाच्या हस्तगत झालें.

दुप्ली यानें जें एकंदर महत्व मिळविलें त्याचा हा केवळ आरंभ समजला पाहिजे. पुढें कितीएक महिनेपर्यंत लढाया मारून, सल्लयाचीं बोलणीं लावून, आणि कारस्थानें करून, त्यानें हुशारी दाखविली आणि त्याचें दैवही उदयास आलें. नासिरजंग याला त्याच्याच पक्षकारांनीं मारून टाकिलें, त्यामुळें मिर्जाफाजंग दक्षिणेचा मालक झाला, आणि फ्रेंच लोकांच्या महत्वाचा व मसलतीचा झेंडा लागला. त्यांचें जें मुख्य ठिकाण पोंदेशरी तेथें त्यांनीं जयजयकार करून मोठा आनंद केला, तोफांची सरबत्ती केली आणि देवळामध्यें ईश्वराची प्रार्थना करून आभार मानिले. मिर्जाफाजंग हा आपल्या दोस्तदारांना भेटावयास पोंदेशरी येथें गेला. तेथें मोठ्या डामडौलानें त्यांनीं त्याला तक्तावर बसविलें. दुप्ली हा अति उंच पदवीच्या मुसलमान लोकांप्रमाणें पोषाक करून निजाम व आपण एकाच पालखींत बसून शहरांत आला, आणि पुढें जो समारंभ झाला त्यांत

आपण सर्व मानकऱ्यांच्या पुढें झाला. कृष्णा नदीपासून कन्याकुमारीपर्यंत सर्व हिंदुस्थानाचा, ह्मणजे सुमारें फ्रान्स देशाएवढ्या मुलखाचा "गवर्नर" असा किताब त्याला मिळाला, आणि अधिकार तर चंदा साहेबाच्यापेक्षां विशेष मिळाला. त्याला सात हजार घोडेस्वारांची सरदारी मिळाली, आणि जिकडे तिकडे असे जाहिरनामे लाविले कीं, कर्नाटकांत पांदेशरी-खेरीजकरून दुसऱ्या कोठें कोणीं टाकसाळ घालूं नये. या योगानें दक्षिणेंतील पूर्वींच्या सुभेदारांनीं जी पुष्कळ संपत्ति मिळवून ठेविली होती ती फ्रेंचांच्या खजिन्यांत जाऊन पडली व आणखी अशी वदंता होती कीं, दुप्ली यानें वीस लक्ष रुपये रोकड व शिवाय पुष्कळ जवाहीर असें आपणास घेतलें. सारांश यावेळीं त्याला अपार फायदा झाला. त्याच्या अमलाखालीं तीन कोटी प्रजा आली, व तिजवर त्याचा अधिकार बहुतकरून त्याच्या इच्छेप्रमाणें चालूं लागला असें ह्मटल्यास चिंता नाहीं. राजापासून मान किंवा वेतन मिळणें झाल्यास त्याच्या द्वाराशिवाय मिळूं नये असें झालें, आणि त्याची सही पाहिल्याशिवाय निजाम अर्ज वाचीनासा झाला.

मिर्जाफाजंग हा राज्यपद प्राप्त झाल्यानंतर थोडक्याच महिन्यांनीं मरण पावला; परंतु त्यामुळें फ्रेंच लोकांचें वजन कमी झालें असें नाहीं, कां कीं त्यांच्याच साह्यानें त्याचे घराण्यांतील एका शाहाजाद्यास गादी प्राप्त झाली होती; त्यानें माजी राजाचे सर्व करार कायम ठेविले. त्या कारणानें हिंदुस्थानांत

दुप्ली हा अतिबलाढ्य राजा होऊन बसला. त्याच्या देशचे लोक अशी बढाई झोकूं लागले कीं, दिल्लीच्या राजमंदिरामध्येंही लोक याच्या नांवास भितात. या परकी मनुष्यानें राज्यप्राप्ति करून घेण्याच्या मसलती फक्त चार वर्षांमध्यें एथपर्यंत सिद्धीस नेल्या हें पाहून एतद्देशीय लोक आश्चर्य पावले. पण या डौली फ्रेंच गृहस्थास जो हा एवढा वास्तविक अधिकार व वैभव हीं मिळालीं होतीं तेवढ्यानेंच त्याची तृप्ति न होऊन आपली प्रजा व प्रतिस्पर्धी यांजपुढें तो डोळ्यांत खुपण्यासारिख्या मोठ्या डौलानें आपली शोभा मिरवूं लागला. त्यानें असें मनांत आणलें कीं, आपल्या मसलतींचा झेंडा ज्या ठिकाणीं मुख्यत्वेंकरून लागला, ह्मणजे नासिरजंग याचा मोड होऊन मिर्जाफाजंग राज्यपदाप्रत पावला, त्या स्थळीं एक जयस्तंभ उभारावा आणि त्याच्या चार बाजूंवर चार भाषांमध्यें छानदार लेख कोरून सर्व एशियांतील लोकांना आपली कीर्ति कळवावी. आपले जय झाले त्यांचीं चित्रें काढलेलीं पदकें त्यानें या भव्यस्तंभाखालीं पुरलीं; आणि त्या स्तंभाच्या आसपास "दुप्लीफतियाबाद," ह्मणजे दुप्लीची विजयनगरी असें प्रौढीनें नांव देऊन एक शहर वसविलें.

आपली प्रतिस्पर्धी फ्रेंचकंपनी इचा जो हा त्वरित जय होत चालला होता व इला प्रख्याति मिळत चालली होती, ती बंद करण्याविषयीं इकडे इंग्लिश कंपनीनें कांहीं थोडेसे दुर्बळ व तुटक तुटक असे यत्न चालविले होते, आणि महंमदअली हाच कर्नाटकाचा

नवाव असें ह्मणावयाचें तिनें सोडिलें नव्हतें. परंतु महंमदअल्ली याचें राज्य ह्मटलें ह्मणजे फक्त त्रिचनापल्लीच; आणि त्या त्रिचनापल्लीलाही चंदासाहेब व त्याचे दोस्त फ्रेंच यांनीं वेढा दिलाच होता. हा वेढा उठवून लावण्यास इंग्लिशांस सामर्थ्य नाहीं असें दिसूं लागलें. त्यांची मद्रासेस फौज थोडीच होती; व तिजवरही कोणी सरदार नव्हता. मेजर लारेन्स हा इंग्लंदास गेला होता, आणि त्या ठिकाणीं दुसरा नामांकित असा कोणी एक सरदार राहिला नव्हता. तशांत एतद्देशीय लोक ब्रितिश लोकांचा धिक्कार करूं लागले होते. हे बलाढ्य लोक लवकरच पुढें आपणांस जिंकून राज्य करूं लागतील हें त्यांच्या स्वप्नीं देखील आलें नव्हतें; कां कीं, सेन्त जार्ज या किल्ल्यावर फ्रेंच लोकांचीं निशाणें फडकत होतीं. त्यांनीं आपला जय झाला हें दाखविण्याकरितां इंग्लिश कंपनीच्या मुख्य मुनिमास पांदेशरी शहरांतून एखाद्या सोंगाप्रमाणें फिरविलें. दुप्ली याची मसलत व तलवार जिकडे तिकडे सफल व कायम झाली, आणि मद्रास येथील अधिकारी यांनीं जो त्याला अडथळा आणला तेणेंकरून उलटी त्यांचीच कमकुवत बाहेर दिसून आली आणि फ्रेंचांचें महत्व वाढलें, हें सर्व एतद्देशीय लोकांनीं पाहिलें होतें. अशा प्रसंगीं एका यःकश्चित् तरुण इंग्रजानें, आपल्या पराक्रमानें आणि बुद्धीनें त्या उभय पक्षांच्या नशिबाचें सर्वच पारडें फिरवून टाकिलें.

क्लैव याची उमर या वेळीं सारी पंचवीस वर्षांची होती. आपण शिपायगिरीचा धंदा करावा, किंवा

व्यापाराचा करावा याविषयीं कांहीं काळपर्यंत त्याच्या मनाचा निश्चय झाला नव्हता. अखेरीस त्याला या दोन्ही प्रकारचीं कामें ज्यांत आहेत असाच एक हुद्दा मिळाला. तो असा कीं, फौजेला सामग्री पुरवण्याचें काम त्याजकडे होऊन त्याला कप्तानाचा हुद्दा मिळाला. या प्रसंगीं त्याची सर्व हुशारी उदयास आली. त्यानें आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांस असें दाखविलें कीं, आपण जर मोठ्या त्वरेनें योग्य तजवीज केली नाहीं तर त्रिचनापल्ली शत्रूंच्या हातीं जाईल, अनावर्दीखान याचा वंश नाहींसा होईल, आणि सर्व दक्षिण हिंदुस्थानचें आधिपत्य वास्तविक रीतीनें फ्रेंचांच्या हातीं जाईल. यासाठीं तो असें ह्मणाला कीं, मोठ्या धिटाईनें एकदां सपाटा मारला पाहिजे; आणि कर्नाटकाच्या नवाबाचें राहण्याचें आवडतें ठिकाण आणि त्याची राजधानी जें अर्काट शहर त्याजवर हल्ला केला असतां कदाचित् त्रिचनापल्लीचा वेढा उठेल, असें त्यानें सुचविलें. दुप्ली याचा जय पाहून इंग्रजांच्या मुनिमांस मोठा धाक पडलाच होता, आणि त्यांतच फ्रान्स व ग्रेतब्रितन यांच्यामध्यें नवीन लढाई सुरू झाली असतां इकडे मद्रास एकदम घेऊन ती जमीनदोस्त केली जाईल असें भय वाटलें. त्यामुळें जे मुख्य इंग्रजी अधिकारी होते त्यांनीं क्लैव याचा बेत कबूल केला, आणि तो अमलांत आणण्याचें काम त्याजवरच सोंपविलें. त्याजवळ या कामगिरीसाठीं दोनशें इंग्रजी आणि तीनशें एतद्देशीय शिपाई दिले. एतद्देशीय शिपायांजवळ विलायती हत्यारें

दिलेलीं होतीं व ते कवाईत शिकलेले होते. त्याच्या हाताखालीं आठ सरदार होते, त्यांपैकीं दोघांनीं मात्र पूर्वीं लढाई पाहिलेली होती, आणि चार कंपनीच्या पदरचे मुनीम होते, ते क्लैव याचा कित्ता पाहून या चाकरींत शिरण्यास प्रवृत्त झाले होते. या वेळीं हवा वादळलेली होती आणि पाऊस पडत होता, विजा चमकत होत्या व मेघांचा गडगडाट चालला होता, तशांतूनच क्लैव अर्काट शहराच्या गांवकुसवाजवळ जाऊन टेपला; त्यामुळें तेथील फौजेची धांदल उडाली, आणि तो किल्ला सोडून ती पळाली. अशा प्रकारें अर्काट शहर गोळी मारल्याशिवाय इंग्रजांच्या हातीं लागलें.

परंतु तें तसेंच आपल्या स्वाधीन राहणार नाहीं हें पक्कें समजून तो सामग्रीची तजवीज करूं लागला. त्यानें तटबंदीला वगैरे आरंभ केला, आणि वेढा पडल्यास टक्कर मारण्याचीही तयारी तो करूं लागला. इतक्यांत पळालेल्या फौजेनें जमाजम केली, आणि आसपासच्या मुलखांतून कुमक मिळवून तीन हजार लोकांनिशीं शहराजवळ येऊन वेढा दिला. इकडे मध्यरात्रीच्या सुमारास क्लैव हा किल्ल्यांतून बाहेर निघाला, आणि एकाएकी छापा घालून शत्रूंची त्यानें धांदल उडवून दिली, पुष्कळांची कत्तल केली, आणि बाकीच्यांस पळवून लावून, आपला एकही मनुष्य मरूं दिल्याशिवाय तो परत किल्ल्यामध्यें आला.

चंदासाहेब व त्याचे दोस्त फ्रेंच हे यावेळीं त्रिचनापल्लीला वेढा देण्यांत गुंतले होते. त्यांना ही

वातमी कळतांच त्यानें आपल्या फौजेमधून चार हजार लोक अर्काट येथें पाठवून दिले. ज्या लोकांना क्लैव यानें हाकून दिलें होतें त्यांतून जे उरले होते ते येऊन लागलेच त्यांना मिळाले. वेळूर येथून त्यांच्या मदतीस दोन हजार लोक आले, व याशिवाय विशेष मदत होण्यासारखी दुप्ली याजकडून पोंदेशरी येथून दीडशें फ्रेंच लोकांची कुमक आली. या सर्व सुमारें १०,००० फौजेवर चंदासाहेब याचा मुलगा राजासाहेब हा सरदार होता.

राजासाहेब यानें येऊन अर्काटच्या किल्ल्यास वेढा घातला. त्या वेढ्यापुढें तो किल्ला टिकाव धरील असें दिसत नव्हतें. त्या किल्ल्याची तटबंदी मोडकळीस आलेली होती, खंदकांतील पाणी सुकून गेलें होतें, तट अरुंद असल्यामुळें तोफा ठेवायास जागा नव्हती, आणि तटावरील दगडी भिंत ठेंगणी असल्यामुळें फौजेचें रक्षण होण्यासारखें नव्हतें. क्लैव याची फौज मुळींच थोडी, आणि तिजपैकींही कितीएक लोक मेल्यामुळें ती बरीच कमी झाली होती. बाकी एकंदर एकशेंवीस युरोपियन आणि दोनशें काळे शिपाई व चार सरदार इतके लोक उरले होते. अन्नसामग्रीही कमीच होती. अशा अडचणीमध्यें ज्या सरदाराला किल्ल्याचा बचाव करणें होता तो केवळ पंचवीस वर्षांचा असून, त्याची विद्या पाहिली असतां तो जमाखर्ची लिहिणें मात्र शिकलेला होता.

हा वेढा एकसारखा पन्नास दिवस पर्यंत पडला होता; परंतु त्या काळीं क्लैव यानें एकादा वृद्ध व

आनुभविक योद्ध्याला देखील मोठी शाबासकी मिळे अशा रीतीनें दृढता, दक्षता आणि हुशारी हीं राखून तितकेही दिवस आपला बचाव केला; पुढें तटाला अधिक अधिक भोकें पडत चाललीं, आणि क्लैव याच्या हाताखालची फौज भुकेनें व्याकुळ होत चालली अशा स्थितीमध्यें आणि इतके कमी सरदार असतां, दुसरी एकादी फौज तर बहुधा बेबंद व बेफाम झाली असती; तशांत ती फौज निरनिराळ्या जातींची, धर्मांची, वर्णांची, रीतींची, व निरनिराळ्या भाषाही बोलणारी होती, यामुळें बेबंदीचें भय विशेष होतें. परंतु ही लहानशी फौज, स्वामिभक्तीचीं जीं पूर्वीं झालेलीं प्रख्यात उदाहरणें आहेत, त्यांपेक्षांही अधिक स्वामिभक्ति मनांत बाळगणारी होती. काळे लोक होते ते ह्मणूं लागले कीं, किल्ल्यांत आणखी दाणा येईपर्यंत आपणाला तांदुळांची पेज पुरे आणि गोऱ्या शिपायांच्या संरक्षणाला काळ्यांच्यापेक्षां अन्न अधिक लागतें, त्यासाठीं सर्व धान्य त्यांना द्यावें. या वेळीं शिपाई लोकांनीं जें इमान पाळलें अथवा त्यांच्या सरदारांच्या स्वाभाविक गुणामुळें त्याचें जें त्यांजवर वजन पडलें होतें त्यांविषयीं विशेष आश्चर्य वाटण्याजोगें दुसरें उदाहरण इतिहासांत आढळत नाहीं.

मद्रास येथील इंग्लिश कारभाऱ्यांनीं क्लैव याची सुटका करण्याला यत्न केला, परंतु तो व्यर्थ गेला. दुसऱ्या एका ठिकाणाहून मदत होईल अशी आशा होती; मुरारराव नांवाच्या सरदाराच्या हाताखालें सहाहजार मराठ्यांची एक टोळी महमदअल्ली यास

कुमक करण्यासाठीं पगार देऊन आणलेली होती; ते लोक अर्धवट शिपाई आणि अर्धवट दरवडेखोर असे होते. फ्रेंच लोकांपुढें कोणाचें चालावयाचें नाहीं आणि चंदासाहेब याचा जय खचितच व्हावयाचा असें समजून ती सेना पुढें न सरतां कर्नाटकाच्या सरहद्दीवरच स्वस्थ पडून राहिली होती. परंतु अर्काट येथील किल्ल्याचा बचाव कसा होत होता तो सर्व प्रकार ऐकून ते आपला आळस झाडूं लागले. मुरारराव ह्मणूं लागला कीं, इंग्लिश लोकांच्या अंगीं लढण्याचें सामर्थ्य आहे असें मला आजपर्यंत वाटलें नव्हतें; परंतु ज्यापक्षीं त्यांच्या अंगीं स्वरक्षणाची शक्ति आहे असें दृष्टीस येतें त्यापक्षीं मीही आतां त्यांच्या मदतीस जाणार. इकडे राजासाहेब याला मराठे लोक निघाले हें कळलें. त्यावरून आपण त्वरा करणें अवश्य आहे असें तो समजला. त्यानें प्रथम सलगीचें बोलणें चालविलें. आणि क्लैव याला पुष्कळ लांच देण्याचें कबूल केलें. परंतु तो तें धिक्कारितो असें पाहून त्यानें अशी शपथ घेतली कीं, माझें बोलणें जर कबूल न झालें तर मी लागलीच किल्ल्यावर हल्ला करीन, आणि आंतील प्रत्येक मनुष्याची कत्तल उडवीन. तें ऐकून क्लैव यानें आपल्या नेहमीच्या मगरुरीच्या रीतीनें असें उत्तर पाठविलें कीं, तुझा बाप पुंड आहे; त्याचा वारसा राज्यावर नाहीं; तुझें सैन्य बाजारबुणग्यांनीं भरलेलें आहे; ज्या तटाचें रक्षण इंग्रजी शिपाई करीत आहेत त्याजवर असे गांडू लोक पाठविणें ते पूर्ण विचार करूनच पाठवावे.

या नंतर राजा साहेबानें किल्ल्यावर हल्ला करण्याचा निश्चय केला. अशा धिट्टाईच्या युद्धप्रसंगाला जो दिवस नेमला तो फार योग्य होता. मोहरम, ह्मणजे अल्लीचा मुलगा हुसेन याच्या स्मरणार्थ जो मुसलमान लोकांचा मोठा सण आहे तो त्यादिवशीं होता. ज्या गोष्टीवरून तो उपस्थित झाला तिजसारखी मनास लागण्यासारखी गोष्ट सगळ्या मुसलमानधर्माच्या इतिहासांमध्यें दुसरी एक देखील नाहीं. फतिमेच्या पक्षाचा सरदार हुसेन, याचे सर्व शूर अनुयायी जेव्हां त्याच्या आसपास मरून पडले तेव्हां त्यानें अखेरचा पाण्याचा घोट घेऊन शेवटची ईश्वराची प्रार्थना केली; तो मारला गेल्यावर मारेकऱ्यांनीं त्याचें डोकें आपल्या सरदाराकडे नेलें, तेव्हां त्यानें तें निर्जीव हें माहीत असून काठीनें त्याच्या मुखावर मारलें. आपल्या पैगंबरानें याच मुखाचें कैकवेळा चुंबन केलें होतें, असें पाहिलेले जे थोडे कोणी वृद्ध वृद्ध मुसलमान लोक तेथें होते ते रडूं लागले. ही सर्व हकीकत हसन आणि हुसेन यांच्या कादंबरीमध्यें लिहिलेली आहे, ती मुसलमान लोकांच्या मनामध्यें अशी बिंबून गेलेली आहे कीं, तिला होऊन आज बाराशें वर्षें झालीं तरी हे वरील दिवस आले ह्मणजे हिंदुस्थानांतील जे धार्मिक मुसलमान आहेत त्यांच्या मनामध्यें मोठे दुःखकारक विचार उत्पन्न होतात व त्यांस मोठा आवेश येतो. त्या दिवशीं ते असा शोक करितात आणि त्यांस आवेशही इतका येतो कीं, कितीएक लोक त्या आवेशांत प्राणासही मुकले आहेत

असें सांगतात. त्यांचा असा विश्वास बसून गेला आहे कीं, काफर लोकांबरोबर लढून या दिवशीं जो आपला प्राण देईल, त्याच्या सर्व जन्मांतील सर्व पापाचा परिहार होऊन, तो एकदम स्वर्गीं रंभांनीं भरलेल्या बागांमध्यें जाऊन पोंचेल. तर अशा या दिवशीं राजासाहेब यानें हल्ला करण्याचा निश्चय केला; आणि वरील गोष्टीवरून जो धर्माचा आवेश यावयाचा तो अधिक वाढण्याकरितां भांग वगैरे मादक पदार्थ आपल्या लोकांकडून खाववून हल्लयास आरंभ केला.

हा हल्ला होणार ही बातमी क्लैव याला आंतून कळल्यामुळें त्यानें आपली सर्व तयारी करून ठेविली होती आणि थकून आंथरुणावर पडला होता, इतक्यांत गडबड झाली; तेणें करून तो उठून लागलाच आपल्या हुद्यावर हजर झाला, आणि शत्रु चाल करून येत आहेत असें पाहिलें. त्यांच्या सेनेच्या अग्रभागीं हत्ती होते, व त्या हत्तींच्या डोक्याला लोखंडाचे पत्रे बांधिलेले होते, त्यामुळें त्यांच्या धक्यानें किल्लयाचे दरवाजे उघडले जातील असें वाटलें होतें. परंतु इंग्रजी बंदुकींतून जेव्हां गोळयांचा भडेमार होऊं लागला, तेव्हां हीं विशाळ जनावरें भिऊन परतलीं. आणि पळतांना आपल्याच सेनेंतील पुष्कळ लोकांना त्यांनीं तुडवून टाकिलें. खंदकामध्यें जेथें पुष्कळ पाणी होतें तेथें शत्रूंनीं लांकडाचा ताफा घातला. हें क्लैव यानें पाहिलें आणि आपल्या त्या ठिकाणच्या गोलंदाजांस बरोबर काम चालवितां येत नाहीं, हें लक्षांत आणून तो आपणच एक तोफ चालवूं लागला आणि

थोडावेळ झाला नाहीं तोंच त्यानें त्या ताफ्याचे धुडके उडवून दिले. जेथें खंदक सुकून गेलेला होता तेथून हल्ला करणाऱ्या लोकांनीं चढण्याचा मोठ्या धिट्टाईनें आरंभ केला; परंतु त्यानें त्यांवर असा झपाट्यानें व कुशलतेनें मार सुरू केला कीं, ते लोक अमलानें व धर्माच्या पिशानें बेफाम होऊन गेले होते. तरी त्यांच्यानें त्यापुढें टिकाव धरवेना. इंग्लिश लोकांची फौज मागें होती ती पुढच्यांना बंदुका भरून देत असे, आणि पुढचे लोक असे नेम धरीत कीं, त्यांची एकही गोळी फुकट जात नसे. मुसलमान लोक तीन वेळा निकरानें चढाव करून अखेरीस खंदकाच्या मागें निघून गेले.

ही लढाई सुमारें एक तास चालली तितक्यांत शत्रूचे चारशें लोक पडले; परंतु किल्ल्यांतील फौजे-पैकीं पांच किंवा सहा असामी मात्र पडले असावे. इतकें झाल्यावर रात्र पडली. त्यामुळें लढाई थांबली, तथापि क्लैव याला पुनः हल्ला होईल अशी धास्ती होतीच. परंतु सूर्योदय झाल्यावर पाहतो तों शत्रु कोठें नाहींत. त्यांनीं पळतेवेळीं तोफा व दारूगोळा वगैरे लढण्याचें पुष्कळ सामान टाकून दिलें होतें तें इंग्रजांच्या हातीं लागलें.

ही बातमी सेंत जार्ज किल्ल्यामध्यें पोंचल्यावर तेथील लोकांस मोठा आनंद झाला व अभिमान वाटूं लागला. आणि कोणत्याही सेनेच्या सरदारीचें काम क्लैव याला सांगितलें असतां तो तें करण्यासारखा आहे असें त्यांस अर्थातच वाटूं लागलें. त्यांनीं

त्याच्या मदतीला दोनशें इंग्रजी शिपाई व सातशें काळे शिपाई पाठवून दिले. हे जेव्हां त्याला जाऊन मिळाले तेव्हां आपला बचाव करूनच न राहतां तो शत्रूवर हल्ला करूं लागला. त्यानें तिमरी किल्ला घेतला, आणि मुराररराव याच्या एका टोळीला मिळून मजल दरमजल जाऊन राजासाहेब यावर हल्ला केला. त्यावेळीं राजासाहेब याजवळ पांच हजार लोक होते त्यांत तीनशें फ्रेंच होते. ही लढाई निकरानें झाली; तींत क्लैव याचा पूर्ण जय झाला. राजासाहेब याचा दारूगोळा विजयी सेनेच्या हातीं लागला व त्याच्या सेनेंतून सहाशें शिपाईलोक येऊन क्लैव याला मिळाले. त्याला त्यानें आपल्या चाकरीस ठेविलें. पुढें कंजी-वरम हें शहर लढल्याशिवाय त्याच्या हातीं आलें; व अर्नी येथील किल्लेदार यानें चंदासाहेब याचा पक्ष सोडून महंमदअल्ली हाच राजा कबूल केला.

यावेळीं लढाईचें सर्व काम जर क्लैव याजवर सोंपलें असतें, तर त्यानें ती बहुधा लवकरच तडीस नेली असती; परंतु इंग्लिश लोकांच्या कारभारांत जेथें तो नव्हता तेथें भित्रेपणा आणि गैरहुशारी असे, त्यामुळें ती लढाई लांबणीवर पडली. मराठे लोक हळु-हळू असें ह्मणूं लागले कीं, आपण अन्यत्र जी इंग्रजी फौज पाहिली तिजपेक्षां क्लैव याची सेना कांहीं निरा-ळ्या जातीची असावी. परंतु इंग्रजी कारभाऱ्यांच्या दीर्घसूत्रीपणामुळें राजासाहेब यानें लवकरच पुष्कळ फौज जमा केली; तींत चारशें फ्रेंच लोकही आले होते. ती सेंत जार्ज किल्ल्याशीं अगदीं येऊन भिडली, आणि

शहराबाहेरचे जे बंगले व बगीचे वगैरे होते ते सर्व तिनें जमीनदोस्त करून टाकिले. परंतु क्लैव यानें पुनः लागलेंच त्यांजवर जाऊन त्यांचा पराभव केला; त्यांत शंभरांपेक्षां अधिक फ्रेंच लोक शत्रूच्या हातीं लागले व मारले गेले. हा नाश हजारो काळे लोक मारण्यापेक्षांही जास्त होता. क्लैव यानें आपली फौज रणभूमीवरूनच सेंतदेविद किल्ल्यावर चालविली. वाटेमध्यें दुप्ली याच्या नांवानें वसलेलें फतियाबाद शहर व हिंदुस्थानामध्यें फ्रेंच लोकांच्या झालेल्या जयाचें स्मरण राहावें ह्मणून त्यांनीं उभारलेला भव्यस्तंभ हीं क्लैव यानें जमीनदोस्त करण्यास हुकूम केला. असें करण्यास तो आपल्या किंवा आपल्या लोकांच्या दुष्टबुद्धीनें प्रवृत्त झाला असें वाटत नाहीं. तर स्वदेशाच्या कल्याणाकडे योग्य व दूरवर दृष्टि देऊन त्यानें हें कृत्य केलें. हें शहर व याचें डौलदार नांव आणि हा स्तंभ व यावरील लढाईचे लेख यांच्या योगेंकरून आपल्या देशाविषयीं हिंदुस्थानांतील लोकांच्या मनांत मोठा धाक राहावा असें दुप्ली यानें केलें होतें. हा धाक उडवणें हें क्लैव यास अवश्य होतें. कां कीं, एतद्देशीय लोकांच्या मनांत असा ग्रह उत्पन्न झाला होता कीं, सर्व युरोप खंडामध्यें फ्रान्स देशाचेंच महत्व काय तें विशेष, आणि तें तसें नाहीं असें ह्मणण्यास इंग्लिश लोकही धजत नाहींत. यासाठीं हा भ्रम उडविण्यास हीं त्यांच्या जयाचीं चिन्हें उघड रीतीनें आणि निर्भयपणानें मोडून टाकणें हाच उत्कृष्ट मार्ग होता.

या बिना घडून आल्यामुळें मद्रास येथील कारभा-

त्यांना उत्तेजन येऊन त्यांनीं क्लैव याच्या हाताखालीं एक मजबूद टोळी देऊन त्याला त्रिचनापल्ली येथील लोकांच्या मदतीस पाठविण्याचा निश्चय केला. इतक्यांत मेजर लारेन्स विलायतेहून आला, तेव्हां त्याजकडे सेनेचें मुख्य काम आलें. क्लैव हा शाळेंत असतां व दुकानावर असतां स्वेच्छेनें चालत असे, व दुसऱ्याच्या अमलाखालीं राहण्यास खुषी नसे; यावरून असे पराक्रम केल्यानंतर हा हाताखालच्या अधिकारांत संतोषानें व आस्थेनें काम करील असें वाटलें नव्हतें; परंतु पूर्वीं लारेन्स यानें त्याजवर ममता केली होती, आणि क्लैव हा गर्विष्ठ व कुर्रेवाज जरी असे तरी कोणी त्याजवर ममता केली तर ती तो विसरत नसे; याकारणामुळें तो मुख्य अधिकार मिळाला असतां जसें आस्थेनें काम करिता तसेंच आपल्या जुन्या कल्याणकर्त्याच्या हाताखालीं मिळालें असतांही करूं लागला, हें सांगणें अवश्य आहे. लारेन्स याला याच्या साह्यापासून काय फायदा होईल तें कळत होतें. त्याला स्वतः विशेष बुद्धि नव्हती. त्याची सामान्य समजूत मात्र बरी होती. परंतु जो बुद्धिमान् क्लैव साहेब त्याला मदत करीत होता त्याचे गुण तो समजून होता. लढाईच्या कवाइतीविषयीं त्याचा अभ्यास पहिल्यापासून शिस्तीनें झालेला होता. जे लोक कोणताही एकादा धंदा जन्मापासून शिकतात त्यांना दुसऱ्या धंद्यांतील लोक येऊन आपल्या धंद्यांत ढवळाढवळी करूं लागले असतां आवडत नाहीं असा सामान्य नियमच आहे. लारेन्स यासही सामान्यतः अशी

ढवळाढवळ आवडत नसे, तरी क्लैव हा उगीच ढवळा-
ढवळ करणारा नव्हे, असें त्यास पक्कें समजत होतें.
त्यानें एका ठिकाणीं असें लिहून ठेविलें आहे कीं,
"कितीएक लोक कप्तान क्लैव हा नशीबवान् आहे
असें ह्मणतात; परंतु त्या गृहस्थाची मला जी माहिती
आहे तिजवरून मला असें वाटतें कीं, ज्या ज्या गोष्टी
त्याला प्राप्त झाल्या आहेत त्या त्या त्याच्या गुणांप्रमाणें
त्यास योग्यच आहेत. त्या त्याच्या योग्यतेपेक्षां अधिक
आहेत असें नाहीं. हा मनुष्य निश्चयाचा मोठा
बळकट, याचा स्वभाव शांत, हा कोणत्या व कशाही
प्रसंगीं कधींही न गडबडणारा, शिपाईगिरी ह्मटली
ह्मणजे याच्या आंगचा सहज स्वभावच; कारण लढा-
ईच्या कामासंबंधी त्याला कोणत्याही प्रकारचें शिक्षण
नसतां अथवा लढाऊ लोकांबरोबर याचें फारसें बोलणें
चालणें झालें नसतां यानें स्वबुद्धीनें व तारतम्यानें
अशा एखाद्या वाकबगार व शूर योध्याप्रमाणें आणि
शहाणपणानें आपली फौज लढविली कीं, त्याचा जय
हटकून व्हावाच."

या दोन्ही स्नेह्यांबरोबर टक्कर देण्यासारखा फ्रेंच
लोकांचा सरदार कोणीच नव्हता. हिंदुस्थाना-
मध्यें राज्यक्रांति झाल्या त्यांमध्यें जे प्रमुखप्रमुख
युरोपियन लोक होते त्यांप्रमाणेंच डुप्ली याची
मसलती करणें व बोलणीं करणें यांमध्यें बुद्धिमत्ता
होती, तरी स्वतः हातांत तरवार धरण्याची योग्यता
त्याच्या आंगीं नव्हती. तो शिपाईगिरीचें काम शिक-
लेला नव्हता, आणि तें करण्याची त्याला गोडीहि

नव्हती. त्याचे शत्रु त्याला मित्रा असें ह्मणत. तो असें ह्मणत असे कीं, मी बंदुकीचा आवाज आपल्या कानीं पडूं देत नाहीं याचें कारण असें कीं, स्वस्थता आणि शांतता असल्यानें माझी बुद्धि चांगली राहते. गोळ्यांचा भडेमार चालला असतां मला विचार करितां येत नाहीं त्यामुळें याचे जे मोठाले लढाईचे बेतबात ते तडीस नेणें याला दुसऱ्याकडे संपविणें पडे. आणि हा असें गाऱ्हाणें करीत असे कीं, मला आजपर्यंत जे सरदार मिळाले त्यांत बुसीखेरीज माझ्या बेतास कोणीच उतरला नाहीं. बुसी हा यावेळीं सेना घेऊन निजामाबरोबर उत्तरेस गेला होता, आणि तेथें तो त्याच्या दरबारामध्यें होणारे आपले व आपल्या देशाचे फायदे साधण्यांत गुंतला होता. बाकी दुप्ली याजवळ सरदार राहिले होते, त्यांमध्यें हुशार असा एकही नव्हता व कितीएक अगदीं अल्पवयस्कच होते. त्यांच्या चुका व मूर्खपणा पाहून सामान्य शिपाईलोकही हंसत असत.

चोहींकडे इंग्लिश लोकांचा जय होत चालला. त्रिचनापल्ली शहरास ज्यांनीं वेढा दिला होता त्यांसच आतां इंग्रजांचा वेढा पडल्यामुळें त्यांस शरण जाणें प्राप्त पडलें. चंदासाहेब हा मराठ्यांच्या हातीं सांपडला आणि तो मारलाही गेला. हें कृत्य त्याचा प्रतिस्पर्धी महंमदअल्ली याच्या सांगणीवरून बहुधा झालें असावें. इतकें झालें तथापि दुप्ली यानें आपली हिम्मत सोडिली नाहीं. आणि त्याच्या मसलतीही संपल्या नाहींत. त्याचे युरोपांतील धनी त्याला मदत करीनातसे झाले, त्याच्या

कारभाराची रीत त्यांला पसंत पडेना. ते त्याला द्रव्याची मदत करीनात, आणि शिपाई पाठवणें तीं तर असलीं फुसकीं माणसें पाठवीत कीं, त्यांस कोणी फुकट देखील ठेवणार नाहीं. तथापि दुप्ली यानें आपल्या मसलती सोडल्या नाहींत, त्यानें हरतऱ्हा केल्या—ह्मणजे आंतून कारस्थानें चालविलीं, लांच दिले, वचनें दिलीं, आपलें खासगी द्रव्य खर्चिलें, आपली जितकी पत होती तितकीचाही उपयोग करून घेतला. दिल्लीहून नव्या सनदा आणिल्या, मद्रासेवर चोहींकडून शत्रु उठवले; इंग्रजी कंपनीचे जे दोस्त होते त्यांतूनही कितीएकांस सामील करून घेतलें; तथापि तें सर्व व्यर्थ गेलें आणि हळुहळू इंग्लिशांची सत्ता एकसारखी वाढत चालली, आणि फ्रेंचांची कमी होत चालली.

क्लैव हा हिंदुस्थानांत असतां त्याची प्रकृति कधीं चांगली अशी नसेच; आणि या वेळीं तर ती इतकी बिघडून गेली होती कीं, त्यानें इंग्लंदास परत जाण्याचा निश्चय केला. परंतु तिकडे निघून जाण्याच्या पूर्वींच त्यानें एक मोठें जोखमीचें काम पत्करिलें. आणि तें नेहमीप्रमाणें मोठ्या कौशल्यानें व झपाट्यानें सिद्धीस नेलें. कोवलांग आणि चिंगलीपट्ट ह्मणून दोन किल्ले फ्रेंचसेनेच्या स्वाधीन होते, ते घेण्यासाठीं त्यांजवर फौज पाठविण्याचा मद्रासच्या इंग्लिश अधिकाऱ्यांचा निश्चय झाला; परंतु या कामाकडे पाठविण्यास जी वारीस येण्यासारखी फौज होती ती अशा प्रकारची अडाणी होती कीं, तिचें आधिपत्य क्लैवखेरीज दुसरा कोणीच सरदार न पत्करता. तिजमध्यें

अगदीं नवीन ठेवलेले असे पांचशें काळे व इंग्लंदांतून नूतनच आलेले असे दोनशें गोरे लोक होते. हे दोनशें लंदनामध्यें अगदीं हलकटप्रतीचे व वाईट भिकार लोक कांहीं लालूच वगैरे लावून फसवून गलबतांत घालून पाठवून दिलेले होते. क्लैव हा दुखणाईत असून थकून गेलेला होता तरी त्यानें या अडाणी बुणग्याचें सैन्य बनविण्याचें पत्करिलें; आणि त्यांना घेऊन तो कोवलांग येथें गेला. तेथें गेल्यावर किल्ल्यांतून आलेली गोळी लागून या नामधारी विलक्षण शिपायांपैकीं एकजण मेला; तें पाहून बाकीच्या सर्वांनीं पळ काढला. तेव्हां त्यांना पुनः जमविण्यास क्लैव याला मोठे आयास पडले. दुसऱ्या एका प्रसंगीं तोफेचा आवाज ऐकूनच पाहारेकरी इतके भिऊन गेले कीं, त्यांतून एकजण जो पळून गेला तो कांहीं तासानंतर एका विहिरीमध्यें सांपडला. परंतु शेवटीं क्लैव यानें त्यांस हळुहळू रणांत टिकाव धरण्याची संवय लावली आणि मोठमोठ्या भयंकर ठिकाणींही आपण निर्भयपणें वारंवार जाऊन त्यांच्या मनांत लज्जा उत्पन्न करून त्यांस धैर्य आणिलें. अशी ही टोळी वाईट असतांही त्यानें अखेरीस ती बरीच तयार केली. पुढें कोवलांग त्याच्या हातीं आलें, तों इतक्यांत त्याला असें कळलें कीं, त्या शहराच्या मदतीला चिंगलीपट्ट येथून बरीच कुमक येत आहे. तेव्हां त्यानें ती येण्याच्या पूर्वींच कोवलांग इंग्लिशांच्या हातीं लागलें हें त्यांना कळूं नये अशी तजवीज राखली आणि आपण त्यांच्या येण्याच्या रस्त्यावर एका ठिकाणीं दडून राहिला. ते

जेव्हां आले तेव्हां एक फैर झाडून शंभर असामी मारून टाकिले, तीनशें बंदीवान केले, आणि बाकीच्यांचा चिंगलीपट्टापर्यंत पाटलाग केला. तेथें जाऊन पोंचल्यावर त्या डोंगरी किल्ल्यास त्यानें एकदम वेढा दिला, तटाला एका ठिकाणीं वाट पाडली आणि तो हल्ला करून घेणार इतक्यांत तेथील फ्रेंचसेनापति याजवळून करार करून घेऊन याला शरण आला, आणि आपल्या लोकांसहित चालता झाला. चिंगलीपट्ट हा किल्ला मजबुदीविषयीं हिंदुस्थानांत फारच नामांकित होता.

याप्रमाणें क्लैव हा विजयी होऊन मद्रासेस परत आला, परंतु त्याची प्रकृति इतकी विघडून गेली होती कीं, त्याला तेथें आणखी राहणें अगदीं अशक्य होतें. यावेळीं त्यानें मास्कलीन या नांवाचा एक प्रख्यात जो गणितवेत्ता गृहस्थ त्याच्या तरुण बहिणीशीं लग्न केलें. ती सुंदर व शिकलेली अशी होती असें ह्मणतात. आणि असेंही सांगतात कीं, तिला क्लैव याजकडून आलेल्या पत्रावरून त्याची तिजवर खरी प्रीति होती.

लग्न झाल्यावर लागलाच क्लैव हा आपल्या पत्नीस घेऊन विलायतेस गेला. तो इंग्लंदास पोंचला तेव्ह दहा वर्षांच्या पूर्वीं जसा तेथें होता त्यापेक्षां अगदींच निराळा होऊन गेला. पूर्वीं हें एक निरुपयोगी भि कार पोर असें समजून त्याला हिंदुस्थानांत पाठविले होतें; परंतु आतां जरी तो फक्त सत्तावीस वर्षांचा होता तरी उत्तमप्रतीचे जे सरदार त्यांतीलच हा ए आहे असें त्याचे स्वदेशीय लोक त्यास मानूं लाग

होते. त्यावेळीं युरोपामध्यें जिकडे तिकडे स्वस्थता होती. कर्नाटकांत मात्र फ्रेंच आणि इंग्लिश या लोकांची लढाई चालली होती. दुप्लीनें जीं मोठमोठीं कारस्थानें चालविलेलीं होतीं तेणेंकरून लंडनच्या लोकांमध्यें बरीच काळजी उत्पन्न झाली होती. परंतु इंग्लंद व फ्रान्स यांच्या स्थितीमध्यें मुख्यत्वें क्लैव याच्या शौर्यानें व बुद्धिचातुर्यानें जो नवीन फेरफार होतहोता, तो पाहून लोकांना फार आनंद झाला होता. हा तरुण कप्तान असून याला इंदियाहौस येथें विनोदानें जनरल क्लैव असें ह्मणत असत. आणि दैरेक्टर लोक ज्या मेजवान्या करीत त्यांतही त्याच्या याच नांवानें ते दारू* पीत. तो इंग्लंदास पोंचल्यावर तेथील सर्व लोकांत आपली वाहवा होते असें पाहून त्यास आनंद झाला.

यानें आपली चाकरी चांगली बजाविल्याबद्दल ईस्तइंदिया कंपनीनें मोठ्या सन्मानदायक अशा शब्दांनीं त्याचे आभार मानले व त्याला एक रत्नखचित तलवार बक्षीस दिली. परंतु तो मोठ्या मर्यादेनें ह्मणाला कीं, आपण जशी कृतज्ञता मला दाखवितां, तशी माझा स्नेही व वरिष्ठ सरदार जो लारेन्स त्याला दाखविल्याशिवाय माझ्यानें ही तलवार घेववणार नाहीं.

---

* युरोपियन लोकांत ज्या कोणा मोठ्या मनुष्याची थोरवी वर्णावयाची असते व त्यास आरोग्यवृद्धि व्हावी अशी इच्छा असते त्याचें नांव घेऊन ते मेजवान्यांत दारू पितात असा संप्रदाय आहे. त. प्र. क.

क्लैव याचे जे संबंधी होते त्यांनीं तो परत गेल्यावर त्याचा मोठ्या हौसेनें आदरसत्कार केला असावा हें उघडच आहे. त्यांना त्याचा भरभराट पाहून फारच आनंद झाला; परंतु आपला पूर्वींचा हट्टी व आळशी बाब्या हा इतक्या थोरपणास कसा चढला असावा हें त्यांच्या लक्षांत येईना. त्याचा बाप तर या बातमीवर विश्वासच ठेवीना; परंतु अर्कीट येथील किल्ल्याचा बचाव त्यानें केल्याचा प्रकार इंग्लंदांत कळला, त्यावेळीं तो वृद्ध गृहस्थ ह्मणाला कीं, "माझ्या मुलाच्या आंगीं कांहीं पाणी आहे खरें." पुढें जसजशी याच्या पराक्रमाची बातमी अधिकाधिक येऊं लागली तसतसा तो त्याला अधिकाधिक शाबासकी देऊं लागला. अखेरीस त्याची आपल्या पुत्रावर फारच प्रीति बसली व तो त्याचा अभिमान बाळगूं लागला.

क्लैव हा परत गेल्यावर त्याच्या नातलगांना जो आनंद झाला त्याचें विशेष कारण हें कीं, त्याच्या वांट्याला लूट पुष्कळ आली होती, आणि त्यानें जातेवेळीं बरोबर बराच पैसा नेला होता. त्यांतून कांहीं त्यानें बापाला दिला, आणि त्याची हलाखी दूर केली. शिवाय त्यानें आपलें वडिलोपार्जित वतनही सोडविलें. बाकी जो पैसा उरला होता तो त्यानें सुमारें दोन वर्षांत उडवून टाकला असावा असें दिसतें. तो छानदार पोषाग करूं लागला, त्यानें गाडी ठेविली व खेरीज बसावयाचे घोडेही ठेविले; आणि तो मोठ्या डामडौलानें वागूं लागला. इतकेंही करून जो कांहीं पैसा

उरला होता तो त्यानें पार्लमेंताचा सभासद होण्यांत घालविला.

तो पार्लमेंतांत गेला न गेला तोंच त्याच्या पक्षाच्या प्रतिस्पर्ध्यांनीं त्याला तेथून काढून टाकला. व पुढें त्याला खर्चाचीही अडचण पडूं लागली, तेव्हां त्याची दृष्टि पुनः हिंदुस्थानाकडे लागली. ब्रितन देशाचा राज्यकारभार चालविणारे लोक व कंपनी हीं त्याला चाकरीस ठेवण्यास तयारच होतीं. त्यावेळीं कर्नाटकामध्यें इंग्रजांस अनकूल असा तह झाला होता. दुप्ली हा आपली अपार संपत्ति वहुतेक खर्चून स्वदेशीं परत गेला होता. तेथें त्याजवर कांहीं अपवाद येऊन आणि त्याचा छळ होऊन तो लवकरच मरण पावला. त्याच्या जागयावर हिंदुस्थानांत दुसरा कामगार आला होता. अशा गोष्टी झाल्या होत्या तथापि फ्रान्स आणि ग्रेतब्रितन यांच्यामध्यें लवकरच लढाई होईल असें दिसत होतें. त्यामुळें कंपनीच्या मुलखांत कोणी तरी हुशार योद्धा पाठवावा असा विचार ठरून दैरेक्तर लोकांनीं क्लैव हा सेंत देविद किल्ल्याचा गवर्नर नेमला. राजानेंही त्याला आपल्या सेनेमध्यें "लेफ्तेनेंत कर्नेल" हा हुद्दा दिला, आणि तो इ० सन १७५५ त पुनः हिंदुस्थानांत यावयास निघाला.

येथें येऊन पोंचल्यावर गिर्या ह्मणून जो किल्ला होता तो कंपनीच्या अमलांत आणण्याचें काम त्याजकडे प्रथम दिलें. हा किल्ला एका विकट खडकाच्या टोंकावर बांधलेला असून बहुतेक समुद्रानें वेष्टित होता. तेथें आंगऱ्या ह्मणून जो प्रख्यात चांचा होता

तो राहत असे. त्याच्या गलबतांनीं आरबी आखाता-मध्यें मोठी धुमाळी उडवून दिली होती. वात्सन झ-णून जो सरदार हिंदुस्थानच्या आसपासच्या समुद्राम-ध्यें इंग्रजी आरमाराचा अधिकार चालवीत असे, त्यानें आंगऱ्याचें आरमार जाळून टाकिलें आणि क्लैव यानें त्याच्या किल्ल्यावर जमिनीवरून हल्ला केला. तेव्हां तो किल्ला लवकरच इंग्रजांच्या हातीं आला. त्यांत पंध-रा लक्षांची लूट सांपडली ती या दोन्ही सरदारांनीं वांटून घेतली.

ही कामगिरी बजाविल्यानंतर क्लैव हा सेन्त देविद किल्ल्याच्या आपल्या गवर्नरीच्या हुद्यावर गेला. तेथें जाऊन दोन महिने झाले नाहींत तोंच त्याला एका राज्यकारस्थानाची वातमी लागली. तेव्हां तो स्वभावतः धीट व त्याचें मन चपळ यामुळें त्याला मोटा हुरूप आला.

तामर्लेन याच्या वंशाच्या अमलामध्यें जे प्रांत होते त्या सर्वांत बंगाल्यांत जशी संपत्ति होती तशी दुसऱ्या कोणत्याही प्रांतांत नव्हती. शेतकी व व्यापार हीं चालविण्यास याजमध्यें जशा स्वाभाविक सोई आहेत तशा दुसऱ्या प्रांतांत नाहींत. यामधून गंगानदीला शेंकडो फाटे फुटून ती समुद्रास जाऊन मिळते. तेणेंकरून झालेल्या पाण्याच्या समृद्धीमुळें जमीन इतकी पिकाऊ आहे कीं, तेथील वनस्पतींची शोभा समशीतोष्णकटिबंधांतील वसंतऋतूंतल्या प्रमाणें असते. भाताचें पीक त्या प्रांतांत जसें येतें तसें दुसऱ्या कोणत्याच येत नाहीं. मसाल्याचे पदार्थ

साखर, वनस्पतींपासून उत्पन्न होणारीं तेलें यांचें पीक तर इतकें विपुल होतें कीं, तें पाहून फारच आश्चर्य वाटतें. नद्यांमधून मासे इतके आहेत कीं, ते कधींच संपावयाचे नाहींत. समुद्राच्या किनाऱ्याबरोबर जीं बेटें आहेत त्यांमध्यें वस्ती नाहीं; आणि त्यांत रोगोत्पादक वनस्पति पुष्कळ वाढून गेल्या आहेत, व त्यांत हरणें व वाघ वगैरे फार आहेत; परंतु त्यांत मीठ पुष्कळ पिकतें व तें लोकांस मिळतें. ज्या गंगानदीच्या पाण्यानें जमिनीला असें मोठें पीक येतें तीच सर्व व्यापारास मुख्य साधन आहे. तिच्या दोन्ही किनाऱ्यांवर व तिला मिळणाऱ्या नद्यांच्या किनाऱ्यांवर श्रीमंत व्यापाऱ्यांनीं भरलेलीं अशीं मोठमोठीं बंदरें, मोठ्या सुशोभित राजधान्या आणि मोठीं पवित्र स्थानें वसलेलीं आहेत. या प्रांतांत पुष्कळ वर्षांपासून जुलूम चालला होता; परंतु या साहजिक सुबत्तेमुळें व विपुलतेमुळें दरिद्राचें कांहीं चाललें नाहीं. मुसलमान राजांनीं पुष्कळ जुलूम केला आणि मराठ्यांनींही पुष्कळ धुमाळी उडविली, तरी सर्व एशियामध्यें बंगालच्या संपत्तीच्या कीर्तीचा भंग झालाच नाहीं. त्याची खानेसुमारीही फारच वाढत चालली होती. या लोकांस पुरून जें धान्य उरे तेणेंकरून दूरदूरच्या प्रांतांचें संरक्षण होई, आणि यांतील मागांवर जीं तलम व नाजुक वस्त्रें होत तीं लंदन व पारिस येथील मातबर स्त्रिया वापरीत. या संपत्तिमान् प्रांतांत राहणारे लोक मृदु हवेच्यामुळें आणि स्वस्थपणाच्या उद्योगांत काळ घालवीत असल्या-

मुळें, त्यांच्या आंगचें कर्तेपण, व पाणी नाहींसें होऊन गेलें आहे; यामुळें युरोपांतील जे धीट व हिम्मतदार लोक त्यांच्या तुलनेनें पाहतां जसे एशिया खंडस्थ लोक नेभळे आहेत तसेच एशियांतील लोकांच्या तुलनेनें पाहतां बंगाली लोक हे नेभळे आहेत. युरोपांतील कोणा[१] एका प्रांतामध्यें दुसऱ्या एका प्रांताविषयीं अशी ह्मण पडली आहे कीं, त्यांतील जमीन पाण्यासारखी आहे आणि पुरुष बायकांसारखे आहेत. हें वर्णन गंगानदीच्या मुखाजवळचे जे लोक आहेत त्यांना तरी निदान पक्कें लागू आहे. बंगाली लोक जें जें करितात तें तें मंद रीतीनें करितात. घरांत बसून ज्या गोष्टी होणाऱ्या आहेत त्या त्यांना आवडतात. शरीरास मेहेनत देणें ह्मटलें ह्मणजे त्यांना धाक पडतो. ते वादविवादामध्यें पुष्कळ बोलतात आणि दगलबाजीचीं कारस्थानें करण्यांतही ते विलक्षण रीतीचे नेट धरणारे आहेत; परंतु ते बहुधा दांडगाईंत शिरत नाहींत आणि शिपाई तर बहुतकरून होतच नाहींत; सर्व हिंदुस्थानच्या सेनेमध्यें खरे बंगाली लोक शंभरजण देखील आहेत किंवा नाहींत याविषयीं संशयच आहे. स्वभावानें आणि परराज्याखालीं राहण्यास पूर्ण योग्य असे यांच्या सारखे लोक पृथ्वीमध्यें आजपर्यंत दुसरे कोठेंही झाले नाहींत असें ह्मटलें तरी चालेल.

---

१ कास्तेलियन लोक वालेन्सिया प्रांताविषयीं असें ह्मणतात.

युरोपांतील ज्या मोठ्या व्यापाऱ्यांच्या मंडळ्यांनीं हिकडे व्यापार चालविला त्या सर्वांच्या वखारी पुष्कळ दिवसांपासून बंगाल्यामध्यें झाल्या होत्या. फ्रेंच हे चंद्रनगर येथें राहिले होते व ते तेथें अद्याप आहेत. त्याच फांट्यावर त्याच्या उत्तरेस कांहीं अंतरावर दच लोकांनीं चिनसुरा येथें आपला कारखाना घातला होता, आणि त्याच्या आलीकडे समुद्राजवळ इंग्लिश लोकांनीं फोर्त विलियम किल्ला बांधला होता. त्याच्या आसमंतात् एक ख्रिस्तियन देऊळ व पुष्कळ वखारी तयार झाल्या होत्या. इंग्रजी कंपनीचे जे मुख्य कारभारी, त्यांच्या विस्तीर्ण घरांची रांग नदीच्या एका तीरावर लागली होती. त्याच्या शेजारीं एक मोठें एतद्देशीय लोकांनीं भरलेलें शहर जमत चाललें होतें. तेथें व्यापार सुरू झाला होता, आणि श्रीमंत हिंदु व्यापारीही येऊन राहिले होते; परंतु आतां चौरंगी येथील राजमंदिरें ज्या ठिकाणीं आहेत त्या ठिकाणीं पेंढ्यानें शाकारलेल्या थोड्या भिकारी खोपट्या मात्र होत्या. वाले किल्ला आणि कांप ह्मणजे ज्या ठिकाणीं सांप्रत सूर्यास्ताच्या वेळीं सर्व कलकत्त्यांतून फार सुशोभित गाड्या, घोडे वगैरे येतात, त्या ठिकाणीं पाणकोंबडे व सुसरी यांनीं भरलेलें असें जंगल होतें. ज्या जमिनीवर इंग्लिशांनीं ठाणें दिलें होतें तिचें ते इतर मोठ्या जमीनदाराप्रमाणें सरकारास भाडें देत असत, आणि इतर मोठ्या जमीनदारांप्रमाणेंच आपल्या हद्दींतील रयतेवर कांहीं अधिकारही चालवीत असत.

ह्या विस्तीर्ण बंगालप्रांत, ओढ्याप्रांत व बहार

प्रांत हे तिन्ही दिल्लीच्या बादशहाचा सुभेदार ज्याला इंग्लिश लोक अलिवर्दीखान ह्मणत, त्याच्या स्वाधीन होते. तो या वेळीं वस्तुतः इतर सुभेदारांप्रमाणेंच स्वतंत्र झाला होता. तो इसवी सन १७५६ त मरण पावला, आणि त्याच्या मागून त्याचा नातु सुराजउद्दौला वीस वर्षांच्या आंतील वयाचा होता तो त्याच्या अधिकारावर आला. एशियाखंडस्थ जे स्वेच्छाचारी व जुलमी राजे आहेत ते अगदीं हलकट प्रतीचे मानवी प्राणी ह्मटल्यास चिंता नाहीं. आणि हा तरुण दुर्दैवी मनुष्य तर त्या हलकटांतही अति हलकट होता. त्याची बुद्धि मुळापासूनच अल्प होती, आणि त्याचा स्वभाव मनमिळावू नव्हता. तशांत त्याला जें शिक्षण मिळालें होतें तें असें होतें कीं, त्याची बुद्धि जरी मोठी असती तरीही, तेणेंकरून ती गलित झाली असती आणि स्वभाव जरी थोर असता तरीही तो दुष्टच झाला असता. त्याला सयुक्तिक अयुक्तिक बोलण्यांतलें तारतम्य समजत नसे. कां कीं, त्याच्या बरोबर तसें बोलण्यास कोणी धजलाच नसे. तो फार आपलपोट्या होता. कारण आपणाविषयीं इतरांच्या मनांमध्यें चांगली इच्छा असेल तरच आपलें कल्याण आहे असें समजण्याचा त्याला प्रसंगच येत नसे अल्प वयांतच व्यभिचार करूं लागल्यामुळें त्याच्या बुद्धीचा व शरीराचा जोम जाऊन तीं दुबळीं झालीं होतीं. तो अमली पदार्थ फार सेवन करीत असे, यामुळें त्याची जी अल्पबुद्धि होती तीही फिरून गेल्यासारखीच होती. अति नीच लोकांपैकीं आर्जव कर-

णारे असे जे मनुष्य असत ते याचे निवडक स्नेही असत. त्यांच्या अंगीं नीचपणा आणि कनिष्ठ प्रतीच्या मस्कऱ्या करण्याची बुद्धि यांखेरीज दुसरा गुणच नसे. असें ह्मणतात कीं, एखादा मनुष्य अतिपापी झाला ह्मणजे त्याला दुष्टतेपासूनच समाधान प्राप्त होतें; आणि अपराध्यास शिक्षा देण्याची नसतां, अथवा एखादें अरिष्ट टाळावयाचें नसतां, अथवा दुसरा कोणत्याही प्रकारचा फायदा व्हावयाचा नसतां दुसऱ्यास झालेल्या दुःखाची वेदना पाहूनच त्यास समाधान वाटतें. अशाच पराकाष्ठेची नीच अवस्था त्याची झाली होती. लहानपणापासूनच पशु व पक्षी यांचे हाल करण्यामध्यें त्याला मौज वाटत असे; आणि जेव्हां तो मोठा झाला तेव्हां तर आपल्या बांधवजनांची विपत्ति पाहून तो विशेष संतोष पावत असे.

अशा प्रकारचा जो सुराजउद्दौला त्याच्या मनामध्यें लहानपणापासूनच इंग्लिशांविषयीं द्वेषभाव असे. असें असण्यास कांहीं कारण होतें असें नाहीं. तर त्याची केवळ लहरच तशी होती व त्याच्या कोणत्याही लहरीच्या आड येणाराही कोणी नसे. इंग्लिशांस लुटलें असतां आपणास पुष्कळ द्रव्य प्राप्त होईल असा त्याचा खोटाच ग्रह होऊन गेला होता. आणि कलकत्त्यांत जितकी संपत्ति आहे असें त्याला वाटलें होतें, तिजपेक्षां जरी ती अधिक असती तरी ती लुटून नेण्यापासून होणारा फायदा व नुकसान यांची तुलना केली असतां फायदा फारच कमी होणार होता. परंतु याची बुद्धि अगदीं कोती होती व

हा मूढ होता, यामुळें हें त्याच्या ध्यानांत आलें नाहीं. युरोपियन लोकांचा जो या देशांत व्यापार चालला होता त्याचें बंगाला हें मुख्य ठिकाण होतें, यामुळें याच्या जुलमानें जर युरोपियन लोक, तेथून जाते तर त्याच्या जमाबंदीस मोटी नुकसानी येणार होती. असें होतें तरी त्या लोकांबरोबर भांडण्यास त्यास लवकरच एक कारणही सांपडलें. तें असें कीं, फ्रान्स देशाबरोबर लढाई होणार या भयास्तव इंग्लिश लोकांनीं त्या नवाबाची परवानगी घेतल्याशिवायच आपल्या ठाण्याच्या मजबुतीसाठीं किल्ला बांधण्यास आरंभ केला होता. एक श्रीमान् एतद्देशीय गृहस्थ होता त्याला लुटण्याचें त्या नवाबाच्या मनांत होतें ह्मणून, तो आपला बचाव करण्यासाठीं कलकत्त्यांत जाऊन राहिला होता. त्याला इंग्लिश लोकांनीं आपल्या स्वाधीन केलें नाहीं ह्मणून सुराजउद्दौला हा मोठी सेना घेऊन कलकत्त्यावर चालून गेला.

दुप्ली याच्या लढायांच्या मसलतीमुळें मद्रास येथील कंपनीच्या नौकरांना व्यापाराखेरीज शिपाईगिरी व राज्यकारस्थान या दोन गोष्टींतही हुशारी संपादणें जरूर पडलें होतें; परंतु बंगाल्यामध्यें जे कंपनीचे नौकर होते ते अद्यापि केवळ व्यापारीच राहिले होते; ते ही हल्ल्याची बातमी ऐकून अगदीं भिऊन व गोंधळून गेले. तेथील गव्हर्नरानें सुराजउद्दौल्याच्या दुष्टपणाविषयीं पुष्कळ गोष्टी ऐकिल्या होत्या. तो तर अगदीं घाबरून जाऊन होडींत बसला आणि जें तारूं जवळच नजरेस पडलें त्यांत शिरला. तेथील

फौजेवर जो मुख्य होता त्यासही असें वाटलें कीं, आपणही हाच उत्तम किल्ला घ्यावा. आणि याप्रमाणें त्यांनीं केल्यामुळें सुराजउद्दौला यास कलकत्ता येथील किल्ला घेण्यास विशेष आयास पडले नाहींत. किल्ला हस्तगत झाला तेव्हां विजयी फौजेच्या हातीं पुष्कळ इंग्लिश लोक लागले. नंतर कंपनीच्या दुकानांतील मुख्य दिवाणखान्यांत नवाब मोठ्या राजकीय डौलानें बसला आणि जे बंदीवान हातीं लागले होते त्यांपैकीं उंच पदवीचा मि. हालवेल ह्मणून एक गृहस्थ होता त्याजला आपल्या पुढें आणवून, " इंग्लिश लोक फार मस्त झाले आहेत व लूट पुष्कळ मिळाली नाहीं ह्मणून मी फार नाखुष आहें," वगैरे तो बोलला; परंतु "बंदीवानांच्या जिवास धोका नाहीं" असें वचन देऊन तो निजावयास गेला.

त्यानंतर जें कृत्य झालें तें विलक्षण क्रूरपणाचें झालें, असें हिंदुस्थानच्या इतिहासांत प्रख्यात होऊन गेलें आहे; परंतु पुढें त्याचा सूडही पक्काच उगवला गेला. नवाब निजावयास गेल्यानंतर पाहरेकरी लोकांना मर्जीस येईल त्याप्रमाणें इंग्लिश बंदीवानांस वागविण्यास सांपडलें. तेव्हां त्यांनीं असा निश्चय केला कीं, या किल्ल्यामध्यें जो तुरुंग आहे त्यांत बंदीवानांस रात्रभर ठेवावें. तो तुरुंग ह्मणजे केवळ एक खोलीच होती, ती " ब्लाक होल " ( अंधार कोठडी ) या भयंकर नांवानें प्रख्यात आहे. बंगालच्या हवेमध्यें एका युरोपियन बंदीवानाला देखील ती खोली लहान झाली असती; तिजम-

ध्यें जागा फक्त वीस फूट औरस चौरस होती. तींत हवा येण्याचीं भोकें होतीं तीं लहान होतीं व साफ मोकळीं नव्हतीं; त्यावेळेस दिवस भरउन्हाळ्याचे होते. बंगाल्यांत त्या ऋतूमध्यें युरोपियन लोक मोठमोठ्या प्रशस्त घरांत राहत असले आणि बसण्याच्या ठिकाणीं सदोदित पंखा चालला असला तरी त्यांच्यानें ती उष्णता सोसवत नाहीं. सर्व बंदीवान १४६ होते. जेव्हां वर सांगितलेल्या खोलींत जावयास सांगितलें तेव्हां शिपाई लोक आपली थट्टा करितात असें त्या विचाऱ्यांस वाटलें, आणि नवाबानें त्यांच्या जिवास धोका नाहीं ह्मणून वचन दिलें होतें त्यामुळें त्यांस धीर आला होता, ह्मणून हें बोलणें ऐकून ते हंसूं लागले व चेष्टा करूं लागले; परंतु त्यांची चूक लवकरच त्यांच्या नजरेस पडली. नंतर ते त्या पाहरेकऱ्यांची समजूत करूं लागले व आर्जव करूं लागले, परंतु सर्व व्यर्थ गेलें. पाहरेकऱ्यांनीं सांगितलें कीं, जे आंत जाण्यास कांकूं करतील त्यांना कापून काढूं. अशा प्रकारें त्या बंदीवानांना तरवारीच्या धारेच्या भयानें त्या लहानशा कोठडींत शिपायांनीं खचलें, आणि दरवाजा बंद करून कुलूप घातलें. त्या रात्रीं त्या बंदीवानांपैकीं जिवंत थोडेच राहिले. पण त्या लोकांचे जे हाल झाले, त्यांच्या खालोखाल देखील हाल झालेले इतिहासामध्यें किंवा कादंबरीमध्यें कोठें आढळत नाहींत. त्यांणीं आपल्यावर दया करावी ह्मणून आरोळ्या मारल्या व दरवाजा फोडण्याविषयीं प्रयत्न केला.

मि. हालवेल याचें अशा प्रसंगींही कांहीं धारिष्ट राहिलें होतें; त्यानें पाहरेकरी लोकांस पुष्कळ लांच देऊं केला; परंतु त्याला असा जबाब मिळाला कीं, नबाबाच्या हुकुमाशिवाय कांहीं करितां येत नाहीं, आणि नबाब तर निजला आहे, जर कोणीं त्याला जागें केलें तर तो कोपेल. असा जबाब मिळाल्यावर ते बंदीवान निराशेमुळें वेड लागल्यासारखे झाले. त्यांनीं एकमेकांस तुडविलें, खिडक्यांजवळच्या जाग्याविषयीं मारामाऱ्या केल्या आणि त्या दुष्ट पाहरेकऱ्यांस मध्यें कांहीं थोडी दया येऊन ते जें थोडें थोडें पाणी देत त्यासाठीं भांडणें केलीं. तसेच ते बरळूंही लागले, व ईश्वराची प्रार्थना करूं लागले, ईश्वराविषयीं अमर्याद बोलणीं बोलूं लागले, आणि अखेरीस आपणावर गोळ्या घालाव्या ह्मणून पाहरेकऱ्यांस विनवूं लागले. इकडे तुरंगावरील दरोगे गजांजवळ दिवे धरून आपल्या हातीं लागलेल्या लोकांचे वेड्यासारखे यत्न पाहून खदखदां हंसत. अखेरीस ती सर्व गडबड नाहींशी होऊन, हळूहळू श्वासोच्छ्वास व विलाप ऐकावयास येऊं लागले. पुढें सूर्योदय झाला आणि रात्रीच्या चयनबाजीच्या कृत्यांनीं आलेली धुंदी निद्रेच्या योगानें नाहींशी होऊन, नबाब जेव्हां सावध झाला तेव्हां त्यानें दरवाजा उघडण्यास हुकूम दिला. परंतु जे वांचले होते त्यांना काढण्यास मुरदे दोहीं बाजूंस रचून वाट करावी लागली. त्या आगीसारख्या हवेमुळें मुरद्यांना घाण देखील येऊं लागली होती. अखेरीस जेव्हां रस्ता झाला तेव्हां त्या खोलींतून एका-

मागून एक अशीं प्रेतकळा आलेलीं तेवीस मनुष्यें बाहेर पडलीं. त्या स्थितींत त्यांच्या आयांनींही त्या बिचाऱ्यांना ओळखिलें नसतें. पुढें एक खाडा खणला आणि त्यांत एकशें तेवीस प्रेतें मनास आलीं तशीं लोटून वर माती लोटली.

या गोष्टी होऊन आतां जरी शंभरांपेक्षां अधिक वर्षें होऊन गेलीं आहेत, तरीही त्या सांगितल्यास किंवा वाचल्यास अंगावर रोमांच उभे राहतात; परंतु ह्या दुष्ट नवाबाच्या मनांत दयेचा किंवा पश्चात्तापाचा लेशही उद्भवला नाहीं. ज्यांनीं हीं दुष्टकर्में केलीं त्यांजला त्यानें कांहीं शिक्षा केली नाहीं, अथवा जे वांचले त्यांजवर दयाही केली नाहीं. ज्या कितीएकांपासून कांहीं मिळावयासारखें नव्हतें त्यांना त्यानें जाऊं दिलें खरें, परंतु जुलूम जबरदस्ती केली असतां ज्यांपासून कांहीं निघण्याची आशा होती त्यांजवर अतिशयच क्रूरपणा केला. हालवेल याला चालण्याचें सामर्थ्य नव्हतें तरी तसेंच त्याला त्या दुष्टापुढें नेलें. नंतर तो नवाब त्याजला पुष्कळ दुर्वचनें बोलला. त्यानें त्यास धाक घातला आणि दुसऱ्या कितीएकांस कंपनीच्या खजिन्याची माहिती असून ते सांगत नाहींत असें वाटलें त्यांजबरोबर हालवेल याला बेड्या घालून मुलखांत पाठवून दिलें. रात्रीं जे झालेले हाल वर सांगितले त्यांच्या योगें हे लोक अद्यापि व्याकुळ होतेच, तरी वाटेंत त्यांना भिकार झोंपड्यामध्यें उतरीत असत, आणि धान्य व पाणी यांशिवाय कांहीं खावयास घालीत नसत.

अखेरीस नवाबाच्या आप्त कांहीं स्त्रिया होत्या त्यांनीं मध्यस्थ केल्यामुळें त्या विचाऱ्यांची सुटका झाली. जे लोक बचावले होते त्यांत एक स्त्री होती तिला नवाबाच्या जनानखान्यांत मुर्शिदाबाद येथें ठेविली.

इकडे सुराजउद्दौला यानें आपला जो नामधारी स्वामी त्याला मोठ्या गौरवानें आपल्या जयाचीं पत्रें लिहून दिल्लीस पाठविलीं, फोर्त विलियम किल्ल्यांत आपली फौज ठेविली; इंग्लिश लोकांना त्याच्या आसपास राहावयाचें मना केलें; आणि असा हुकूम दिला कीं, या मोठ्या कृत्याचें स्मरण राहण्यासाठीं कलकत्याला "अलिनागोर" ह्मणजे अल्लाचें बंदर असें ह्मणावें.

कलकत्ता हातांतून गेल्याची बातमी मद्रासेस आगस्ट महिन्यामध्यें पोंचली. तेव्हां सर्वांच्या मनांत अतिशय त्वेष उत्पन्न झाला आणि सूड उगवावा असें सर्व ह्मणूं लागले. ही बातमी पोंचल्यापासून अठ्ठेचाळीस तासांचे आंत असा निश्चय झाला कीं, फौज गलबतांत घालून हुगळी येथें पाठवावी, आणि तींतील जमिनीवरील फौजेची सरदारी क्लैव याजला द्यावी, आणि पाण्यांतील फौजेची वात्सन याजकडे ठेवावी. असा बेत होऊन ९०० इंग्रजी हुशार व दमदार असें पायदळ, व १,५०० काळे शिपाई त्यांनीं गलबतावर चढविले. हे अकटोबर महिन्यामध्यें निघाले; परंतु उलटा वारा लागल्यामुळें दिसेंबरपर्यंत बंगाल्यांत जाऊन पोंचले नाहींत.

नवाब हा आपल्यावर कोणीं येत नाहीं अशा

भ्रमांत मुर्शिदाबाद येथें मजा मारीत होता. इतर देशाविषयीं त्याचें अज्ञान असें विलक्षण होतें कीं, सर्व युरोपखंडामध्यें १०,००० लोक नाहींत असें तो वारंवार ह्मणत असे; आणि इंग्लिश लोक आपल्या राज्यावर स्वारी करण्याचा धीर करतील असें त्याच्या स्वप्नीं देखील आलें नव्हतें. अशा प्रकारें त्यांच्या लढण्याच्या सामर्थ्याविषयीं जरी त्याला कांहीं भय नव्हतें, तरी ते गेले हें त्याला चांगलें जाणवलें. त्याची जमाबंदी पुष्कळ कमी झाली, आणि त्याच्या पदरच्या लोकांनीं त्याची अशीही समजूत पाडिली कीं, व्यापारी लोकांच्या सोन्यानें आणि जवाहिरानें भरले-ल्या पेट्या हातीं लागण्यासाटीं त्यांना छळण्यापेक्षां ती संपत्ति उघड रीतीनें त्यांना भोगूं देणें यामध्यें राजाचा कधीं कधीं अधिक फायदा असतो. या गो-ष्टीमुळें कंपनीला पुन्हा व्यापार सुरू करण्याची पर-वानगी देण्याचें त्याच्या मनामध्यें आलें होतें; इतक्यांत इंग्लिश लोकांचीं तारवें हुगळीमध्यें येऊन दाखल झालीं, अशी बातमी त्याला कळली. हें कळतांच त्यानें आपली सेना मुर्शिदाबाद येथें तयार करण्यास हुकूम दिला, आणि कलकत्यावर स्वारी सुरू केली.

इकडे क्लैव यानें लढाईचें काम आपल्या नेहमीच्या हुशारीप्रमाणें सुरू केलें. त्यानें बजबज हें ठिकाण आपल्या हस्तगत करून घेतलें, फोर्त विलियम यांतील फौजेला हांकून लाविलें, कलकत्ता पुनः मिळविला, आणि हुगळी लुटून फस्त केली. नबाब याच्या मनामध्यें इंग्लिश लोकांवर सहल नजर करण्याचें

आलेंच होतें; तशांत त्यांच्या हिमतीचीं आणि शक्तीचीं हीं उदाहरणें पाहून त्यांशीं गोडी ठेवण्याचा जो त्याचा उद्देश तो दृढ झाला. नंतर आपणावर आलेल्या सेनेचे जे सरदार त्यांजवळ त्यानें असें बोलणें लाविलें कीं, मी तुमचें पूर्वीचें व्यापाराचें ठिकाण तुमच्या स्वाधीन करतों व ज्यांचा तोटा झाला असेल त्यांचा तो भरून देतों.

क्लैव जातीचा शिपाई होता. त्याला असें वाटलें कीं, सुराजउद्दौला याजबरोबर गोडी गुलाबी करणें यांत आपली बेअब्रू आहे. परंतु त्याचा अधिकार थोडा होता. कंपनीच्या नौकरांची एक कमेटी होती तींत मुख्यत्वें करून कलकत्याहून पळालेले लोक होते; त्यांच्या स्वाधीन बहुतेक कारभार होता. या लोकांना आपापले तोटे भरून यावे व आपले हुद्दे पुन्हा मिळावे याविषयीं उत्सुकता प्राप्त झाली होती. तशांत युरोपामध्यें लढाई सुरू झाली आहे यामुळें फ्रेंच लोक कदाचित् आपणांवर हल्ला करतील, असें मद्रास येथील कारभाऱ्यांच्या मनामध्यें भय उत्पन्न झालें, त्यामुळें गेलेलें सैन्य परत यावें याविषयीं ते उतावीळ झाले.

या कारणांवरून नवाबाचें बोलणें पुष्कळ फायद्यांचें होतें, आणि लढाई झाली असतां जय कोणाचा होईल याविषयीं संशय होता. या गोष्टी मनांत आणून क्लैव तहाचें बोळणें लावण्यास कबूल झाला; तथापि या सर्व घाटाचा झेंडा आपल्या इच्छेप्रमाणें लागला नाहीं ह्मणून त्यानें आपली खिन्नता प्रदर्शित केली.

क्लैव याच्या चरित्राचें स्वरूप या तहापासून पुढें

फिरलें. आजपर्यंत हा दुसऱ्यांनीं सांगितलेला बेत मोठ्या धैर्यानें आणि हुशारीनें तडीस नेणारा फक्त शिपाई होता. यापुढें हा मुख्यत्वेंकरून राज्यकारस्थानी बनला असें समजलें पाहिजे. आणि त्याचे शिपाईगिरीचे बेत राज्यकारस्थानाच्या पोटचे असें मानलें पाहिजे. या नव्या धंद्यामध्यें यानें मोठी हुशारी दाखविली, आणि मोठी फत्ते मिळविली यांत भ्रांति नाहीं. परंतु हेंही निभ्रांत आहे कीं, ज्या कामामध्यें तो पडला त्यावरून याच्या अब्रूस मोठा डागही लागला.

क्लैव याला खरेपणा आणि अब्रू यांखेरीज दुसरें माहीतच नव्हतें असें जे लोक ह्मणतात त्याप्रमाणें आमचें मत नाहीं. परंतु कितीएक असेंही ह्मणतात कीं, जर आपला फायदा होत आहे तर फसवणें यांत क्लैव याच्या मनाला तिळमात्र खंती वाटत नसे, तर तसेंही आमचें मत नाहीं. क्लैव ह्यास स्वभावतः दगलबाजी अगदीं आवडत नसे असें आह्मांस वाटतें. तो धीट इतका होता कीं, कधीं कधीं अविचाराचीही कृत्यें करी; मोकळे मनाचा इतका होता कीं, कधीं कधीं जें बोलूं नये तेंच बोलून वेडेपणा करी; तो स्नेहाच्या ठिकाणीं मोठा निष्कपट असे, आणि वैर असलें तें उघड रीतीनें दाखवी. त्याच्या सांसारिक व्यवहारांत अथवा स्वदेशीय लोकांबरोबरच्या लौकिकी व्यवहारांत त्यानें कधीं दगलबाजी करण्याची बुद्धि दाखविली अशाविषयीं प्रमाण नाहीं इतकेंच नाहीं. तर तो शाळेमध्यें असतां कुस्त्या खेळत असे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

तेथपासून तों इंडिया हौस आणि पार्लमेंत यांमध्यें जे त्याच्या पुढें मोठमोठाले तंटे आले त्यांमध्यें, ह्मणजे आपल्याच जातीच्या लोकांबरोबर केलेल्या तंट्यांमध्यें त्यानें ज्या कांहीं चुक्या केल्या त्याही सर्व त्याच्या थोर व उदार बुद्धीपासूनच झाल्या; दगलबाजीपासून झाल्या नाहींत असेंच ह्मणणें रास्त दिसतें. आतां त्यानें येथें जी मोठी लबाडी केली ती करण्यांत त्याच्या मनांतला वास्तविक प्रकार असा दिसतो कीं, एशिया खंडांतील राज्यकारभार ह्मणजे केवळ जुवा आहे, त्यामध्यें कांहीं केलें तरी चिंता नाहीं अशी त्याची समजूत होती.

हिंदुस्थानच्या लोकांच्या नीतीचें आणि इंग्लंदच्या लोकांच्या नीतीचें मान हीं फारच निराळीं होतीं हें लार्ड क्लैव जाणून होता. विलायतेमध्यें जिला अब्रू असें ह्मणतात ती ज्यांस मुळींच नाहीं असे लोक, व जे विचार केल्याशिवाय एकदम वचन देतात आणि निर्लज्जपणें ते मोडतात व जे मुळीं खंती न बाळगतां आपला हेतु सिद्धीस नेण्यासाठीं लांच, खोटी शपथ, आणि खोटा कागद, हे उपाय योजितात, अशा मनुष्यांबरोबर आपली गांठ पडली आहे हें तो जाणून होता.

एशियाखंडस्थ लोकांची आणि युरोपखंडस्थ लोकांची नीति फार निरनिराळी आहे हें तो नेहमीं मनांत बाळगीत असे, असें याच्या पत्रांवरूनही दिसून येतें. त्याला असें वाटत असावेंसें वाटतें कीं, हिंदुस्थानच्या लोकांस जे निर्बंध नाहींत ते जर आपणास मात्र आपण लावून घेतले, आणि ते आपणाशीं असत्य बोलत

असतां आपण मात्र त्यांशीं सत्यच बोलत
आणि ते ज्या करारापासून आपला फायदा
तो कधीं पाळीत नसतां आपण मात्र त्यांजबरोबर
ला करार पाळून तोटा सोसून घेतला,तर अशा
बरोबर आपलें कांहींच चालावयाचें नाहीं. परंतु
असें वाटणें ही आमच्या मतें त्याची मोठी चूक हो
वर सांगितलेल्या चुकीच्या समजुतीमुळें हा हु
शिपाई व अब्रूदार असा इंग्लिश गृहस्थ असत
हिंदुस्थानांतील कपटानें व्यवहार करणाऱ्या लोकां
समोर जेव्हां येऊन पडला, तेव्हां तो त्यांच्याप्रमा
च कपटानें कारस्थानें करूं लागला, आणि म
त कांक्षा न बाळगितां लबाडी बोलणें, एका
स्तऐवजाच्या ठिकाणीं दुसराच दाखविणें, लो
दाखविणें आणि खोट्या सह्या करणें अशीं नीच क
करूं लागला.

इंग्रज लोक आणि नवाब यांच्या दरम्यान त
करण्याच्या कामांत वाल्सन नांवाचा एक कंपनीच
नौकर आणि उमीचंद म्हणून एक बंगाली गृहस्थ,
दोन मनुष्य मुख्यत्वें करून होते. उमीचंद हा कल
कत्त्यामध्यें मोटा श्रीमंत व्यापारी असून, नवाबानें
कलकत्त्यावर जी स्वारी केली होती तिजपासून त्याचा
फार तोटा झाला होता. व्यापारावरून इंग्रज लोकांशीं
प्रसंग पडत असल्यामुळें त्याला त्यांची पुष्कळ माहिती
झाली होती. यामुळें तो एतद्देशीय दरबार व इंग्लि-
श लोक या दोघांची मध्यस्थी करण्यास फार योग्य
होता. आपल्या लोकांवर त्याचें वजन पुष्कळ होतें.

याखेरीज चाणाक्षपणा, धूर्तपणा, पाठलाग करणें, मसलतीपणा, कुशलता, हे जे हिंदूंचे गुण ते त्याच्या अंगीं पुष्कळ वसत असून नीचपणा, दगलबाजी व अतिलोभ हे त्यांचे सर्व दुर्गुणही त्याच्या अंगीं वसत होते.

या व्यवहारामध्यें नवाबानें अतिशय अल्पदृष्टीची, हलकट विचाराची व बेभरंवशाची वर्तणूक केली. एकाद्या अल्पवयस्क मनुष्यास मोठा अधिकार प्राप्त होऊन मनास वाटेल त्याप्रमाणें वागावयास मिळालें ह्मणजे त्याच्या अंगीं विवेक न येतां तो हलकट वर्तणूक करतो असें आहेच. तोच प्रकार या नवाबाच्या बाबतींत झाला. त्यानें प्रथम कांहीं गोष्टी करण्याच्या कबूल केल्या, नंतर त्या करीत नाहीं ह्मणून सांगितलें; पुढें त्या कराव्या न कराव्या असा त्याच्या मनांत संशय येऊं लागला आणि अखेरीस युक्तीच्या द्वारें तो करार टाळावयाची तजवीज करूं लागला; एका वेळीं मोठा घाट घालून तो कलकत्त्यावर स्वारीस निघाला; परंतु इंग्लिश लोकांची सामना करण्याविषयीं खचीत तयारी आहे असें पाहतांच भिऊन तो मागें हटला आणि तुह्मी सांगाल त्याप्रमाणें तह करण्यास मी कबूल आहें ह्मणून बोलूं लागला; हा तह झाला नाहीं तोंच त्यानें इंग्लिशांच्या विरुद्ध दुसऱ्या तजविजी केल्या. चंद्रनगर येथें जे फ्रेंचकारभारी होते त्यांजबरोबर त्यानें कारस्थानें चालविलीं; बुसीयास दक्षिणेमधून हुगळी येथें सेना घेऊन बोलाविलें, आणि इंग्लिश लोकांना बंगाल्याच्या बाहेर घालवून देण्यास सांगितलें. हे सर्व घाट क्लैव व वाट्सन यांना

पुरते कळून आले होते; त्यावरून त्यांनीं दक्षिणहिं-दुस्थानांतून अथवा युरोपांतून नवी फौज येऊन फ्रेंचां-स मदत मिळण्याच्या पूर्वींच चंद्रनगरावर हल्ला करून एकदम पक्का निकाल करून टाकावा असा निश्चय केला. या स्वारीमध्यें पाण्यांतील फौजेवर वात्सन याचा हुकूम होता. आणि जमिनीवरील फौजेचें आधिपत्य क्लैव याजकडे होतें. या दोन्ही फौजांचा जय त्वरित आणि चांगला झाला. चंद्रनगरचा किल्ला, त्यांतील फौज, तोफा वगैरे सर्व सामान व दारू गोळा हीं इंग्लिशांच्या हस्तगत झालीं. आणि जे बंदीवान मिळाले त्यांत सुमारें पांचशें युरोपियन शिपाई होते.

इंग्लिश लोकांचे प्रतिस्पर्धी फ्रेंच हे त्यांबरोबर टकर देण्यास असतांही नवाब हा इंग्लिशांना भीत असे, व त्यांचा द्वेष करीत असे; आणि आतां तर फ्रेंचांचा पराभव झाल्यामुळें तो इंग्लिश लोकांस अधिकच भि-ऊं लागला, व त्यांचा द्वेषही अधिक करूं लागला. त्याची बुद्धि मंद व विचार अस्थिर असल्यामुळें आतां आपण इंग्लिशांस शरण जावें किंवा दांडगाई चालवा-वी याचा त्याच्यानें निश्चय होईना. एके दिवशीं त्यानें ज्या लोकांचा आपणाकडून तोटा झाला होता त्यांचा तो कांहीं अंशीं भरून देण्यासाठीं ह्मणून कल-कत्त्यास पुष्कळ द्रव्य पाठवून दिलें; परंतु दुसऱ्याच दिवशीं बुसी यालाही जवाहीर नजर पाठविलें, आणि-पत्र लिहिलें कीं "लढाईमध्यें मोठा शूर जो क्लैव त्या-जपासून बंगाल्याचें संरक्षण करण्यास तुह्मीं लवकर यावें." त्याच पत्रांत असेंही लिहिलें होतें कीं, "ईश्व-

र करो आणि त्याचें नशीब फिरो." पुढें त्यानें आपल्या फौजेला इंग्लिश लोकांवर चालून जावें ह्मणून हुकूम दिला, परंतु तो लागलाच फिरविला. त्यानें क्लैव याचीं पत्रें फाडून टाकिलीं; नंतर पुनः क्लैव याला मोठ्या बहुमानानें पत्र लिहून पाठविलें. पुढें त्यानें वात्सन याला आपल्या समोरून हांकून दिलें आणि तुला सुळावर चढवीन ह्मणून धाक घातला; परंतु पुन्हा वात्सन याला बोलावणें पाठविलें आणि त्याची हुर्मत घेतल्याबाबद त्याची क्षमा मागितली. इकडे त्याचा अतिवाईट राज्यकारभार, त्याचा मूर्खपणा, त्याचा ऐषआरामांत आयुष्य घालविण्याचा क्रम व अतिनीच लोकांवर लोभ येणें करून त्याची सर्व प्रजा, शिपाई, व्यापारी, कामगार, गर्विष्ठ व डामडौली मुसलमान, भित्रे, हवेतसे वांकणारे व कृपण असे हिंदु वगैरे या सर्वांस त्याचा त्रास आला. रायदुल्लभ ह्मणून त्याचा जमाबंदीकडील प्रधान, मीरजाफर त्याचा सेनाधिपति, आणि जगत् शेट ह्मणून जो त्यावेळीं सर्व हिंदुस्थानांत श्रीमान् सावकार होता तो, व आणखी कितीएक लोक मिळून त्यांनीं त्याचा नाश करण्याविषयीं एक जूट केला. हा बेत त्यांनीं इंग्लिश कंपनीच्या मुनिमाला सांगितला. आणि मुर्शिदाबाद येथें नवाबास जे नाखूष लोक होते आणि कलकत्ता येथें जी कमिती होती त्यांमध्यें बोलणीं सुरू झालीं.

कलकत्ता येथें जी कमिती होती तिजमध्यें प्रथम एक निश्चय होईना; परंतु क्लैव हा फितुराच्या तर्फेचा होता. त्याचा निश्चय व जोर विशेष असे यामुळें

प्रतिपक्षाचें कांहीं चाललें नाहीं. कमितीनें असा ठराव केला कीं, सुराजउद्दवला यास पदच्युत करून मीरजाफर यास बंगालच्या गादीवर बसविण्यास इंग्लिश लोकांनीं भरपूर मदत द्यावी आणि त्याबद्दल मीरजाफर यानें असें कबूल केलें कीं, कंपनीचा व तिच्या नौकरांचा जो तोटा झाला असेल तो मी पूर्ण भरून देईन व शिवाय सेना, आरमार व कमितींतील लोक यांना चांगलीं बक्षिसें देईन. सुराजउद्दवला याचे दुर्गुण, त्याच्या हातून इंग्लिश लोकांचें झालेलें नुकसान, तो जर तसाच राज्यावर असता तर इंग्लिश लोकांच्या व्यापारास जो बहुधा धोका येता तो या सर्व गोष्टी लक्षांत आणिल्या असतां त्याला पदच्युत करण्याचा जो निश्चय झाला तो अगदीं बरोबर होता असें वाटतें. परंतु क्लैव यानें या कामामध्यें जो कपटाचा व्यवहार केला तो मात्र ठीक केला असें म्हणतां येत नाहीं. त्यानें सुराजउद्दवला याला अशा प्रीतिभावाच्या शब्दांनीं पत्र लिहिलें कीं, तो अप्रबुद्ध राजा आपणास कांहीं भय नाहीं असें समजून कांहीं वेळ पर्यंत स्वस्थ राहिला. या पत्रास क्लैव हा “ सांतवन करणारें पत्र ” असें ह्मणतो. हें पत्र ज्या जासुदाबरोबर नबाबास द्यावयास दिलें होतें त्याजबरोबरच वात्सन याला द्यावयाला दुसरें एक पत्र दिलें होतें. त्यांत मजकूर असा होता कीं, मीरजाफर याला खात्रीनें असें सांगा कीं, तुम्ही भिऊं नये; ज्यांस पळणें ह्मणून कसें तें ठाऊकच नाहीं असे पांच हजार लोक घेऊन रात्रंदिवस मजला मारून मी तुमच्या कु-

मकेस येतों आणि अखेर पावेतों मी तुह्मांला सोडणार नाहीं.

जी मसलत इतकी पसरली होती, ती फार दिवस पर्यंत अगदीं गुप्त राहणें अशक्यच होतें. नवाबाच्या मनांत अंदेशा येण्यासारख्या कितीएक गोष्टी त्याच्या कानीं आल्या; परंतु नवीन नवीन कल्पना काढणारा जो उमीचंद तो विलक्षण रीतीनें व प्रसंग पडेल तशा युक्ति करून व खोटयाच गप्पा झोंकून नवाबाचें मन त्या त्या वेळीं लागलेंच स्वस्थ करीत गेला. याप्रमाणें जिकडे तिकडे सर्व यथास्थित चालून हे फितूर सिद्धीस जाण्याची वेळ आली; पण इतक्यांतच क्लैव याला असें कळलें कीं, उमीचंद हा आपणास बहुधा फसवणार. ह्या लबाड मनुष्यास क्लैव यानें त्याचा जो कलह्यामध्यें तोटा झाला होता त्या सर्वांबद्दल पुष्कळ पैका देण्याचें कबूल केलें होतें. त्यानें तर कामगिरी मोठी बजाविली होती, तेव्हां त्याची तितक्या पैक्यानें तृप्ति होईना. वरें, सर्व मसलतीची लगाम त्याच्याच हातीं होती. तो जर सुराजउद्दवला याच्या कानामध्यें एक शब्द बोलता तर सर्व बिघाड करून टाकता. त्यास, मीरजाफर व दुसरे लोक या मसलतीमध्यें होते त्या सर्वांचे प्राण याच्या स्वाधीन होते. तर अशा संधीस आपल्या मनाप्रमाणें करार करून घ्यावा असा उमीचंद यानें निश्चय केला. तो आपल्या मदतीबद्दल व सर्व मसलत गुप्त ठेवण्याबद्दल तीस लक्ष रुपये मागूं लागला. या दगलबाजीमुळें कमितीला त्वेष आला आणि भयामुळें धसका बसून काय करावें तें सुचेनासें

झालें. परंतु उमीचंदाच्या असल्या कसबांत क्लैव हा त्याला पुरून उरण्यासारखा होता. तो ह्मणाला कीं, हा मनुष्य दगलबाज आहे, याची ही दगलबाजी पालथी पाडण्यास कशी जरी मसलत केली तरी हरकत नाहीं. यासाठीं तो जें मागतो तें तूर्त कबूल करणें हाच उत्तम पक्ष. आणि तो आपल्या हातीं लवकरच येईल. मग, त्याला हा (३०,००,००० रु.) लांच देऊं नये इतकेंच नाहीं. तर कलकत्त्यामध्यें नाश झाल्याबद्दल मिळण्याचा जो त्याचा हिस्सा तोही त्याला देऊं नये, अशा रीतीनें त्याचेच दांत त्याच्या घशांत घालावे ह्मणजे झालें.

क्लैव याची ही मसलत कबूल झाली; परंतु उमीचंद हाही कच्चा नसून मोटा धूर्त व सावध होता त्यानें असें बोलणें लाविलें कीं, मीरजाफर व इंग्लिश लोक यांच्या दरम्यान जो तह व्हावयाचा त्यामध्यें माझ्या हिशाचें कलम घालावें, आणि तें घातलेलें मी आपल्या डोळ्यांनीं पाहिल्याशिवाय माझी खात्री व्हावयाची नाहीं; तेव्हां आतां याला फसवावा कसा, याची पंचाईत पडली. परंतु क्लैव यानें लागलीच युक्ति काढली आणिएक पांढऱ्या कागदावर व दुसरा तांबड्या कागदावर असे दोन तहनामे तयार केले, त्यांतून पहिला खरा व दुसरा खोटा. पहिल्यामध्यें उमीचंद याचें नांव गाळलें होतें, आणि दुसऱ्यामध्यें त्याच्या तर्फेचें एक कलम होतें व तो फक्त त्यालाच दाखवावयासाठीं तयार केला होता.

इतक्यांत दुसरी एक अडचण येऊन उभी राहि-

ली. ती अशी कीं, तांबड्या करारावर सही करण्यास वात्सन याचें मन धजेना आणि उमीचंद तर असा सावध आणि हुशार होता कीं, अशा मोठ्या गृहस्थाचें नांव नसतें तर त्याच्या मनांत बहुधा अंदेशा आल्याशिवाय राहताचना. परंतु क्लैव हा एकदा एखादी गोष्ट हातीं धरली ह्मणजे ती अर्धवट करणारा नव्हता. आह्मांस आतां हें लिहिण्यास लाज वाटते कीं, त्यानें तांबड्या करारावर वात्सन याची सही बनाविली.

इतकें झालें तेव्हां सर्व तयारी झाली. वात्सन हा हळूच मुर्शिदाबाद येथून पळाला. क्लैव यानें आपली सेना चालविली, आणि नवाबाला पूर्वींपेक्षां निराळ्याच शब्दांनीं पत्रें लिहिलीं. त्याजपासून ब्रितिश लोकांचे आजवर जें काय तोटे झाले होते ते त्यानें त्यास दाखविले. मीरजाफर याला पंच घेण्यास मी कबूल आहें ह्मणून लिहिलें आणि अखेरीस असें लिहिलें कीं, पर्जन्यकाळ जवळ आला आहे यासाठीं मी आपली सेना घेऊन नवाबबाहादुरांच्या हुजुरांत उत्तर ऐकण्यास येतों.

सुराजउद्दवला यानें लागलीच आपली सर्व फौज जमविली आणि इंग्लिश लोकांबरोबर लढण्यासाठीं चाल सुरू केली. पूर्वीं अशी मसलत झाली होती कीं, मीरजाफर यानें नवाबापासून निराळें पडावें, आणि आपल्या हाताखालची सेना क्लैव याच्या सेनेस नेऊन मिळवावी. परंतु याप्रमाणें वर्तण्याचा जेव्हां प्रसंग आला तेव्हां त्याची महत्वाकांक्षा एकीकडेच राहून त्याच्या मनांत भय उत्पन्न झालें. क्लैव कासीमबाजारा-

पर्यंत जाऊन पोंचला व नवाब तेथून जवळच प्लासी येथें बलाढ्य फौज घेऊन येऊन राहिला. इतकें झालें तथापि मीरजाफर आपल्या कराराप्रमाणें वर्तेना. इंग्लिश सेनाधिपतीनें त्यास मोठा तगादा लाविला, तेव्हां तो उडवाउडवीचे जवाब पाठवूं लागला. यामुळें क्लैव याचें मन अगदीं अस्वस्थ होऊन गेलें. आपला मिलाफी हा बोलल्याप्रमाणें चालेल अथवा शौर्यानें लढेल असा त्याला विश्वास येईना. युद्धकौशल्यामध्यें त्याचें स्वतः जरी कितीही शहाणपण असलें व त्याचें सैन्य कितीही शूर व लढाईच्या कामांत वाकब असलें तरी सामनेवाल्याची फौज आपल्यापेक्षां वीसपट असून त्याजबरोबर लढूं लागणें ही लहान गोष्ट नव्हे. तशांत त्याच्या रस्त्यांत नदी आडवी होती. तिजवरून जाणें तर सुलभच होतें. परंतु पलीकडे गेल्यावर जर नशिबाची वाणी फिरती तर त्याची जी थोडीशी फौज तींतून एकही मनुष्य परत येऊं शकताना. सर्व जन्मामध्यें यावेळीं मात्र आतां कसा काय निश्चय करावा याविषयीं जबाबदारी घेण्यास क्लैव कांहीं वेळपर्यंत घोटाळ्यांत पडला, आणि विचार करण्यासाठीं त्यानें कौन्सिल भरलें त्यांत लढूं नये अशीं अधिकांचीं मतें पडलीं आणि क्लैव यानेंही आपलें मत त्यांबरोबर दिलें. (त्यानंतर पुढें पुष्कळ दिवसांनीं तो एकदा असें ह्मणाला कीं, लढण्याचा विचार करण्यासाठीं यावज्जन्मांत कौन्सिल काय तें मी एकदाच भरलें होतें. आणि त्या कौन्सिलाच्या मसलतीप्रमाणें जर मी चाललों असतों तर इंग्लिश लोकांना बंगाल प्रांत कधीं मिळाला नसता.

असो.) परंतु तें कौन्सिल उठलें नाहीं तोंच क्लैव याची अस्वस्थता जाऊन त्याची बुद्धि नेहमीप्रमाणें चालू झाली. त्यानें एका झाडाच्या छायेंत बसून तेथें सुमारें एक तासभर विचार केला आणि असें ठरविलें कीं, जें होईल तें होऊ, परंतु एकदां हिय्या करावाच. मग तो तेथून परत आला आणि उद्यां नदी उतरण्याची सर्व तयारी असावी असा त्यानें फौजेस हुकूम दिला.

दुसऱ्या दिवशीं नदी उतरून व दिवसभर मेहनत करून थकून जाऊन सूर्यास्तानंतर बऱ्याच वेळानें प्लासीजवळ शत्रूपासून एका मैलाच्या आंत एका आंबराईमध्यें त्याच्या सेनेनें जाऊन डेरा दिला. क्लैव याला रात्रभर झोंप लागली नाहीं. तासे झांजा वगैरे एतद्देशीय लोकांच्या अनेकप्रकारच्या रणवाद्यांची नवाबाच्या मोठ्या छावणीमध्यें जी गडबड चालली होती ती त्याला ऐकूं येत होती. आपणासमोर थोडक्याच काळानें किती लोक उभे राहतील आणि आपणांस जयप्रातिकूल्य किती आहे हें जेव्हां क्लैव मनांत आणी तेव्हां त्याचें हृदय मोठें घट्ट होतें तरी मधून मधून त्याचा धीर सुटे; परंतु यांत कांहीं आश्चर्य नाहीं. बरें, इकडे सुराजउद्दवला याचें तरी मन विशेष स्वस्थ होतें असें नाहीं. तो मुळचाच अविवेकी व खवळलेला असे. आणि आतां तर विलक्षण व अत्यंत नाशदर्शक अशीं भयें त्याच्या पुढें मूर्तिमंत उभीं राहिलीं तेव्हां त्याची बुद्धि अगदींच चंचळ झाली. मोठा युद्धप्रसंग अगदीं जवळ येऊन ठेपला आहे, पदरच्या सर-

दारांवर त्याचा भरंवसा नाहीं, जो कोणी जवळ येईल त्याचें भय, आणि एकटाही बसावयास भयच, अशा स्थितीमध्यें असून मोठ्या दुःखांनीं घेरलेला होत्साता तो विचारा आपल्या राहुटीमध्यें पडला होता. तो असा कीं, जसें काय कोणी ह्मणेल कीं, पूर्वीं ज्या इंग्रज लोकांस त्यानें कोंडून मारलें होतें तेंच त्याला हल्लीं जाचीत आहेत. अशा स्थितींत दोहोंपक्षांच्या मुख्यांची रात्र जाऊन पुढें दिवस उगवला.

या दिवशीं हिंदुस्थानाच्या नशिबाचा निकाल व्हावयाचा होता. सूर्योदयाबरोबर नवाबाची फौज छावणींतून अनेक मार्गांनीं इंग्लिश लोक ज्या राईंत होते तिकडे हळू हळू चाल करूं लागली. त्या मैदानांत तोड्याच्या बंदुका, भाले, तलवारी, तीरकमटे वगैरे शस्त्रें धारण केलेलें चाळीस हजार पायदळ उभें राहिलें होतें. त्याबरोबर मोठ्या पन्नास तोफा होत्या. प्रत्येक तोफ ओढावयास सुंदर पांढऱ्या बैलांच्या रांगा लावल्या होत्या व ती पुढें ढकलण्यास पाठीमागें एकेएक हत्ती होता; परंतु क्लैव यास कदाचित् याहीपेक्षां विशेष भीति उत्पन्न होण्यासारख्या कांहीं लहान लहान तोफा जे थोडेसे फ्रेंच लोक नवाबाच्या कुमकेस आले होते त्यांच्या हुकुमाखालीं होत्या. त्याचे घोडेस्वार पंधरा हजार असून ते बंगाल्यांतल्या नामर्द लोकांतील नव्हते. तर उत्तरेकडे जे त्यांजपेक्षां धीट असे लोक राहतात त्यांतले होते. घोडे व शिपाई यांचीं परीक्षा क्लैव यास उत्तम होती त्यामुळें ते लोक पाहतांच त्याला एकदम समजलें कीं, आपले करनाटकांतील लोक व घोडे यांजपेक्षां

हे लोक व घोडे विशेष मजबूद आहेत. या अचाट सेनेशीं सामना करण्यास क्लैव याजवळ फक्त तीन हजार फौज होती; परंतु तिजमध्यें सुमारें एक हजार इंग्रज होते, आणि सर्व सेना कवाईत शिकलेली असून इंग्रजी सरदारांच्या हाताखालीं होती.

लढाईच्या आरंभीं तोफखाने सुटले; परंतु नवाबाच्या तोफखान्यापासून कांहींच झालें नाहीं असें ह्मटल्यास चिंता नाहीं. इंग्लिशांजवळ ज्या थोड्याशा तोफा होत्या त्यांचा मार चांगला लागू झाला. सुराजउद्दवला याच्या सेनेंतील पुष्कळ मोठमोठे सरदार पडले व जिकडे तिकडे धांदल उडाली. त्याचें स्वतांचें भय तर क्षणोक्षणीं वाढतच चाललें. त्याच्या जवळ इंग्लिशांस मिलाफी असा एकजण होता, तो त्याला परत जावें अशी मसलत देऊं लागला. भयापुळें नवाबाच्याही मनामध्यें तसें घोळूं लागलेंच होतें, ह्मणून ही दगलबाजीची मसलत त्यास मान्य पडली; आणि त्यानें आपल्या सेनेला मागें हटण्याचा हुकूम दिला. या हुकुमानें त्याच्या नशीबाचा निकालच झाला. क्लैव यानें तो प्रसंग एकदम लक्षांत आणून आपल्या लोकांना पुढें होण्यास हुकूम दिला. नंतर कवाईत शिकलेले व शूर अशा लोकांच्या सपाट्यापुढें, गोंधळून गेलेल्या आणि धैर्य खचलेल्या नवाबाच्या लोकांचा असा पराजय झाला कीं, कवाईत शिकलेल्या लोकांकडून विनकवाइती, परंतु शिपाई ह्मणविणाऱ्या लोकांचा तसा पराजय कधींच झाला नव्हता. फ्रेंच लोकांची जी लहानशी टोळी होती

ती मात्र इंग्लिशांशीं लढण्यास कांहीं वेळ उभी राहिली; परंतु नवाबाच्या फौजेचा जो लोट मागें वाढत चालला होता त्यांत तीही ढकलली गेली. अशा प्रकारें दोन घटकांमध्यें सुराजउद्दवला याच्या फौजेची इतकी फाटाफूट झाली कीं, तिचा जमाव पुन्हा कधींच जमला नाहीं. पराजित झालेल्या फौजेंतील लोक पांचशें मेले; परंतु त्यांची सर्व छावणी, तोफा, दारुदारीचें सामान, अगण्य गाडे व गुरें शत्रूच्या हातीं लागलीं; आणि क्लैव याचे सारे वीस लोक मरून आणि पन्नास घायाळ होऊन त्यानें सुमारें साठ हजार फौजेची वाताहात उडविली, आणि ग्रेतब्रितनच्या राज्यापेक्षां मोठें राज्य आणि त्यांतील प्रजेपेक्षां अधिक प्रजा हीं जिंकिलीं.

लढाई चालली असतां मीरजाफर यानें इंग्लिश लोकांना कांहीं मदत केली नव्हती; परंतु जय कोणाचा होतो हें पाहतांच त्यानें आपल्या सेनेची टोळी एकीकडे काढली आणि जेव्हां लढाई संपली, तेव्हां आपल्या दोस्ताला आनंदाचे सलाम सांगून पाठविले. दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं तो इंग्लिश लोकांच्या छावणींत गेला; परंतु तेथें आपलें आगतस्वागत कसें होतें याविषयीं त्याच्या मनामध्यें वरीच धास्ती होती, आणि त्याच्या पदवीच्या योग्यतेप्रमाणें त्याला मान देण्यासाठीं जेव्हां फौज तयार झालेली त्यानें पाहिली तेव्हां त्याला भय प्राप्त झाल्याचीं चिन्हें उघड दिसून आलीं; परंतु लौकरच त्याची ती भीति गेली. क्लैव हा त्याला सामोरा आला आणि आलिंगन देऊन "बं-

गाला, वाहार आणि औंढ्या या तीन प्रांतांचे नवाव" असें ह्मणून त्यानें त्याला सलाम केला. मीरजाफर यानें ज्या सबवी सांगितल्या त्या मोठ्या संतोषानें व संभावितपणानें ऐकिल्या. आणि नंतर त्याला मुर्शिदावाद येथें विलंब न लावितां जाण्यास सांगितलें. सुराजउद्दवला रणभूमीवरून निघाला तो सांडणीवर वसून जितकी त्वरा होईल तितकी करून, मुर्शिदावाद येथें आठ प्रहरांपेक्षां कांहीं जास्त वेळांत जाऊन पोंचला. तेथें गेल्यावर त्यानें आपले सर्व मसलतदार जमविले. त्यांमध्यें जो शहाणा होता त्यानें इंग्लिश लोकांच्या स्वाधीन होण्यास त्याला सांगितलें. कां कीं, त्यांच्या हातून राज्यभ्रष्टता व बंदी यांखेरीज दुसरें कांहीं विशेष झालें नसतें; परंतु ही दगलवाजी आहे असें त्याला वाटलें. कितीएकांनीं पुनः लढाई करून आपलें नशीव काय वळतें तें पाहावें अशी मसलत दिली. ही त्यास पसंत पडून त्यानें त्याप्रमाणें करण्यास आज्ञा केली; परंतु कोणताही धैर्याचा निश्चय केला असतां तो एक दिवसपर्यंतही कायम राखण्याची हिंमत त्याच्या अंगीं नव्हती. इतक्यांत मीरजाफर आला असें त्याला कळलें तेणेंकरून तर त्याला अनिवार भय वाटून त्याच्यानें धीर धरवेना; तेव्हां रात्रीं हलकट वेष करून हातांत जवाहिराचा करंडा घेऊन राजवाड्याच्या खिडकींतून फक्त दोन चाकरांनिशीं तो खालीं उतरला आणि पाटणा येथें जाण्यासाठीं नावेंत वसला.

इकडे थोड्याच दिवसांनीं क्लैव दोनशें गोरे शिपाई आणि तीनशें काळे शिपाई वरोवर घेऊन मुर्शिदावाद

येथें गेला. त्याला राहावयासाठीं एक राजवाडा दिला होता, त्याच्या सभोंवतीं जो बाग होता तो इतका विस्तीर्ण होता कीं, त्याजबरोबर जी फौज गेली होती ती सर्व त्यांत उतरली होती तरी अडचण झाली नाहीं. नंतर मीरजाफर याला तक्तावर बसविण्याचा समारंभ लागलाच झाला. क्लैव यानें त्या नव्या नवाबास आपण हातीं धरून नेऊन गादीवर बसविलें, आणि कांहीं सुवर्ण नजर केलें. नंतर त्या दरबारांत जे एतद्देशीय लोक होते त्यांजकडे वळून तो त्यांना ह्मणाला कीं, दुष्ट राजाच्या हातून तुह्मी सुटलां ह्मणून तुमचें नशीब फार चांगलें ह्मटलें पाहिजे व हें पाहून मला फार आनंद वाटतो. या प्रसंगीं जीं बोलणीं झालीं तीं चालवण्यास त्यानें दुभाषी घेतला होता. कारण, जरी त्याचें हिंदुस्थानांत राहणें फार दिवस होतें, हिंदुस्थानांतील राज्यकारभाराची त्याला पूर्ण माहिती होती, हिंदु लोकांचा स्वभाव त्याला पक्का माहीत होता आणि त्याच्या हिंदु शिपायांची त्याजवर फार भक्ति होती, तरी त्याला साफ बोलतां येईल असें हिंदुस्थानांतील कोणत्याही भाषेचें ज्ञान नव्हतें. असेंही ह्मणतात कीं, लहानपणीं ब्रेझिल येथें असतां त्याला पोर्तुगीज भाषेचें अल्पस्वल्प ज्ञान झालें होतें; त्याच भाषेनें वेळ पडल्यास एतद्देशीय लोकांबरोबर काम चालवणें त्याला भाग पडत असे.

नव्या नवाबानें आपल्या दोस्तांबरोबर जे करार केले होते त्यांप्रमाणें वर्तण्यास आतां त्यांनीं सांगितलें आणि त्यासंबंधी जे जे बेत ठरावयाचे त्यांचा विचार

करण्यासाठीं जगतशेट ह्मणून जो मोठा सावकार त्याच्या घरीं सर्व जमले. क्लैव यानें त्या दिवसापर्यंत बंगालच्या लोकांपेक्षांही अधिक कपटभावानें वागून उमीचंद याला पूर्ण ममतेनें वागविलें होतें; त्यामुळें आपल्यावर क्लैव याची कृपा आहे असें पक्कें समजून त्यादिवशीं तो तेथें आला. सभा भरल्यावर पांढरा करारनामा काढून वाचला, नंतर स्क्राप्तन ह्मणून कंपनीचा एक नौकर होता. त्याजकडे वळून क्लैव त्याला इंग्रजींत ह्मणाला कीं, उमीचंद याला खरा प्रकार काय आहे तो सांगण्याची वेळ आली; त्यावरून स्क्राप्तन यानें हिंदुस्थानीमध्यें सांगितलें कीं, "उमीचंद, तांबडा करारनामा खोटा आहे, तुह्मांला कांहीं एक मिळावयाचें नाहीं." तें ऐकून उमीचंद बेशुद्ध होऊन मागें पडला, तेव्हां त्याला त्याचे चाकरांनीं उचललें. तो कांहीं वेळानंतर सावध झाला; परंतु त्या वेळीं जो त्याच्या मनाला धक्का बसला त्यापासून तो कधींच बरा झाला नाहीं. हिंदु लोकांतील राज्यकारभाऱ्यांबरोबर व्यवहार करीत असतां क्लैव याचे मनांत खऱ्या खोट्याविषयीं थोडीच खंती येत असे; तरी तो निर्दय नव्हता. ही उमीचंद याची अवस्था पाहून त्याला द्रव आला असें दिसतें. कांहीं दिवसांनंतर तो उमीचंद याला जाऊन भेटला, त्याजबरोबर ममतेनें बोलला आणि दुसऱ्या ठिकाणीं गेल्यानें त्याची प्रकृति नीट होईल असें त्यानें मनांत आणून तुह्मी यात्रा करावयास एकाद्या मोठ्या पवित्रस्थानीं जावें असें त्याला सांगितलें. इतकेंच नाहीं, परंतु जें सर्व

झालें तें विसरून पुनः त्याला सरकारी कामगिरी सांगावी असेंही त्याच्या मनांत आलें होतें; परंतु उमीचंद याला जो एकाएकीं धक्का बसला त्यामुळे तो विचारा हळूहळू भ्रमिष्ट होत चालला. जो मनुष्य आजपर्यंत बुद्धीविषयीं आणि वस्त्रप्रावर्ण व खाणेंपिणें यांमध्यें साधेपणा राखण्याविषयीं प्रख्यात होता, त्यानें आतां आपल्या जवळ जी संपत्ति राहिली होती ती पोरकट दागिने घालून आणि मूल्यवान पोशाग करून घालविली. त्याला अंगावर ज़वाहीर घालण्याचें आवडूं लागलें. अशा वाईट स्थितीमध्यें कांहीं थोडे दिवस काढून तो मरण पावला.

या सर्व कृत्यांमध्यें क्लैव यानें जो प्रकार केला तो गैरशिस्त केला व त्यांत गुन्हा केला इतकेंच नाहीं. तर व्यावहारिकदृष्ट्या चूकही केली. खरेपणानें विशेष फायदा होतो याचा दाखला व्यक्तीच्या व्यवहारामध्येंही येतोच; परंतु निरनिराळ्या देशांतील लोकांच्या परस्पर व्यवहारामध्यें तर विशेषच येतो. कां कीं, व्यक्तीच्या आयुष्यमर्यादेपेक्षां राष्ट्राची आयुष्यमर्यादा अधिक आहे. दगलबाजीनें भरभराटीस पावलेले असे लोक सांगतां येतील; परंतु एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राशीं व्यवहारांत दगलबाजी केली आणि त्यांत त्या दगलबाज राष्ट्राचा अखेरीस सरासरी फायदा झाला अशीं उदाहरणें मिळतील असें वाटत नाहीं. दगलबाजावरोबर दगलबाजीनेंच वागावें हें शाहाणपण नव्हे हा उत्तम सिद्धांत आहे, आणि लवाडावरोबर भांडण्यास सत्य हेंच उत्कृष्ट हत्यार होय. या दोन्ही गोष्टींविषयीं

ब्रिटिश लोकांचें हिंदुस्थानांतील राज्य हें उत्तम उदाहरण आहे. कितीही मजबुदीचा जरी करार असला तरी तो ते पाळतीलच असा भरंवसा राखतां येत नाहीं अशा प्रकारचे शत्रु व दोस्त जिकडे तिकडे असतां हिंदुस्थानांतील इंग्लिश राज्यकर्त्यांनीं आज बहुत वर्षें बहुधा खरेपणानें आणि निष्कपटानें व्यवहार केला आहे; आणि या प्रकारच्या वर्तणुकेच्या झालेल्या परिणामावरून असें सिद्ध आहे कीं, निष्कपटपणा व खरेपणा हेंच शहाणपण. शौर्य आणि शहाणपण यांपेक्षां सत्यनिष्ठेनेंच इंग्लिश लोकांचें हिंदुस्थानांतील राज्य विशेष बचावलें गेलें आहे व वाढलें आहे. दुटप्पी वागणूक, उडवाउडवी, खोट्या गोष्टी रचणें व खोट्या शपथा घेणें हीं हत्यारें इंग्रजांबरोबर व्यवहार करितांना त्यांच्या शत्रूंनीं योजिलीं तींच इंग्रजांनींही योजिलीं असतीं तर जो फायदा झाला असता त्यापेक्षां, ज्यांच्या वचनावर विश्वास ठेवावा असे सर्व हिंदुस्थानांत काय ते इंग्रजच आहेत, असें लोकांत ठरल्यानें अधिक झाला आहे. ब्रिटिश लोकांच्या वकिलाच्या नुसत्या "होय" किंवा "नाहीं" या शब्दानें जो विश्वास उत्पन्न होतो त्याच्या शतांशही इतरांनीं कितीही मौल्यवान ओली दिल्या अथवा कशाही गंभीर शपथा घेतल्या तरी होत नाहीं. ब्रिटिश लोकांच्या आश्रयानें एकादा सरदार बलाढ्य अथवा हाडवैरी शत्रूच्या मुलखांतून जात असतां त्याला जी निर्भयता असते, तितकी एकाद्या स्वाभाविक किंवा तजविजीनें मजबूद केलेल्या किल्ल्यांत राहणाऱ्याला दे-

खील नसते. एशियांतील अतिबलाढ्य राजाच्यानें पुष्कळ व्याज कबूल करून देखील रयतेच्या चुलीखालीं जो पैका पुरलेला असतो तो बाहेर काढवत नाहीं; परंतु ब्रितिश सरकार सुमारें शेकडा पांचच टक्के व्याज देत असतां, अति लोभी मनुष्यही आपले रुपये खुषीनें देतो. आणि अशा रीतीनें हें सरकार कोटचावधि रुपये कर्ज काढतें. इंग्रजांच्या प्रतिपक्षाच्या राजानें इंग्रजांच्या शिपायांस सोन्याचे ढिगांचे ढीग देऊं केले आणि ब्रिटिश लोकांची चाकरी सोडा ह्मणून सांगितलें, तरी ते सोडीत नाहींत. आणि हें सरकार पुष्कळ वर्षें चाकरी झाली ह्मणजे थोडेंसें पेनशन द्यावयाचें कबूल करतें, त्यावर ते पूर्ण विश्वास धरून बसतात; कां कीं, त्या वचनामध्यें फरक पडावयाचा नाहीं अशी त्यांची खातरी असते; आणि आपण जरी शंभर वर्षें वांचलों तरी आपल्या मीठभाकरीस हरकत नाहीं असें त्यांना माहीत असतें. गवर्नर जनरल याच्या पगाराप्रमाणेंच आपलें पेनशनही बिनधोक आहे असें ते पक्कें समजतात. हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याही राजांनीं कशी मोठी प्रतिज्ञा केली असली तरी, आपण निकामी झालों ह्मणजे उघड ठिकाणीं जरी मरत पडलों तरी ते आपली चौकशी देखील करणार नाहींत असें त्यांस वाटतें. ज्या राजांवर कोणाचाही विश्वास नाहीं अशांमध्यें आपलें एकटेंच विश्वसनीय राज्य असणें एवढा मोठा फायदा राज्याला दुसरा कोणताही नाहीं. हा फायदा एशियाखंडामध्यें आमच्या राज्यास आहे. शेवटी पास

निर्दोषी ठरविणारे जे लोक त्यांच्या नीतीप्रमाणें जर आजपर्यंत आम्ही चाललों असतों, उमीचंदासारख्या लोकांजवळ जेव्हां जेव्हां प्रसंग पडला तेव्हां तेव्हां त्यांप्रमाणें लबाडी बोलणें, खोटे दस्तऐवज बनावणें, बेभरंवसा करणें, अशा प्रकारें उलट जर आम्ही त्यांशीं वर्तलों असतों, तर आमची अशी खातरी आहे कीं, कितीही शौर्य व कितीही शहाणपण आमच्या अंगीं असतें तरी हें राज्य आमच्यानें राखवलें नसतें. या सर्व कारणांवरून क्लैव यानें जी दगलबाजी केली तिची गरज नव्हती इतकेंच नाहीं; तर ती करण्यांत त्यानें व्यवहारदृष्ट्याही अति मोठी चूक केली आणि ती करून आपणास पूर्ण दोष लावून घेतला.

या राज्यक्रांतीमध्यें उमीचंदाचा नाश झाला इतकेंच नाहीं; तर सुराजउद्दवला देखील पळून गेल्यावर लौकरच सांपडला. त्याला मीरजाफर याजपुढें आणिलें तेव्हां त्यानें भयानें घाबरून जमिनीवर लोळण घेतली आणि मोठ्या आक्रोशानें रडून, त्यानें जरी पूर्वीं कधीं कोणावर दया केली नव्हती तरी आतां तिजविषयीं तो विनवणी करूं लागला. मीरजाफराला याचें काय करावें तो निश्चय होईना; परंतु मिरान म्हणून त्याचा एक सत्रा वर्षांचा मुलगा होता, तो त्या दुर्दैवी नबाबाप्रमाणें बराच दुष्ट व बुद्धिहीन होता, आणि दीर्घद्वेषीही होता. त्यानें सुराजउद्दवला यास एका अंतरंग खोलीमध्यें नेवविलें आणि त्या मागून थोड्या वेळानें मारेकरी पाठविले. या कृत्यामध्यें इंग्लिशांचा कांहीं

संबंध नव्हता आणि मीरजाफर याला इंग्लिशांची वृत्ति चांगली टाऊक होती, यामुळें सुराजउद्दौवला हा त्यांचा अतिदुष्ट शत्रु असतांही त्याचा सूड उगविल्याबद्दल त्यांची क्षमा मागणें त्याला जरूर वाटलें.

प्लासीच्या लढाईमुळें कंपनी व तिचे नौकर यांजवर संपत्ति पावसाच्या सरीप्रमाणें कोसळली. ऐंशी लक्ष रुपयांच्या किमतीचें रुप्याचें नाणें, मुर्शिदाबाद येथून फोर्ट विलियम यथें आलें. ही संपत्ति आणण्यास शंभराहून अधिक नावा लागल्या होत्या. त्यांनीं गंगेतून येते वेळीं निशाण लावून आणि वाद्यें वाजवून मोटा जयजयकार केला. कलकत्ता शहर नुकतेंच ओसाड पडलें होतें. तें यावेळीं थोड्याच काळांत जितकें सुखी झालें तितकें पूर्वी कधींच झालें नव्हतें. व्यापार पुनः सुरू झाला आणि सर्व इंग्लिश लोकांच्या घरांमध्यें संपत्तीचीं चिन्हें दिसून येऊं लागलीं. खुद्द क्लैव याच्या प्राप्तीला हद्द म्हणाल तर तोच ठेवील तेवढी होती. सर्व बंगालच्या खजिनाच त्याच्या पुढें पसरून ठेविला होता. त्या खजिन्यामध्यें हिंदुराजांच्या चालीप्रमाणें निरनिराळ्या तऱ्हेच्या नाण्यांचे ढिगाचे ढीग होते. केपाकडून येण्याचा रस्ता माहीत होण्यापूर्वीं विनिशियन लोक एशियांतील मसाल्याचे पदार्थ व इतर जिनस विकत घेऊन जें नाणें देत असत तेंही त्यांमध्यें होतें. माणकें व हिरे चढविलेल्या सोन्याच्या आणि रुप्याच्या पदार्थांच्या राशींमधून क्लैव चालूं लागला. त्यांतून जितकें पाहिजे तितकें घेण्यास तो मुकत्यार होता.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

त्यानें विसांपासून तीस लक्ष रुपयेपर्यंत पैका आपणा-ला घेतला.

मीरजाफर आणि क्लैव यांच्या मध्यें जी देवघेव झाली तिजबद्दल पुढें सोळा वर्षांनीं इंग्लिश लोकांनीं त्याजवर दोष आणिला आणि पार्लमेंतांतील कितीएक सभासदांनीं त्याला मोठा टपका देऊन त्याच्या कृत्यांव-र टीका केली. या प्रतापी सरदारावर दोष आणणा-रे लोक होते ते ह्मणत कीं, ही संपत्ति यानें लबाडीनें मिळविली अथवा निराश्रित दोस्त राजाला युद्धाचें भय घालून मिळविली; आणि त्याचें चरित्र लिहिणारा सर जान मालकम असें ह्मणतो कीं, त्या-वेळीं हिंदुस्थानामध्यें इंग्लिश लोकांचे जे कारभारी होते त्यांनीं तशा रीतीनें पैसा बिलकूल घेऊं नये ह्मणून पार्लमेंताचा कायदा झाला नव्हता व अशा रीतीचें नजराणे देणेंघेणें हीं एशिया खंडांत चालत आहेत. त्यावर आमचें ह्मणणें असें आहे कीं, क्लैव यानें आपल्या धन्याचा किंवा देशाचा तोटा करून संपत्ति मिळविली असावी असा आह्मांला अंदेशा येत नाहीं; परंतु त्यानें जी गोष्ट केली ती स्वरूपतः वाईट नाहीं असें ह्मटलें तरी कित्यास फार वाईट होती, असा दोष तिला लाविल्याशिवाय आमच्यानें राहावत नाहीं. या दोषाविषयीं कायदा असण्याची गरज नाहीं हें साधारण विचारानेंच समजतें. कोणत्याही सेनापतीनें आप-ल्या सरकाराची मात्र चाकरी करावी, दुसऱ्या कोणाची करूं नये, यापेक्षां उघड गोष्ट कोणती नाहीं. आणि असें जर आहे तर यापासूनच सिद्ध होतें कीं, चाक-

रीबद्दल जें बक्षीस द्यावयाचें तें त्याच्या धन्यानेंच दिलें पाहिजे, अथवा त्याला पक्कें माहीत असून व मान्य होऊन घेतलें पाहिजे. मग तें दमडीच्या किमतीचें असो किंवा केवळ आब्रूचें चिन्ह असो. हा नियम सक्तीनें अमलांत आणला पाहिजे. धन्याला पक्कें माहीत असल्याशिवाय जर सेनाधिपति लक्षावधि रुपये दोस्त सरकारांपासून घेऊं लागतील तर मग त्या धन्याची चाकरी चांगली कोठून बजावली जाईल?

परंतु क्लैव याचा दोष कमी करणारीं पुष्कळ कारणें आहेत, हेंही आह्मांस कबूल केलें पाहिजे. तो आपणाला सरकारचा चाकर असें समजत नसून कंपनीचा असें मानीत असे, आणि त्या कंपनीनें आपल्या लोकांस एतद्देशीय राजांपासून पैसा मिळविण्याविषयीं फूस दिली होती इतकेंच नाहीं; तर त्याहीपेक्षां दोष देण्यासारखीं कृत्यें केलीं होतीं. यास्तव चाकराच्या मनामध्यें धन्यापेक्षां कर्तव्यकर्माविषयीं अधिक निग्रह असेल अशी बहुतशी आशा करणें नलगे. झालेल्या गोष्टी आपल्या धन्यांस क्लैव यानें उघड रीतीनें जरी कळविल्या नाहींत अथवा त्यांविषयीं त्यांची मान्यता मागितली नाहीं, तरी त्या गोष्टी मुद्दाम लपवून आपण कांहीं वाईट केलें असें आपणास वाटतें असेंही त्यानें दाखविलें नाहीं. आणि उलटें नवाबाच्या औदार्यानें आपण संपत्तिमान झालों असें तो उघड रीतीनें कबूल करीत असे. आणि शेवटीं आमचें असें ह्मणणें आहे कीं, त्यानें अशा रीतीनें पैका मिळविणें हें योग्य जरी नव्हतें, तरी त्यानें इतका

थोडाच घेतला ह्मणून तो स्तुतीस पात्र आहे असेंही आह्मांस कबूल केलें पाहिजे. त्यानें वीस लक्ष रुपये घेतले ते चाळीस करण्याला त्याला सारा एका शब्दाचाच खर्च होता. इंग्लंदामध्यें बसून क्लैव यानें लूट केली असें ह्मणणें याला नीतिनिष्ठा विशेष लागत नाहीं; परंतु असे जे दोष आणणारे ते जर मुर्शिदाबाद येथें खजिन्यांत असते तर त्यांपैकीं शंभरांतून एकही इतका मितलोभी निघाला नसता.

ज्याच्या आश्रयानें मीरजाफर याला राज्यपद प्राप्त झालें त्याच्या शिवाय तें त्याचें पुढें राहिलें नसतें. तो केवळ अल्पवयी नव्हता आणि राजवंशांत जन्मणें हेंही त्याचें दुर्दैव नव्हतें, यामुळें तो सुराजउद्दवल्याप्रमाणें मूर्ख किंवा बिघडलेला नव्हता; परंतु त्याचा हुद्दा चालविण्यास जी बुद्धि किंवा गुण अवश्य होते ते त्याच्या अंगीं नव्हते, आणि त्याचा वारस त्याचा पुत्र मिरान हा प्रति सुराजउद्दवलाच होता. तशांतही जी राज्यक्रांति झाली तेणेंकरून सर्व लोकांचीं मनें अस्वस्थ होऊन गेलीं होतीं. पुष्कळ सरदार नवाबावर उघड रीतीनें उठले. संपन्न व बलाढ्य असा जो अयोध्याप्रांत त्याचा सुभेदार मोंगलाच्या इतर सुभेदारांप्रमाणेंच त्या वेळीं वास्तविक रीतीनें स्वतंत्रता पावला होता. तो बंगाल्यावर स्वारी करतो असा धाक पडला. अशा प्रसंगीं क्लैव याच्या बुद्धीनें व वजनानें मीरजाफर याच्या डळमळणाऱ्या राज्यास टेका मिळाला.

इकडे असा प्रकार चालला असतां कंपनीकडून हुकुमाचे कागदपत्र घेऊन एक तारूं येऊन पोहोंचलें.

हे कागदपत्र प्लासीच्या लढाईची बातमी लंदनामध्यें पोंचण्याच्या पूर्वी लिहिलेले होते. दैरेक्तर लोकांनीं इंग्लशांच्या बंगाल्यांतील ठाण्याचा कारभार एका विलक्षण व फार अडचणीच्या रीतीनें चालविण्याचा निश्चय केला होता, आणि त्या कारभारामध्यें क्लैव याला मुळींच अधिकार ठेवला नव्हता. हें तर त्या व्यवस्थेचें विशेष वाईट लक्षण होतें. हा कारभार चालविण्यास ज्या लोकांस नेमलें होतें त्यांनीं हे आलेले विलक्षण हुकूम न मानण्याची जबाबदारी आपणावर घेतली, आणि क्लैव याला आपण मुख्य अधिकार द्यावा ह्मणून सांगितलें. ही त्यांनीं मोटी योग्य गोष्ट केली. क्लैव यानें त्यांच्या मनाप्रमाणें तो अधिकार स्वीकारला आणि असें लवकरच कळून आलें कीं, कंपनी जें पुढें करणार होती तेंच तिच्या या नौकरांनीं अगोदर केलें. क्लैव यानें जो कीर्तीचा पराक्रम केला त्याची बातमी कळतांक्षणीं लागलाच दैरेक्तर लोकांनीं त्याला बंगाल प्रांतांतील आपल्या मुलखाचा गवर्नर नेमलें. व त्याच्या योग्यतेविषयीं त्यांच्या मनामध्यें जो भाव उत्पन्न झाला तो व कृतज्ञता हीं त्यांनीं उत्तम रीतीनें दर्शविलीं. या सर्व कारणांमुळें आतां त्याचा अधिकार अपार झाला, आणि दुप्ली हा दक्षिण हिंदुस्थानामध्यें जो अधिकार पावला होता त्याच्या पेक्षांही तो अधिक पावला. मीरजाफर हा त्याला गुलामाप्रमाणें भीत असे. एक वेळ असें झालें कीं, कंपनीच्या कितीएक शिपायांबरोबर एका मोठ्या रजवाड्याचे लोक भांडले, तेव्हां नवाब त्यांजवर फार रागावला आणि

ह्मणाला कीं, "कर्नल क्लैव हा कोण आहे आणि ईश्वरानें त्याला काय अधिकार दिला आहे हें तुह्मांला अद्यापि माहीत नाहीं काय ?" तो रजवाडा मीरजाफर याचा जुना मित्र होता व मोठा थट्टेबाज मनुष्य होता, ह्मणून नबाबाजवळ त्याची बरीच सलगी असे. त्यानें उत्तर दिलें कीं, "मी त्या कर्नलाला राग आणण्यासारखें कृत्य करीन! मी तर रोज सकाळीं त्याच्या गाढवाला तीन लांबलचक सलाम करून नंतर अंथरुणावरून उठतों!" यामध्यें फारशी अतिशयोक्ति नव्हती. काळे व गोर सर्व क्लैव याच्या पायांची धूळ होती. मीरजाफर यानें केलेले करार त्याजकडून पाळवील असा हा एकटाच मनुष्य आहे, असें इंग्लिश लोक समजत असत. आणि आपल्या वंशाचा बचाव आपल्या पुंड प्रजेपासून आणि आपलें राज्य घेऊं पाहणाऱ्या शेजाऱ्यांपासून करील असा हा एकटा क्लैवच, असें मीरजाफर मानीत असे.

हा जो अधिकार क्लैव यास प्राप्त झाला त्याचा उपयोग त्यानें स्वदेशकल्याणाकडे हुशारीनें आणि सपाट्यानें केला असें ह्मणणें अगदीं रास्त आहे. कर्नाटकच्या उत्तरेस जो प्रांत आहे तिकडे स्वारी करण्यास त्यानें फौज पाठविली. या प्रांतामध्यें त्या वेळींही फ्रेंच लोकांचें वर्चस्व होतें तें कमी करणें इंग्लिशांस अवश्य होतें. या सेनेची सरदारी फोर्ड या नांवाचा एक सरदार होता त्यास दिली. फोर्ड हा यावेळीं कोणाला फारसा माहीत नव्हता; परंतु याच्या अंगीं युद्ध करण्याची बुद्धि विशेष आहे असें क्लैव याच्या ध्यानांत आलें होतें. या स्वारीचा जय त्वरित व उत्तम रीतीनें झाला.

याप्रमाणें बंगाल्यांतील बरीच फौज दूरच्या कामगिरींत गुंतली असतां पश्चिम सरहद्दीवर नवीनच एक मोठें भय प्राप्त झालें. मोगलबादशाह हा दिल्लीस आपल्या रयतेपैकीं एकाच्या हातीं बंदीवान झालेला होता. त्याचा वडील पुत्र शहाअलम हा आपल्या बापाच्या राजमंदिरांतून पळून गेला होता. हा शहाजादा, पुढें पुष्कळ वर्षेंपर्यंत दुर्दैवाच्या सपाट्याखालीं येऊन त्यानें त्याला हवें तसें नाचविलें. प्रथम मराठ्यांनीं आणि नंतर इंग्लिशांनीं याला हातीं धरून साधला तसा फायदा करून घेतला. याच्या कुळावरून याला त्यावेळीं पुष्कळ मान मिळत असे. कितीएक बलाढ्य राजे व विशेषेंकरून अयोध्येचा नबाब यांच्या मनामध्यें याला विशेष मदत करण्याचें आलें, आणि त्यावेळीं हिंदुस्थानांत सर्व ठिकाणीं जे सोटभैरी शिपाई पुष्कळ भरलेले होते ते येऊन शहाअलम याला मिळाले. अशा प्रकारें तयार झालेली निरनिराळ्या जातींची व धर्मांची फौज, जीमध्यें मराठे, रोहिले, जाट आणि आफगाण वगैरे लोक होते, अशी सर्व मिळून लौकरच चाळीस हजार जमली. तेव्हां, इंग्लिश लोकांनीं ज्या मनुष्यास एकाएकीं पदास चढविलें होतें त्याचा पराभव करून बंगाल, ओढ्या आणि बहार या प्रांतांमध्यें आपला अधिकार बसवावा असा त्यानें बेत केला.

यामुळें मीरजाफर याच्या मनामध्यें अत्यंत भय उत्पन्न झालें, आणि शहाअलम याला पुष्कळ पैसा देऊन त्याची समजूत घालावी, याशिवाय दुसरें

त्याला सुचेना. श्रीमान परंतु लढाऊ नव्हत अशा लोकांनीं भरलेले जे गंगेच्या मुखाजवळील प्रांत, त्यांतील राजांनीं या पूर्वीं हा उपाय पुष्कळ वेळां योजिला होता; परंतु क्लैव हा मोठा धैर्यवान व बुद्धिमान पडला, त्यास ही मसलत अगदीं अयोग्य अशी वाटल्यावरून त्यानें ती धिक्कारली. त्यानें मीरजाफर यास असें लिहिलें कीं, "जर तुह्मी असें कराल तर अयोध्येचा नवाब, मराठे व इतर पुष्कळ लोक तुमच्या राज्याच्या आसपासच्या प्रांतांतून सर्व ठिकाणांहून येऊन तुह्मांला धमकावून तुमचा पैका नेतील, आणि अखेरीस तुमच्या खजिन्यांत कांहीं राहणार नाहीं. यास्तव मी नवाब साहेबांची अशी प्रार्थना करितों कीं, इंग्लिश लोकांवर व ज्या फौजेची त्यांजवर भक्ति आहे तिजवरच विश्वास ठेवून त्यांनीं राहावें." पाटणा एथें एक एतद्देशीय शूर सरदार होता त्याला क्लैव हा फार मान देत असे. त्यालाही त्यानें त्याच प्रकारचा मजकूर लिहून कळविलें कीं, "तुह्मी शत्रूचें कांहीं बोलणें कबूल करूं नका; जेथपर्यंत तुमच्यानें होईल तेथपर्यंत आपल्या शहराचा बचाव करा. इंग्लिश लोक हे कायमचे स्नेही आहेत व त्यांनीं जो पक्ष एकदां हातीं धरला तो ते सोडणार नाहींत अशी खात्री बाळगा."

क्लैव यानें आपल्या बोलण्याप्रमाणें केलें. शहाअलम यानें येऊन पाटणा शहराला वेढा दिला, आणि तो त्यावर हल्ला करणार तों त्याला कळलें कीं, क्लैव हा कुच दरकुच आपणावर चालून येत आहे. क्लैव

याच्या जवळ फक्त साडेचारशें युरोपियन लोक आणि अडीच हजार काळे लोक होते. परंतु क्लैव आणि त्याचे जे इंग्लिश शिपाई होते त्यांची सर्व हिंदुस्थानभर मोठी दहशत बसलेली होती. त्याच्या फौजेची पुढची टोळी येऊन नजरेस पडल्यावरोबरच, ती वेढा देणारी फौज पळाली. त्या शहाजाद्याजवळ जोखिमाची कामगिरी पतकरून पैसा मिळविण्यासाठीं जमलेले कांहीं फ्रेंच लोक होते, त्यांनीं त्याला लढून पाहावें ह्मणून सांगितलें, परंतु त्यानें तें ऐकिलें नाहीं. अशा प्रकारें या मोठ्या फौजेचें मुर्शिदाबाद येथें जें भय पडलें होतें तें थोडक्याच दिवसांत उडून गेलें. आणि ब्रितिश लोकांच्या नांवाच्या धाकानेंच तिचा मोड झाला.

क्लैव हा विजयी होत्साता फोर्त विलियम एथें परत आला. मीरजाफर याला जसें पूर्वीं पराकाष्ठेचें भय प्राप्त झालें होतें त्याप्रमाणेंच आतां अपार आनंद झाला. त्यानें कृतज्ञतेनें आपल्या त्रात्याला राजपदाला योग्य असें वक्षीस दिलें. कलकत्याच्या दक्षिणेस ईस्त इंदिया कंपनीच्या ताब्यांत जी पुष्कळ जमीन होती तिजबद्दल जे त्यांना उक्ते तीन लाख रुपये नवाबास द्यावे लागत असत ते सर्व त्यानें क्लैव यास ताहाहयात लावून दिले. या एवढ्या उत्पन्नावर ग्रेत ब्रितनांतील अत्यंत उंचपदवीच्या मानकऱ्याचाही डामडौल चालला असता.

क्लैव यास ही देणगी घेण्यास हरकत नव्हती. ती अशा जातीची होती कीं, ती गुप्त राहणें अशक्य

होतें; इतकेंच नाहीं, तर तेणेंकरून कंपनी ही स्वतः क्लैव याचें कूळ झाली. तिनें मीरजाफर यानें जी देणगी दिली त्यास हरकत घेतली नाहीं यावरून ती तिला पसंत पडल्यासारखी झाली.

परंतु मीरजाफर याची कृतज्ञता फार दिवस राहिली नाहीं. ज्या बलाढ्य दोस्तानें आपणास राज्य दिलें तो कदाचित् तें परत घेईल, असें त्याच्या मनामध्यें येऊं लागलें होतें; आणि ज्या सबल आश्रयाचा त्याला आजपर्यंत आधार होता त्यावरोवर टक्कर देण्यास दुसरा कोणी मिळेल तर तो पाहूं लागला. क्लैव याच्या लहानशा फौजेच्या समोरासमोर देखील उभी राहणारी एतद्देशीय लोकांमध्यें फौज मिळावयाची नाहीं, हें तो जाणत होता. फ्रेंच लोकांचा वंगाल्यामधून अंमल गेला होता; परंतु पूर्वीं हिंदुस्थानच्या आसमंतांतील समुद्रामध्यें दच लोकांची कीर्ति पुष्कळ होती, आणि हालंद देशाचें वजन युरोपामध्यें आलीकडे किती कमी झालें होतें तें अद्यापि एशियांत माहीत झालें नव्हतें. यामुळें चिनसुरा येथें दच लोकांचे जे व्यापारी होते त्यांजबरोबर आणि मुर्शिदाबाद येथील दरबाराबरोबर आंतून पत्रव्यवहार चालू झाला. आणि बतेविया येथील कारभाऱ्यांस, बंगाल्यांतील इंग्लिश लोकांबरोवर टक्कर देण्यासारखी फौज तयार करण्याविषयीं चिनसुरा येथून आग्रहाचीं पत्रें गेलीं. बतेविया येथील कारभारी आपल्या देशाचें वजन वाढविण्यासाठीं आणि पैसा मिळविण्यासाठीं नवीन आलेल्या पुष्कळ इंग्लिश लोकांस आलीकडे जेथून श्रीमंती प्राप्त झाली तेथून

आपणालाही कांहीं मिळावें ह्मणून विशेषच उत्सुक होते. त्यांनीं एक मोठें बलाढ्य आरमार तयार केलें, आणि इंग्लिश लोक पाहतात, तों अकस्मात् जावाहून सात मोठीं तारवें हुगळीमध्यें आलीं. यावर पंधराशें फौज होती, तीपैकीं सुमारें निमे गोरे होते. ही फौज आणण्यास दच लोकांनीं यथायोग्य वेळ शोधून काढली होती. कर्नाटकामध्यें फ्रेंच लोकांबरोबर लढण्यासाठीं क्लैव यानें आपल्या फौजेच्या पुष्कळ टोळ्या पाठविल्यामुळें त्याची फौज दच लोकांपेक्षां कमी होती. मीरजाफर याची शत्रूला आंतून मदत आहे हें त्याला माहीत होतें. दोस्त सरकारच्या फौजेवर हल्ला केला असतां आपण आपल्या-वर फारच जबाबदारी घेतली असें होईल; फ्रान्सा-बरोबर एक लढाई चालत असतां हालंदाबरोबर दुसरी सुरू व्हावी हें इंग्लंदांतील प्रधानांला आवडणार नाहीं; ते कदाचित् आपण केलेलीं कृत्यें कबूल कर-णार नाहींत; कदाचित् त्याबाबद शिक्षा करतील; या सर्व गोष्टी याच्या लक्षांत येऊन चुकल्या होत्या. तशांत आलीकडेच त्यानें आपला पुष्कळ पैसा, दच ईस्त इंदिया कंपनीच्या मार्फतीनें विलायतेस पाठविला होता, यामुळें त्यांजबरोबर न भांडणें यांत त्याचा विशे-ष फायदा होता. परंतु त्याच्या पक्कें ध्यानांत आलें कीं, बतेविया येथून आलेल्या फौजेला चिनसुरा येथील फौजेस मिळूं दिलें तर मीरजाफर हा या नव्या दोस्ता-चा जाऊन आश्रय धरील आणि तसें झाल्यानें बंगाल्यांतील इंग्लिश लोकांच्या श्रेष्ठत्वाला मोठा

धोका येईल. अशा अडचणींत त्यानें आपल्या स्वाभाविक धिटाईप्रमाणें निश्चय केला. या प्रसंगीं क्लैव याला त्याचे जे सरदार होते त्यांनीं व विशेषेंकरून कर्नल फोर्द यानें फार चांगली मदत दिली. अशा या नवीन उत्पन्न झालेल्या शत्रूबरोबर लढण्यांत फोर्द याजकडे त्यानें मुख्य कामगिरी सांगितली. दचलोकांनीं नदींतून वर जाण्यास यत्न केला; तेव्हां इंग्लिश लोकांनीं पाण्यांतून व जमिनीवरून अशा दोहीं मार्गांनीं अडथळा आणिला. दोहींकडे शत्रूची फौज अधिक होती; परंतु दोहींकडे त्यांचा पक्का पराजय होऊन गेला. त्यांचीं तारवें इंग्लिशांच्या हातीं लागलीं, व त्यांच्या फौजेचा इंग्लिशांनीं पराजय केला. शत्रूच्या फौजेंत युरोपियन शिपायांवर मोटा भरंवसा होता, परंतु ते बहुतेक मारले गेले किंवा इंग्लिशांच्या हातीं लागले. विजयी इंग्लिश लोक चिनसुऱ्याच्या पुढें जाऊन उभे राहिले आणि त्या ठाण्यांतील मुख्य मुख्य कारभारी अगदीं नम्र होऊन गेल्यामुळें क्लैव यानें सांगितल्याप्रमाणें त्यांनीं तहाचीं कलमें कबूल केलीं. तीं अशीं कीं, आह्मी किल्ले बांधणार नाहीं व आमच्या वखारींच्या रक्षणाला जे थोडसे शिपाई पाहिजेत त्यांशिवाय दुसरे शिपाई चाकरीस ठेवणार नाहीं, आणि या करारावाहेर जर तिळमात्र चाललों तर आह्मांला बंगाल्यांतून तत्क्षणींच घालवून द्यावें.

हा मोठा जय मिळविल्यानंतर तीन महिन्यांनीं क्लैव इंग्लंदास गेला. तेथें त्याला मान व बक्षिसें देण्यास लोक व सरकार तयारच होते. तीं याच्या

इच्छेप्रमाणें किंवा योग्यतेप्रमाणें जरी मिळालीं नाहींत तरी याचें वय, याची फौजेमध्यें पदवी आणि याची मूळची स्थिति हीं लक्षांत आणलीं असतां फार व दुर्मिळ होतीं असें ह्मटलें पाहिजे. याला राजानें ऐर्लंदांतील मानकरी केला आणि पुढें इंग्लंदांतील होशील अशी आशा दाखविली. तिसरा जार्ज राजा नुकताच गादीवर बसला होता. त्यानें याला मोठ्या समारंभानें भेट दिली. प्रधानांनीं याचें आगतस्वागत चांगलें केलें. पित ह्मणून जो प्रख्यात मुख्य प्रधान होऊन गेला त्याचें वजन यावेळीं पार्लमेंत सभेमध्यें आणि लोकांमध्यें अपार होतें. तोही त्या स्मरणीय काळाची कीर्ति होण्यास ज्या मनुष्याचे पराक्रम इतके कारणीभूत झाले होते त्याला मान देण्यास उत्सुक होता. क्लैव हा स्वर्गांतूनच आलेला सरदार आणि याचा धंदा जरी कारकुनीचा, तरी त्याचें युद्धकौशल्य पाहून प्रख्यात योद्ध्यांनींही मान डोलवावी, अशी याची पार्लमेंतामध्यें त्या प्रख्यात वक्त्यानें पूर्वींच स्तुति केली होती. पित हा त्या काळीं पहिल्या प्रतीचा राज्यकारभारी होता. ह्मणून ही त्याची स्तुति लोकांच्या तोंडून हळू हळू क्लैव याच्या कानीं बंगाल्यांत गेली. तेव्हां याला फारच भूषण वाटलें व समाधान प्राप्त झालें. दुसऱ्या जार्जाच्या वेळीं वुल्फ मरण पावल्यापासून तों हा वेळपर्यंत असा सरदार झाला नव्हता, यामुळें लोकांनीं याचें स्वाभाविक धैर्य व कौशल्य पाहून याला सहजच मोठा मान दिला व त्यांना याचें भूषण वाटलें.

इंग्लंदांतील उत्तम पदवीचे जे वडे लोक त्यांबरोबर टक्कर देण्यासारखी क्लैव याजवळ संपत्ति जमली होती. यानें अठरा लक्षांहून अधिक रुपये दच ईस्त इंदिया कंपनीच्या मार्फतीनें व चार लक्षांहून अधिक इंग्लिश ईस्त इंदिया कंपनीच्या मार्फतीनें पाठविले होते असा पुरावा अद्यापि आहे. याशिवाय यानें किरकोळ व्यापाऱ्यांच्या द्वारें पुष्कळ पैसा पाठविला होता. त्या वेळेच्या रीतीप्रमाणें हा पुष्कळ जवाहीर आपल्यावरोवर विकत घेऊन गेला होता. फक्त मद्रास येथेंच त्यानें अडीच लक्षांचे हिरे खरेदी केले होते. याच्या जवळ रोकड पुष्कळ होती आणि ाशिवाय हिंदुस्थानामध्यें जी याला जहागीर मिळाली होती तिचें उत्पन्न त्याच्याच हिशेवाप्रमाणें सालीना दोन लक्ष सत्तर हजार रुपये होतें. याचें चरित्र लिहिणारा सर जान मालकम याच्या मनामध्यें याची मिळकत जितकी थोडी होईल तितकी करून दाखवावी असें असून तो ती सालीना चार लक्षांपेक्षां अधिक होती असें ह्मणतो. आणि त्या वेळीं चार लक्ष ह्मणजे या वेळीं जसे दहा लक्ष विरळ आहेत तसे तरी निदान समजले पाहिजेत. आरंभीं जवळ कवडी नसतां कोणच्याही इंग्लिश गृहस्थाला कोणच्याही धंद्यामध्यें कधींही इतकी संपत्ति चवतिसाव्या वर्षीं मिळाली नाहीं असें ह्मणण्यास धास्ती दिसत नाहीं. परंतु ही जी संपत्ति प्राप्त झाली तिचा यानें योग्य रीतीनें व्यय केला असें ह्मटलें नसतांही अन्याय होईल. प्लासी येथील लढाईनें याचें नशीव उदयास येतांक्षणीं यानें आपल्या वहिणीला एक लक्ष रुपये पाठवून

दिले व इतर गरीब स्नेही व नातलग यांस आणखी तितके पाठवून दिले. यानें आपल्या मुनिमाला लिहून पाठविलें कीं, आमच्या आईबापांना सालीना आठ हजार रुपये देत जावे व त्यांजकडून गाडी ठेववावी आणि आपल्या वरील जुना सरदार लारेन्स हा गरीब होता ह्मणून त्याला सालीना पांच हजारांचे वेतन करून दिलें. याप्रमाणें क्लैव यानें पांच लक्ष रुपये खर्च केले असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

इंग्लंदांत गेल्यावर क्लैव यानें पार्लमेंतामध्यें आपलें महत्व वाढावें या हेतूनें उद्योग चालविला. यानें जमीन विकत घेतली ती बहुतेक याच हेतूनें घेतली असें दिसतें, आणि १७६१ ष्टामध्यें जेव्हां पार्लमेंतसभा भरली त्यावेळीं हाही त्या सभेचा सभासद झाला होता व तींत याच्या आश्रयानें झालेले सभासद इतके होते कीं, कोणच्याही पक्षाच्या प्रधानांला त्यांची मदत महत्वाची झाली असती; परंतु इंग्लंदांतील राज्यकारभारामध्यें क्लैव यानें फारसा पुढार घेतला नाहीं. कारण ज्या देशामध्यें शिपाईगिरीविषयीं व राज्यकारभाराविषयीं याची फार प्रख्याति होती, त्या देशाकडे याची सर्व नजर लागलेली होती यामुळें इंग्लंदाच्या राज्यकारभारापैकीं, ज्या ज्या गोष्टींमध्यें हा मन घाली त्यांचा हिंदुस्थानाशीं संबंध लक्षांत आणून तो वर्तणूक करी. त्यावेळीं बोर्द आव् कंत्रोल ह्मणून जी हिंदुस्थानचा कारभार पाहणारी सभा ती नव्हती, कोर्त आव् दैरेक्तर्स ही मात्र होती; परंतु तींतील सभासद बहुतकरून शुद्ध व्यापारी असत. त्यांना राज्यकारभार

ह्मणजे काय व जें राज्य आपल्या ताब्यांत मोठ्या विलक्षण रीतीनें आलें त्याविषयींच्या विशेष गोष्टी कांहींच समजत नसत. भागीदारांची ह्मणजे प्रोप्रैटर्स लोकांची जी सभा होती ती मोठी होती आणि तिचा अंमल पुष्कळ चालत असे. पांच हजार रुपयांचा भाग ज्याजवळ असे त्याला मत देण्याचा अधिकार असे. मतें देण्यामध्यें लवाडी, लांच घेणें व अंधाधुंदी पराकाष्ठेची चालत असे, त्यामुळें एकादा भागीदार आपण पुष्कळ भाग विकत घेऊन त्याचे लहान लहान हिस्से करून ते फक्त दुसऱ्याचे नांवावर मात्र चढवी, ह्मणजे त्याला सभा भरण्याच्या दिवशीं त्या आपल्या नामधारी सभासदांस आपल्या इच्छेप्रमाणें मत देण्याविषयीं सभेमध्यें घेऊन जातां येई. अशा कृत्यासाठीं क्लैव यानें दहा लक्ष रुपयांचे भाग विकत घेतले.

त्यावेळीं सांप्रतच्यापेक्षां इंग्लिश लोक हिंदुस्थानाकडे बरेंच लक्ष देत असत. याचें कारण असें होतें कीं, सध्या जे लोक तिकडून हिंदुस्थानांत चाकरीस येतात ते लहानपणींच येतात व त्यांची बढती हळू हळू होते, आणि पंचेचाळिसाव्या वर्षी तीन लक्ष रुपये जमवून व सालीना दहा हजार रुपयांच्या पेनशनावर आपला वारसा लागू करून जर परत जावयास मिळालें, तर ते आपणास मोठे नशीबवान् समजत. हिंदुस्थानामध्यें सरकारी इंग्रजी कामगार पुष्कळ पैका मिळवितात खरा; परंतु सर्व मिळून एकंदर विलायतेंत पुष्कळ पैका जातो. एकेकटा फार श्रीमान् होऊन जात नाहीं व जो पैका मिळतो तो हळू हळू कष्टानें आणि योग्य रीतीनें मिळवि-

लेला असतो. इंग्लंदांत राज्यकारभारामध्यें पड-लेल्या लोकांस मिळण्यासारख्या मोठ्या हुद्याच्या चार किंवा पांच मात्र जागा आहेत. बाकी रेसिदेंत, सेक्रेतरी, मुख्य कोर्तांचे जज्ज व रेविन्यू कमिशनर वगैरे ज्या जागा आहेत त्या सर्व ज्या लोकांनीं आपली सर्व कुवत हिंदुस्थानांतील चाकरीमध्यें घालविली आहे त्यांनाच मिळतात. कोणीही मनुष्य कितीही हुशार असला अथवा त्याचा वशिला कितीही जबर असला तरी या मोठ्या पगाराच्या जागा, जर तो इतरांप्रमाणें नौकरी-मध्यें शिरला नसला अथवा इतरांप्रमाणें पायरीनें वाढ-ला नसला तर त्याला मिळावयाच्या नाहींत. त्या वेळीं हिंदुस्थानामधून विलायतेंत सांप्रतच्यापेक्षां पैका कमी जात असे; परंतु तेणेंकरून थोडे लोक फार श्रीमान होत असत. कधीं कधीं असेंही होत असे कीं, पांच चार महिन्यांमध्यें विपुल द्रव्य मिळत असे. कोणी-ही इंग्रज त्याचें कितीही वय असलें तरी असा संपत्ति-मान होणें अशक्य नव्हतें. जर कोणी ईस्त इंदिया कंप-नीच्या दरबारांत चांगलें भाषण केलें किंवा त्यांच्या अध्यक्षाच्या तर्फेनें एखादें पुस्तक लिहिलें, तर त्याला हिंदुस्थानांत जाणें अशक्य नव्हतें व क्लैव किंवा पीगो यांसारखी संपत्ति मिळविणें अ-शक्य नव्हतें. सारांश, हिंदुस्थानचा कारभार ह्मणजे सोडत होऊन गेली होती. तींत नांव भरण्यास पाहिजे त्यास उत्तेजन येण्यासारखीं कारणें होतीं व जे थोडे नशीववान् असतील ते धनंजय शेट होण्याचा संभव होता. पृथ्वीच्या एका भागामध्यें फौजेंतील एका

हुद्देदारास एका प्रातःकाळीं इंग्लंदांतील मोठमोठ्या जहागीरदारांबरोबर जहागिरी बक्षीस मिळाली, व एक किंवा दोन लक्ष रुपये ह्मणजे ब्रिटिश सरकारचा जो कोणी अधिकारी नुसते मागेल त्याला मिळतात, असें जेव्हां चोहोंकडे कळलें तेव्हां तर सर्व लोकांची धांदलच उडून गेली. एकदम श्रीमान् व्हावें अशी ज्याला त्याला इच्छा उत्पन्न झाली आणि हळू हळू थोडा परंतु खातरीनें पैका मिळविण्याच्या मार्गाचा त्रास येऊं लागला.

त्या वेळीं कंपनीच्या दरबारामध्यें ज्या पक्षाचें वर्चस्व होवें त्या पक्षाचें आधिपत्य सलिवन नांवाचा बलाढ्य, हुशार आणि महत्त्वाकांक्षी अशा एका दैरेक्तराकडे होतें. याच्या मनामध्यें क्लैव याविषयीं पराकाष्ठेचें मात्सर्य आलें होतें व तो बंगाल्यामध्यें गव्हर्नर असतां त्यानें कंपनी दूर आहे असें जाणून तिचे हुकूम वारंवार अमान्य केले होते, हें सर्व सलिवन याच्या मनामध्यें सलत होतें. क्लैव परत इंग्लंदांत आला त्या वेळीं या दोघांची बाहेरून समजी झाली खरी; परंतु दोघांच्याही पोटांत शत्रुत्व पक्कें विंबून राहिलें होतें. सन १७६३ साांमध्यें नवे दैरेक्तर नेमण्याच्या वेळीं या वरिष्ठ पक्षाचा जोर क्लैव यानें मोडण्याचा यत्न केला. त्या वेळीं दोन्ही पक्षांनीं मोठ्या सपाट्यानें वितुष्ट चालविलें असें तोच ह्मणतो. अखेरीस सलिवन याचा जय झाल्यामुळें तो क्लैव याचा सूड उगवूं लागला. मीरजाफर याजकडून क्लैव याला जी जहागिरीची देणगी मिळाली होती तींत उत्तमधर्म-

शास्त्रवेत्त्यांच्या मतें कांहीं गैरशिस्त नव्हतें. ज्या मालकानें कंपनीला बंगाल्यांतील बहुतेक मुलूख दिला होता, त्याच मालकानें त्याला ही जहागीर दिली होती आणि कंपनीनें पुष्कळ दिवसपर्यंत ती त्याजकडे चालूं दिली होती; परंतु आतां ती दैरेक्तर लोकांनीं जप्त करण्याचा निश्चय केला. या मोठ्या अन्यायामुळें क्लैव याला त्यांजवर दिवाणी कोर्टामध्यें दावा करणें प्राप्त झालें.

इतक्यांत एकाएकीं दुसऱ्या मोठ्या विना येऊन ठेपल्या. बंगाल्यांतून जीं तारवें येत त्या प्रत्येकामधून काळजी लागण्यासारखी बातमी येऊं लागली. इंग्रजांच्या ताब्यांतील प्रांताच्या कारभाराची अव्यवस्था इतकी होऊन गेली होती कीं, तिजपेक्षां अधिक होणें कांहीं राहिलेंच नव्हतें; परंतु यांत कांहीं विशेष नव्हतें. त्यांचे जे सरकारी नौकर होते त्यांना असे मोहाचे प्रसंग असत कीं, क्लैव ह्मणतो या रक्तमांसाच्या देहास तो मोह पार पडून जाणें अशक्य होतें. त्यांच्या अधिकाराला अडथळा आणण्यास कोणी नव्हतें. त्यांना जबाबदारी कंपनीची मात्र होती; परंतु ती कंपनी अशी होती कीं, तींतील भागीदारांमध्यें ऐक्य मुळींच नव्हतें. कैद तर सुटूनच गेली होती आणि अयोग्य रीतीनें पैसा मिळविण्याचा लोभ फारच झाला होता. तशांत बंगाल्यांतून पत्र जाऊन त्याचा त्या कंपनीकडून जबाब येण्यास सरासरी दीड वर्षाहून अधिक काळ लागत असे, या कारणामुळें क्लैव बंगाल्यांतून गेल्यानंतर पांच वर्षेंपर्यंत राज्याची अशा प्रकारची दुर्दशा उडून

गेली होती कीं, राज्याचा बचाव होऊन सर्व लोक पूर्वीप्रमाणें आपापले धंदे करून एकत्र तरी कसे राहिले होते याविषयीं आतां कल्पना करणें ह्मणजे थोडीशी अडचण पडते. प्राचीनकाळीं रोमन राज्यांतील सुभेदार आपला ज्या प्रांतावर अंमल असेल त्यांतून प्रजेला पिळून इतकें द्रव्य मिळवीत कीं, कांपेनिया परगण्याच्या किनाऱ्यावर संगमरवरी दगडाचीं राजास योग्य अशीं मंदिरें व स्नानाच्या जागा बांधण्याचें, पिण्यास अंबराचे प्यालें बाळगण्याचें, मंजुळ गाणाऱ्या पक्ष्यांचें मांस खाण्याचें, आपल्या पदरीं पट्टा खेळणाऱ्या व तलवारीनें लढणाऱ्या गुलामांच्या पलटणी बाळगण्याचें व श्यामेलेपर्द यांचे कळप बाळगण्याचें सामर्थ्य एक किंवा दोन वर्षांमध्यें त्यांना येई. स्पानियर्द लोकांचे अमेरिकेंतून आलेले सुभेदार ह्मणजे जे मेक्सिको अथवा लैमा येथील लोकांचे शाप आपल्यावर घेऊन परत येत ते, सोन्याचा मुलामा दिलेला गाड्यांचा लांब तांडा व अन्न सामग्रीनें भरलेल्या परंतु रुप्याचे दागिने चढविलेल्या व रुप्यानें नालबंदी केलेल्या घोड्यांच्या रांगा लावून माद्रीद शहरांत प्रवेश करीत. त्यांच्यापेक्षांही विशेष प्रकार बंगाल्यामध्यें आतां घडून येऊं लागले. कंपनीच्या चाकरांमध्यें जे दुर्गुण असत त्यांत शुद्ध दुष्टपणा नव्हता खरा; परंतु श्रीमंत होण्याविषयीं त्यांची जी अन्यायी उत्कंठा तीपासून जीं अरिष्टें उत्पन्न झालीं त्यांपेक्षां दुष्टपणानेंही बहुधा अधिक झालीं नसतीं. आपण पदास चढविलेला जो मीरजाफर त्याला यांनीं हुसकवून दिला आणि त्याच्या ठिकाणीं

मीरकासीम नांवाचा दुसरा नवाब केला; परंतु मीरकासीम हा शहाणा होता आणि कोणच्या प्रसंगीं काय करावें याविषयीं निश्चय करण्याचें त्याच्या आंगीं सामर्थ्य होतें. आपल्या प्रजेवर आपण जुलूम करण्याची त्याची जरी पूर्ण इच्छा होती, तरी इतरांनीं तिला जुलूम करून धुळीस मिळवावी आणि त्यापासून आपणांला कांहीं फायदा होऊं नये इतकेंच नाहीं तर तेणेंकरून आपल्या जमावंदीस मुळांतच धोका बसावा हें त्याच्यानें सहन करवेना. यामुळें इंग्लिश लोकांनीं मीरकासीम यालाही हुसकावून दिलें, आणि मीरजाफर याला पुन्हा गादीवर बसविलें, तेव्हां मीरकासीम यानें इंग्लिश लोकांची ब्लाकहोल यांत जी कत्तल झाली होती त्याहून अधिक करून तो अयोध्येच्या नवाबाच्या राज्यांत पळून गेला. अशाप्रकारें ज्या राज्यक्रांति झाल्या त्यांत जो प्रत्येक वेळीं नवा नवाब होई तो पदच्युत झालेला जो नवाब त्याच्या खजिन्यामध्यें झाडून पुसून जो पैसा मिळत असे तो आपल्या वरील जे परदेशी यजमान त्यांना वांटून देत असे. ज्यांनीं त्याला राजा केला आणि पुनः पदच्युत करण्याचें ज्याच्या आंगीं सामर्थ्य होतें, त्यांच्या ताब्यांत तो आपली अपार प्रजा पाहिजे तसें करण्यास देत असे. देशांतील बहुतेक व्यापार कंपनीला मिळवून देण्याबद्दल कंपनीच्या चाकरांनीं इंग्रजांपासून आपणच आपल्या हातीं घेतला. एतद्देशीय लोकांनीं जिन्नस महाग विकत घ्यावे व स्वस्त त्यांस विकावे असा त्यांजवर ते जूलूम करूं लागले. देशांतील

न्यायाचीं कोर्तें व पोलिस आणि जमाबंदी करणारे अधिकारी यांचा अपमान ते करीत असत, तथापि शिक्षेचें भय मुळींच नसे. त्यांनीं कितीएक एतद्देशीय लोकांना आपल्या हाताशीं धरलें आणि ते लोक देशोदेशीं फिरून जिकडे जिकडे जात तिकडे तिकडे धुमाळी उडवीत, आणि हाहाकार करून सोडीत. ब्रितिश कामगारांच्या पदरच्या प्रत्येक नौकरास त्याच्या यजमानाइतका अधिकार असे आणि त्याच्या यजमानास सर्व कंपनीचा असे. या अशा कृत्यांनीं कलकत्त्यांतील ब्रितिश लोकांनीं अपार द्रव्य मिळाविलें आणि तीन कोटि प्रजेवर पराकाष्ठेची विपत्ति आणिली. त्या प्रजेला जुलमाचा अनुभव असे; परंतु अशा प्रकारचा जुलूम त्यांनीं कधीं सोसला नव्हता. त्यांना सुराजउद्दवलायाच्या मांडीपेक्षां कंपनीची करांगळी जाडी भासूं लागली. त्यांच्या पूर्वींच्या राजाच्या वेळीं एक तरी उपाय असे;—राजांचीं जेव्हां कृत्यें सोसतनाशीं होत तेव्हां लोक बंड करून त्या राजांस हुसकावून देत; परंतु इंग्लिश लोकांचा अंमल असा दुर्बळ नव्हता. ते जरी रानटी लोकांच्या अति जुलुमी रीतीनें राज्य करीत, तरी सुधारणुकेपासून जें बळ येतें तें सर्व त्यांच्या आंगीं असे. त्यांचें राज्य जुलूम करणाऱ्या मानवापेक्षां दुष्ट राक्षसाचेंच होऊन गेलें होतें असें ह्मटल्यास चिंता नाहीं. इंग्लिश लोक ह्मणजे सर्व मनुष्यमात्राचे वंशपरंपरेचे मानकरी व ज्यांच्या कौशल्यापुढें व शौर्यापुढें त्यापेक्षां दसपट लोकांचेंही कांहीं चालत नसे. त्यांबरोबर

लढण्यास नाजुक बंगाली लोकांना निराशेनेंही धैर्य आलें नाहीं. त्या दुर्दैवी लोकांनीं त्या जुलमास कधीं प्रतिकार करून पाहिला देखील नाहीं. कधीं कधीं हात पाय हालविल्याशिवाय जें होईल तें होऊं देत आणि दुःख सोशीत. कधीं कधीं पूर्वीं ज्याप्रमाणें त्यांचे वडील, मराठे लोक आले ह्मणजे पळत त्याप्रमाणें हे गोरकाय आले असें समजतांच जिकडे तिकडे जात व कधीं कधीं असें व्हावें कीं, एखाद्या साहेबाची स्वारी जात असली ह्मणजे गांवांत एकही मनुष्य आढळूं नये. कारण त्याच्या येण्याची बातमी येतांच सर्व लोक पळून जात.

बंगाल्यांतील या परदेशी मालकांचा आसपासचे राजे सहजच द्वेष करूं लागले; परंतु तितक्या सर्वांनाही ते जुमानून नव्हते. जिकडे तिकडे इंग्लिश लोकांबरोबर लढण्यासाठीं ज्या फौजा येत, त्या त्यांच्यापेक्षां मोठ मोठ्या असत; परंतु चोहींकडे इंग्रजांचा जय होई. क्लैव याच्या शिक्षेमध्यें तयार झालेले सरदार एका मागून एक उदयास आले होते. त्यांनीं आपल्या देशाची कीर्ति अद्यापपर्यंत राखिली होती. त्या वेळचा एक मुसलमान बखर लिहिणारा असें लिहितो कीं, "या लोकांचें धारिष्ट, बुद्धीचा निश्चय आणि अचाट शौर्य यांविषयीं संशय नाहीं हें कबूल केलें पाहिजे. ते मोठे दृढ धैर्याचे असून मोठे सावध व विचारी आहेत. फौज बरोबर उभी करणें आणि नियमानें लढणें या कामांमध्यें त्यांची बरोबरी करण्यास आज दुसरा कोणी नाहीं. हे इतके लढ·

ण्याचे गुण त्यांच्या अंगीं आहेत ते असून त्यांना राज्य करण्याच्या कौशल्याची जर माहिती असती व आपल्या लढाईसंबंधी कामांमध्यें जितके ते मन घालतात व कौशल्य खर्च करतात, तितकें मनुष्यमात्राचें दुःख परिहार करण्यामध्यें जर करते तर सर्व सृष्टीमध्यें यांजपेक्षां दुसरे कोणी चांगले अथवा अंमल करण्यास विशेष योग्य असे राहिले नसते; परंतु त्यांच्या राज्यामध्यें जिकडे तिकडे प्रजा दुःखानें पीडित होऊन गेली आहे आणि धुळीस मिळाली आहे. हे ईश्वरा, आपल्या व्यापलेल्या दासांच्या मदतीस ये आणि हा जो जुलूम त्यांजवर चालला आहे त्यापासून त्यांस मुक्त कर."

परंतु राज्यामध्यें जिकडे तिकडे अंधाधुंदी चालली असतां फौजेच्याच कारभारामध्यें फार दिवसपर्यंत अव्यवस्था झाल्याशिवाय राहावी हें अशक्य होतें. मुलकी कामगार जुलूम करितात आणि मजा मारतात व कोणी कोणाचें ऐकत नाहीं, हें पाहून फौजेंतील सरदारही तसेंच करूं लागले आणि सरदारांचें पाहून शिपाई करूं लागले. असें होतां होतां प्रत्येक मेसाचें घर फितुराचें व बंडाचें ठिकाण झालें आणि शिपाई कैदेंत राखण्यासाठीं, धर शिपाई आणि दे फांशीं असें करणें जरूर पडलें.

अखेरीस बंगाल्यामधील ही अव्यवस्था ऐकून विलायतेमध्यें काळजी उत्पन्न झाली. एका मागून एक राज्यक्रांति; राज्यव्यवस्थेमध्यें अंधाधुंदी; कारभाऱ्यांनीं रयतेला लुटावें, परंतु त्यापासून कंपनीला

तिलप्राय फायदा होऊं नये; जें तारूं हिंदुस्थानांतून येई त्या प्रत्येकांतून कोणी नाहीं कोणी तरी असा श्रीमान् झालेला गृहस्थ परत यावा कीं, त्याला राजमंदिराप्रमाणें वाडे बांधण्यास आणि मोटमोठाल्या जमिनी सहज विकत घेण्यास सामर्थ्य आलेलें असावें, परंतु त्याजबरोबरच राज्यांतील उत्पन्नाविषयीं मोठी काळजी उत्पन्न होण्यासारखी बातमी यावी; सरहद्दीवर लढाया चालाव्या; फौजेमध्यें नाखुषी असावी, आणि पराकाष्ठेची जुलूम जबरदस्ती होऊन इंग्लिश लोकांच्या नांवाला बट्टा लागावा; अशा गोष्टी पाहून ज्या लोकांना हिंदुस्थानांतील कारभाराची माहिती होती त्यांना मोटा विस्मय उत्पन्न झाला. तेव्हां जो तो असें ह्मणूं लागला कीं, क्लैव यानें जें राज्य स्थापिलें त्याचा बचाव तोच करील, त्याशिवाय दुसऱ्या कोणाच्यानें व्हावयाचा नाहीं.

कंपनीच्या भागीदारांची सभा, या गोष्टीविषयीं विचार करण्यास भरली, त्यावेळीं त्या सर्वांचा असाच विचार आहे हें अगदीं उघड रीतीनें दृष्टोत्पत्तीस आलें. सर्व पक्षांचे लोक आपआपलीं वैमनस्यें विसरले, आणि फायद्यापैकीं आपला हिस्सा कमी होईल ह्मणून घाबरून अशा प्रसंगीं हिंदुस्थानांत क्लैवच पाहिजे असें ह्मणूं लागले व आणखी असें ह्मणूं लागले कीं, त्याच्या जहागिरीबाबद जो जुलमाचा प्रकार चालला आहे तो सोडून द्यावा आणि परत हिंदुस्थानांत जाण्यास त्याला विनंती करावी.

हें सर्व ऐकून घेऊन क्लैव बोलला कीं, जहागिरी-

गोंडानें तंटा तुट
विषयीं माझें असें सांगणें आहे कीं, परंतु यापेक्षां ण्यासारख्या गोष्टी मी कबूल करतों; ही कीं, माझा दुसरी एक मोटी अडचण आहे ती अध्यक्ष आहे शत्रु सलिवन हा जेथपर्यंत कंपनीचा तेथपर्यंत मी बंगालचा कारभार पतकरणार नाहीं. हें त्याचें बोलणें ऐकतांच एकदम मोटी गडबड झाली. सलिवन याचें बोलणें कोणी ऐकत ना देखील असें ह्मटल्यास चिंता नाहीं. क्लैवाच्या पक्षाला इतके सभासद मिळाले कीं, सलिवन याला आशा राहिली नाहीं; तेव्हां कोणी कोणाच्या तर्फेनें मत दिलें हें कळूं नये अशा रीतीनें या प्रकरणांत मतें द्यावीं असें सलिवन याचें बोलणें पडलें. परंतु त्या सभेच्या नियमांप्रमाणें अशा प्रकारचीं मतें घेण्यास नऊ सभासदांच्या सह्यांचें विनंतीपत्रक लागत असे आणि त्या वेळीं जरी शेंकडो सभासद हजर होते तरी त्या पत्रकावर सही करण्यास नऊ असामी मिळतना.

यामुळें क्लैव याला बंगाल्यांतील ब्रितिश राज्याचा गव्हर्नर आणि कमांदर इन् चीफ नेमला; परंतु त्यानें आपलें पूर्वीचें बोलणें सोडलें नाहीं आणि पुढें कोण कोण दैरेक्तर नेमले जातात हें पाहिल्याशिवाय मी कामावर जात नाहीं ह्मणून सांगितलें. यामुळें त्या नेमणुकेच्या वेळीं मोठा हट्ट पडला; परंतु अखेरीस क्लैव याचा जय झाला आणि नुकताच पूर्वी सलिवन जो या सभेचा अगदीं मालक होऊन बसला होता त्याला एक जर मत कमी मिळतें तर त्याच्या सभासदपणाचाही हुद्दा आतां गेला असता. नवीन अंमलदार

झाले त्यांमधील अध्यक्ष आणि उपाध्यक्ष दोन्ही क्लैव याचे मित्र होते.

अशा प्रकारें क्लैव तिसऱ्यानें हिंदुस्थानांत येण्यास निघाला. ही त्याची शेवटची खेप होती. तो निघाला तो कलकत्त्यास सन १७६५ सालच्या मे महिन्यांत येऊन पोहोंचला. तेव्हां त्याला वाटलें होतें त्यापेक्षांही राज्याचें सर्व घड्याळ अधिकच विघडून गेलेलें त्याच्या दृष्टीस पडलें. तो गलबतांत असतांच मीरजाफर मरण पावला होता आणि त्याचा वडील मुलगा मीरान हा त्याच्या पूर्वींच मेला होता. एतद्देशीय राजांपासून नजराणे घेऊं नये ह्मणून सक्त हुकूम कलकत्त्यांतील अधिकाऱ्यांस या पूर्वींच येऊन पोंचले होते; परंतु फायदा करून घेण्यास उत्सुक असून दूर राहणारे, गैरमाहित व हयगय करणारे जे आपले धनी त्यांचे हुकूम मोडण्याची यांना संवय पडली होती, ह्मणून पुन्हा त्यांनीं बंगालच्या तक्ताचें लिलांव पुकारिलें. त्या लिलांवामध्यें कंपनीचे जे मुख्य अधिकारी होते त्यांतून नऊजणांस १४,००,००० रुपये मिळाले आणि या लांचाच्या जोरानें माजी नवाबाच्या एका अज्ञान मुलाला त्यांनीं तक्तावर बसाविलें. क्लैव येऊन पोंचतांच त्याला या लाजिरवाण्या व्यवहाराची बातमी कळली. त्यानें हिंदुस्थानांत आल्यावर एका परमस्नेह्याला पत्र लिहिलें त्यामध्यें जें त्यानें लिहिलें आहे तें, तो किती धीट, किती दृढ बुद्धीचा आणि आपले मनोविकार गौरवानें शोभवून दाखविणें या विषयीं किती बेपरवा असे हें लक्षांत आणलें असतां

विलक्षण रीतीनें मनास लागण्यासारखें आहे. तो असें ह्मणतो कीं, "अरेरे इंग्रज लोकांचें नांव कसें बुडालें! इंग्लिश लोकांचें नांव बुडालें ह्मणून माझ्यानें क्षणभर अश्रु ढाळल्याशिवाय राहवलें नाहीं. तें आतां पुनः वर येईल असें वाटत नाहीं; तथापि सर्वसाक्ष जो ईश्वर, ज्याला मरणानंतर जर आत्मा राहत असला तर, आपल्या कृत्यांचा आह्मांला हिशेब द्यावा लागेल त्याची शपथ घेऊन मी अशी प्रतिज्ञा करतों कीं, मी आतां अनीतीनें पैसा मिळविण्याच्या सर्व प्रकारच्या पापवासना मनांतून घालवून हिंदुस्थानांत आलों आहें; आणि ही जी मोठी बेबंदाई चालली आहे व चालणार ती एक नाहींशी करावी किंवा त्या प्रयत्नांत आपण मरून जावें, असा निश्चय केला आहे."

पुढें कौन्सिल भरलें तेव्हां मी पुरी सुधारणूक करणार आणि त्यासाठीं मला जो मुलकी व लष्करी मोठा अधिकार मिळाला आहे तो सर्व चालविणार असें क्लैव यानें सांगितलें. त्या सभेमध्यें जानस्तन ह्मणून एक मोठा धीट आणि अतिदुष्टांपैकीं गृहस्थ होता, त्यानें याचें न चालूं देण्याचा थोडासा डौल घातला. त्यावरून क्लैव यानें त्याला पुढें न बोलूं देतां मोठ्या धिटाईनें विचारलें कीं, माझ्या अधिकाराविषयीं तुझ्या मनामध्यें कांहीं संशय आहे कीं काय? हें ऐकतांच जानस्तन दबला आणि असा विचार माझ्या मनामध्यें मुळींच नाहीं ह्मणून बोलूं लागला हें पाहून सर्व सभासदांचे चेहेरे खाडकर उतरून गेले, आणि क्लैव याच्या विरुद्ध चालण्याविषयीं कोणाच्यानें चकार शब्द काढवला नाहीं.

क्लैव यानें ह्मटल्याप्रमाणें तो हिंदुस्थानामध्यें सुमारें दीड वर्ष होता. तितक्या वेळांत त्यानें दुसऱ्या कोण-त्याही राज्यकारस्थान्यानें पूर्वी कधीं केली नाहीं अशी एक मोटी आणि चांगलें फळ होण्यासारखी सुधारणा केली. यावेळीं जीं कृत्यें त्यानें केलीं त्यांचा याला पुढें मोठा अभिमान वाटत असे; यानें या पूर्वींच पुष्कळ संपत्ति मिळाविली होती; परंतु ती आतां तिप्पट करावयाची जर तो ह्मणता तर तेंही झालें असतें. अव्यवस्था मोड-ण्याचा डौल घालून तिकडे कानाडोळा करणें आणि वंगाल्यांतील निराश्रित आणि गांडू लोक कीं, ज्यांना हे आपल्यावर जुलूम करणारे कोणत्या बेटांतून येतात, हें माहीत नव्हतें, व ज्यांचीं गाऱ्हाणीं समुद्रावरून पंधरा हजार मैल लांब ऐकूं जाण्याचा संभव फारच थोडा होता अशा त्या बंगाली लोकांवर इंग्रजांना जुलूम करूं देऊन त्यांच्याशीं गोडी राखणें याच्या स्वाधीन होतें. याला असें माहीत होतें कीं, सुधारणुकेचें काम मनापासून केलें असतां लोकांच्या मनांतील सर्व प्रकारच्या वाईट बुद्धि जागृत होऊन ते आपल्यावर उठतील. त्याला आणखी असें ठाऊक होतें कीं, थोडक्याच काळांत मान-कऱ्याच्या पदवीस योग्य अशी संपत्ति मिळविण्याच्या हेतूनें हिंदुस्थानांत गिधाडासारखे आलेले हे जे उचले होते त्यांची निराशा झाली असतां ते सत्यासत्याचा विचार न करितां आपला दीर्घद्वेष करतील; परंतु या वेळीं यानें खऱ्या पक्षाचें अवलंबन केलें होतें आणि ही जी ह्मासीच्या पेक्षांही कठीण लढाई ती लढण्यासाठीं यानें आपली सर्व मानासिक शक्ति तयार केली. प्रथम जय

होईल असें वाटलें नव्हतें; परंतु त्याचें धैर्यरूपी खड्ग आणि अनिवार्य निश्चय यांपुढें सर्व अडचणी हात टेकूं लागल्या. एतद्देशीय लोकांपासून नजराणे न घेण्याविषयीं यानें सक्त रीतीनें बंदोवस्त केला. कंपनीच्या पदरच्या लोकांचा खासगी व्यापार यानें मोडून टाकला. हे बंदोवस्त न चालूं देण्याविषयीं सर्व लोक एकमतानें अडथळा आणूं लागले; परंतु क्लैव याची बुद्धि पक्की निश्चयात्मक होती. त्यानें असें सांगितलें कीं, कलकत्त्यामध्यें जर मला मदत मिळाली नाहीं तर मी दुसरीकडून मिळवीन आणि त्याप्रमाणें त्यानें राज्यकारभार चालविण्यास मदत करण्यासाठीं मद्रासेहून मुलकी कामगार आणिले व आपणास अडथळा करण्यामध्यें जे पुढारी होते त्यांना कामावरून दूर केलें, तेव्हां बाकीचे सर्व, अडथळा केला असतां व्यर्थ असें समजून कबूल झालें. असें होतां होतां लवकरच सर्व अडचणी नाहींशा झाल्या.

परंतु क्लैव हा फार सुज्ञ मनुष्य होता, यामुळें याच्या सहज लक्षांत आलें कीं, जी अंधाधुंदी चालली होती तिचें एक कारण असें होतें कीं, त्या कारणापासून, क्लैवसारख्या मनुष्याची दक्षता नाहींशी होतांच ती अंधाधुंदी तशीच पुन: सुरू होईल. आपल्या पदरच्या लोकांस मुशाहिरा ठरविण्यामध्यें कंपनीनें चूक केली होती; तो मुशाहिरा इतका कमी होता कीं, उष्ण देशामध्यें राहून सुख होण्यास आणि शरीरप्रकृति नीट राहण्यास ज्या ज्या गोष्टी अवश्य आहेत त्या त्या प्राप्त होण्यास पुरे इतका तो देखील नव्हता. मग पैसा जमविण्याची गोष्ट

तर एकीकडेसच राहिली. यास्तव असा मुशाहिरा घेऊन सामान्य हुशारीचे मनुष्य देखील परदेशामध्यें आणि अत्युष्ण हवेंत आयुष्याचा उत्तम काल घालविण्यास खुषी होते अशी कल्पना करावयास नलगे. यामुळें पुष्कळ वर्षांपासून असें समजलें होतें कीं, कंपनीचे जे गुमास्ते होते त्यांना खासगी व्यापार करून पैसा मिळविण्यास मोकळीक आहे, यामुळें कंपनीला व्यापारामध्यें फार हानि होत असे. पहिल्या जेम्स राजाच्या वेळीं सर तामस रो ह्मणून जो चतुर प्रवासी हिंदुस्थानांत आला होता त्यानें दरेक्तर लोकांना या गैरशिस्त वहिवाटीचा बंदोबस्त करण्याविषयीं फार सांगितलें होतें. तो असें ह्मणे कीं, "खासगी व्यापार अगदीं बंद करून टाका. कारण तसें केलें असतां तुमचें काम चांगलें चालेल. असें करणें तुमच्या चाकरांस जड जाईल ही गोष्ट मी कबूल करतों, परंतु फक्त मुशाहिराच घेऊन राहण्यासाठीं आह्मी येत नाहीं असें तुमच्या पदरचे लोक उघड सांगतात; यास्तव त्यांचें समाधान होण्यासारखा मुशाहिरा जर तुह्मी त्यांना दिला तर ही सबब सांगण्यास त्यांना जागा राहणार नाहीं आणि असें केल्यानें आपल्या धंद्याला खर्च काय लागतो हें तुम्हाला उघड कळेल." ही उत्तम सूचना लक्षांत न घेतां कंपनी जुन्या वहिवाटीप्रमाणेंच लहान पगार देई आणि कामगार लोक पगाराशिवाय जो पैसा मिळवीत तिकडे कानाडोळा करी. कौन्सिलदारांचा पगार सालीना फक्त तीन हजार रुपये असे; तथापि अशा हुद्देदाराच्यानें पगाराच्या दसपटीपेक्षां कमी खर्च करून राहवत नसे.

ही गोष्ट जगजाहीर होती आणि हिंदुस्थानामध्यें सुखान काळ घालवूनच इंग्लंदास परत जाण्याचे वेळीं पैसा जमवून बरोबर नेण्यासाठीं कांहींच तजवीज न करतां तो स्वस्थ राहत असेल असें मानणें व्यर्थ होतें. बंगाल प्रांत कंपनीच्या अमलांत येण्यापूर्वीं अशा रीतीनें वहिवाट चालल्यानें हिस्सेदारांला जो सालीना फायद्याचा हिस्सा पावयाचा तो मात्र कमी येत असे; परंतु दुसऱ्या कोणत्याही प्रकारें तीपासून तोटा होण्यासारखा नव्हता. परंतु बंगाला घेतल्यापासून कंपनीकडे राज्याचा अधिकार आला. आणि तेव्हांपासून तिच्या पदरच्या लोकांस मुनीम, गुमस्ते, लहान व्यापारी आणि मोठे व्यापारी असें जरी नांवानें म्हणत असत, तरी वास्तविक पाहिलें असतां ते सुभेदार व सर सुभेदार होते. त्यांच्या हाताखालीं मोठमोठाले प्रदेश असत व त्यांचा अधिकार पुष्कळ असे. त्यांचे नियमित पगार त्यांच्या खर्चास पुरण्यासारखे नाहींत हें सर्व कबूल करीत असत, यामुळें कंपनीच्या चाकरांची परंपरेची वहिवाट चालत आल्याप्रमाणें आणि त्यांच्या मालकांनीं जी परवानगी उघड दिली नव्हती व मनाही केली नव्हती तीमुळें त्यांना पगाराखेरीज दुसऱ्या रीतीनें पैका मिळविणें योग्यच होतें. ज्या जुलमानें आणि अनीतीनें बंगाल्याचा विध्वंस झाला होता त्याचें कारण हेंच होतें. क्लैव याच्या नजरेस पूर्णपणें आलें कीं, चाकरांस अंमल देऊन दरिद्रामध्यें ठेवणें गैरशिस्त आहे, यामुळें त्यानें असा निश्चय केला कीं, कोणत्याही प्रकारची सुधारणूक केली तरी तिच्या बरोबर कंपनी-

त्या चाकरांस चांगला मुशाहिरा देण्याचा ठराव केला नाहीं तर ती सर्व व्यर्थ जाईल.

परंतु त्याला माहीत होतें कीं, दरेक्टर लोक आपल्या खजिन्यांतून जास्ती खर्च करून पगार वाढविण्यास खुषी नाहींत, यामुळें तो बेत सिद्धीस नेण्यास एकच मार्ग राहिला; परंतु तो त्यानें धरल्यामुळें त्याच्याविषयीं लोकांच्या मनामध्यें पुष्कळ गैर समजुती भरल्या. या मार्गानें जाण्यास त्याला यथायोग्य कारण होतें असें आह्मांला वाटतें. मिठाच्या व्यापारापासून जो फायदा व्हावयाचा तो त्यानें कामदारांच्या पगाराकडे लावून दिला. हें उत्पन्न अद्यापपर्यंतही सरकारच्या जमेंतील मुख्य कलम आहे. त्यानें तें नियमित रीतीनें सर्वांच्या मुशाहिऱ्याकडे लावून दिलें. ती रीत गैरशिस्त होती असें वाटत नाहीं; परंतु यामुळेंच त्याचे शत्रु व इतिहासकार यांनीं त्याजवर दोष आणिला आहे. ते ह्मणतात कीं, अशा प्रकारें ठराव केल्यानें त्यानें हुकुमाविरुद्ध वर्तणूक केली, आपण दिलेलीं वचनें मोडलीं आणि कंपनीच्या चाकरांचा खासगी व्यापार मोडणें हें जें त्याचें यावेळीं हिंदुस्थानांत येण्याचें मुख्य कारण तेंच पुन्हा सुरू केलें; परंतु जो कोणी विचारपूर्वक व निष्पक्षपातानें पाहील तो असें कबूल करील कीं, जो प्रकार मोडण्याविषयीं याला पाठविलें होतें आणि जो प्रकार त्यानें सुरू केला त्या दोहोंमध्यें साम्य मुळींच नव्हतें. क्लैव जन्मण्याच्या पूर्वींपासूनच मिठाची गादी करून सरकार पैसा जमवीत असे आणि त्याच्या मरणानंतरही तो प्रकार तसाच चालला होता. मुलकी खात्याकडील

जे कंपनीचे नोकर होते त्यांचा सरकारी जमाबंदींतून उदरनिर्वाहास मिळण्याचा हक्क उघड होता आणि क्लैव यानें जें कांहीं केलें तें इतकेंच कीं, त्या खर्चाकडे जमाबंदीची एक बाब लावून दिली. असें केल्यानें थोड्याच काळांत अचाट द्रव्य मिळविण्याची शक्ति नाहींशी करून प्रत्येक नौकराला हळूहळू, पण निश्च-यानें साधारण रीतीचा पैसा मिळविण्याची यानें सोय केली. असें आहे तथापि मनुष्यमात्राची दोष लाव-ण्याची चाल अशी आहे कीं, ज्या कितीएक गोष्टी यानें निःसंशय अयोग्यतेच्या केल्या त्यांहून या बंदोबस्तामुळें त्यास जास्ती दोष देण्यांत आला आहे; परंतु हा प्रकार जर यानें सुरू केला नसता तर याच्या सुधारणुकीचे जे दुसरे बेत ते तडीस गेले नसते.

याप्रमाणें त्यानें मुलकीखात्यांतील लोकांनीं आणलेल्या हरकती नाहींशा करून टाकल्या; परंतु पलटणींतील सरदारांशीं लढणें हें ह्याहीपेक्षां मोठें कठीण होतें दरेक्कर लोकांनीं ज्या कितीएक खर्चाच्या बाबी कमी करण्यावि-षयीं हुकूम दिले होते तेणेंकरून सरदारांचा बराच तोटा झाला होता, यामुळें जी गर्दी उडाली ती बंद करण्यास सीझर देखील खुषीनें सरसावला नसता. ज्या देशामध्यें राज्यकारभार मुख्यत्वेंकरून तलवारीचे जोरावर चाल-ला होता त्या देशामध्यें ज्यांच्या हातीं तलवारी होत्या त्यांजबरोबर भांडणें ही गोष्ट सोपी नव्हे. दोनशें स-रदार एकत्र जमले आणि त्यांनीं असा कट केला कीं, सर्वांनीं आपापल्या चाकरीच्या सनदा एके दिवशीं परत टाकाव्या. त्यांना असें वाटलें कीं, असें केलें असतां

ज्या सैन्याच्या जोरानें इंग्लिश लोकांचें राज्य चाललें आहे त्या सैन्यावरील सरदार एकदम जाऊं द्यावे, त्यापेक्षां ते जें मागतील तें त्यांस द्यावें असें क्लैव याच्या मनामध्यें निःसंशय येईल; परंतु ज्या पुरुषाबरोबर ते भांडण्यास उठले त्याचें धैर्य किती अजिंक्य हें त्यांस माहीत नव्हतें. याच्याजवळ विश्वास ठेवण्यासारखे कितीएक सरदार होते त्यांखेरीज कितीएक नवे आणण्यासाठीं यानें मद्रासेस निरोप पाठविला आणि याप्रसंगीं याला मदत करण्यास इच्छिणारे असे जे कितीएक फक्त व्यापाराच्याच कामामध्यें गुंतलेले होते, त्यांना यानें सरदारीच्या सनदा दिल्या आणि असा हुकूम फरमाविला कीं, जे कोणी सरदार राजीनामा देतील त्यांना एकदम कलकत्त्यास पाठवावें. अशा या बंदोबस्तामुळें त्यां फितूर झालेल्या सरदारांस आपण केलेला बेत व्यर्थ गेला असें वाटलें. क्लैव याच्या पुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं. सर्व फौजेमध्यें जसा बंदोबस्त असावयाचा तसाच राहिला. काळ्या फौजेवर क्लैव याचें पराकाष्ठेचें वजन असे, यामुळें ते याच्या बाकडे मोठ्या इमानानें राहिले होते. अखेरीस यानें फितुरांपैकीं पुढाऱ्यांना धरलें आणि त्यांची चौकशी करून त्यांना चाकरींतून दूर केलें. बाकीचे त्यांची अवस्था पाहून नम्र झाले आणि त्यांची हिंमत खचली. त्यांनीं आपले राजीनामे माघारे द्यावे अशी विनंती केली. कितीएकांना पश्चात्ताप होऊन त्यांच्या डोळ्यांतून अश्रूही आले. जे गुन्हेगार कमी उमरीचे होते त्यांजवर क्लैव यानें दया केली. जे मुख्य मुख्य होते त्यांजवर फार सक्ती केली; परंतु ही जी

सक्ती केली ती खासगी कारणांवरून सूड उगवून अकल्याण करावें या हेतूनें केली नव्हती. तो आपल्या हुद्याचा योग्य मान मोठ्या कडाक्यानें राखीत असे, परंतु खासगी रीतीनें आपला कोणी तोटा केला असला किंवा राग येण्यासारखी वर्तणूक केली असली तरी त्याविषयीं तो थोर मन करून अगदीं बेपरवा असे व तशा गोष्टी तुच्छ मानी. जे सरदार फितूर झाले होते त्यांतून एकानें गवर्नरास मारण्याचा बेत केला होता असा त्यावर आरोप आला; परंतु मी त्याविषयीं चौकशी करीत नाहीं ह्मणून क्लैव यानें सांगितलें. तो असें ह्मणाला कीं, "हे सरदार इंग्रज आहेत, मारेकरी नाहींत."

यानें मुलकी खात्यामध्यें सुधारणूक केली आणि फौजेवर आपला अंमल वसविला, त्याप्रमाणेंच परराज्यावरोवर जो व्यवहार चालविला तोही याचा तडीस गेला. तो हिंदुस्थानांत येतांच जिकडे तिकडे स्वस्थता झाली. त्यावेळीं अयोध्येचा नवाव मोठी फौज घेऊन बाहारचे सरहद्दीवर येऊन पडला होता. त्याच्या मदतीस पुष्कळ आफगाण व मराठे आले होते. आणि सर्व एतद्देशीय राजे मिळून इंग्रजांबरोवर युद्ध करतील असें वाटण्यास सबळ कारणें होतीं; परंतु क्लैव याचें नांव ऐकतांच सर्व शत्रु क्षणामध्यें जिकडे तिकडे दबले आणि त्यांनीं अतिनम्रतेनें सल्लयाचीं बोलणीं लावलीं व क्लैव सांगेल त्याप्रमाणें ऐकतों म्हणून कबूल केलें.

हीं कामें करून यानें बंगालच्या कारभाराची नवीच शिस्त सुरू केली. यापूर्वीं त्या प्रांतांत इंग्लिशांकडे

किती अधिकार होता याविषयीं कांहींच ठराव नव्हता. अशा प्रकारचा ठराव करण्याची चाल दिल्लीच्या बादशाहींत मुळींच नव्हती किंवा दोन्ही पक्षांकडून बोलणीं होऊन कांहीं तहनामे झाले नव्हते. इंग्रज लोक आजपर्यंत जितका अधिकार घेणें सोईस पडेल तितका वळकावीत असत; तरी अखेरीस जो अधिकार लढून मिळाला होता तो कायद्यावरून आणि वंशपरंपरेच्या चालीवरून मजबूद करण्यास हरकत पडली नाहीं. कारण जो अधिकार वास्तविक रीतीनें इंग्लिश चालवीत असत त्याविषयीं क्लैव यानें दिल्लीच्या बादशाहापासून सनद मागितली. बादशाहास ना म्हणण्याची सवड मुळींच नव्हती, यामुळें तो जरी प्रथम कुरकुरला, तरी बिनकिमतीचीं चार फारशी अक्षरें घेऊन रोख रुपये देण्यास इंग्लिश लोक खुषी आहेत हें पाहून त्याला संतोषच वाटण्यास कारण होतें. कां कीं, ते रुपये त्यांजवळून त्याच्यानें जबरीनें घेववले नसते. अखेरीस दोन्ही पक्षांचा लवकरच ठराव झाला आणि हिंदुस्थानच्या नामधारी तक्ताधिपतीनें कंपनीला बंगाल, बहार आणि ओढ्या या प्रांतांची जमाबंदी वसूल करून तिची व्यवस्था करण्यास सनद दिली.

अद्यापपर्यंत या प्रांतांचा नवाब होता खरा; परंतु तो विचारा जितका अधिकार कंपनी त्याला टेवील तितकाच चालवून राहत असे. त्याला अगदीं नाहींसें करण्याचें क्लैव याच्या मनामध्यें बहुधा येऊन चुकलें होतें; परंतु पुनः याला असें वाटलें कीं, नवाबाचें नांव राखल्यानें कांहीं हित होईल. मुख्यत्वेंकरून इतर

युरोपियन लोकांबरोबर व्यवहार ठेवण्यास उपयोगी पडेल. त्या लोकांना नवाबाला मान देण्याची आजपर्यंत संवय होती, त्यामुळें ते त्याचा अधिकार आपल्याच बरोबरीची जी इंग्लिश लोकांची कंपनी तिजपेक्षां लवकर मानतील अशी क्लैव यानें कल्पना केली. ही कल्पना त्या वेळास ठीक असेल; परंतु लवकरच या ढोंगाला कोणी फसेनासें झालें. त्यामुळें तें थोडक्याच वेळांत टाकून देणें प्राप्त झालें. मीरजाफर याचा वारस अद्यापपर्यंत मुर्शिदाबाद ही जी त्याच्या घराण्याची मूळची राजधानी तेथेंच राहतो. अद्यापि त्याला नवाब अशी पदवी आहे आणि इंग्लिश लोक महाराज म्हणून सलाम करितात. त्याचे पूर्वज जीं राजचिन्हें बाळगीत असत त्यांतून कितीएक त्याजकडे चालूं देतात. त्यास सरकार सालीना १६,००,००० रुपये पेनशन देतें. त्याच्या गाडीबरोबर शिपाई असतात आणि रुप्याच्या काठ्या घेऊन भालदार चोपदार त्याच्यां पुढें धांवतात. त्यावर व त्याच्या राहण्याच्या जागीं दिवाणी किंवा फौजदारी कामदारांचा अधिकार चालत नाहीं, इतकें सर्व आहे; परंतु वास्तविक राज्याचा अधिकार त्याजकडे तिळप्राय देखील नाहीं, आणि तो फक्त इतर प्रजेप्रमाणें असून थोर व श्रीमान मात्र आहे.

क्लैव यानें बंगाल्यामध्यें दुसऱ्या वेळीं राज्यकारभार केला तेव्हां सहज इतकी संपत्ति मिळविली असती कीं, सर्व युरोपामध्यें राजे खेरीज करून त्याच्या इतकी कोणाजवळ नसती. त्या प्रांतांतील जे श्रीमान् लोक होते त्यांजवर अति थोडा जुलूम करणारे जे राजे होऊन गेले

त्यांपेक्षां जास्ती जबरी न करितां सालीना तीस लक्ष रुपये उत्पन्न होण्यासारखे नजराणे त्याला घेतां आले असते. त्याची कृपा संपादण्यासाठीं आसमंतांतील रजवाड्यांनीं तो मागता तें खुषीनें दिलें असतें; परंतु इतरांच्या वागणुकीविषयीं त्यानें जे नियम ठरवून दिले होते त्यांप्रमाणेंच तो सदोदित चालत असे असें वाटतें. काशी येथील राजानें त्याला द्यावयास मोटमोठे मौल्यवान् हिरे काढले होते. अयोध्येचा नवाब यानें पुष्कळ रोकड आणि एक उत्तम रत्नखचित डबी घेण्याविषयीं त्याला आग्रह केला होता; परंतु त्यानें तीं सर्व आदरानें, परंतु साफ रीतीनें नाकारिलीं. वरील गोष्ट सांगतांना आणखी असें सांगितलें पाहिजे कीं, या नाकारण्याविषयीं तो बढाई करीत नसे व या गोष्टी लोकांना त्याच्या मरणानंतर कळून आल्या. आपला पगार, मिठाच्या व्यापारांतील फायद्याचा हिसा व एशियाखंडांतील रीतीप्रमाणें जे नजराणे नाकारणें अयोग्य दिसलें असते ते, यांचा जमाखर्च तो बरोबर ठेवीत असे. या बाबींपासून जें उत्पन्न होई त्यांतून तो आपला खर्च चालवीत असे. बाकी उरेल ती त्याबरोबर त्याच्या प्रांतांतील कितीएक लोक आले होते त्यांना तो वांटून देई. तो नेहमी अशी बढाई सांगत असे कीं, शेवटच्या वेळीं मी बंगाल्याचा कारभार केला त्यांत माझी संपत्ति वाढण्याच्या बद्दल कमी झाली, हें त्याचें बोलणें खरें असावें असें दिसतें.

परंतु एक मोठा नजराणा यानें घेतला. मीरजाफर यानें आपल्या मृत्युपत्रांत रोकड आणि जवाहीर मिळून

सहा लक्ष रुपये याच्या नांवानें ठेविले होते. जे के
म आलीकडे यानें केलें होते ते देणगीगार जिवंत अस
ला तर मात्र लागू होतें. मृत्युपत्रावरून मिळालेल्या संपत्तीस लागू नव्हतें, यावरून क्लैव यानें ती देणगी मान्य केली; परंतु ती आपले हातीं घेतली नाहीं. तो सर्व पैका यानें कंपनीच्या चाकरीमध्यें जे सरदार व सोल-जर निकामी होतील त्यांजकडे खरचण्यासाठीं कंप-नीच्या स्वाधीन केला. त्याच्या नांवानें जो फंड कंप-नीचें राज्य राणीकडे जाईपर्यंत चालू होता तो अशा प्रकारें निघाला.

अठरा महिनेपर्यंत हिंदुस्थानांत राहिल्यावर प्रकृति बिघडल्यामुळें क्लैव याला परत जाणें प्राप्त पडलें म्हणून, इसवी सन १७६७ च्या जानेवारी महिन्यामध्यें, ज्या देशाच्या स्थितींत त्याच्या हातून एवढा मोटा फेरफार घडून आला होता तो सोडून तो शेवटीं गेला.

तो बंगाल्यांतून प्रथम परत गेला तेव्हां त्याच्या देश-बांधवांस जसा आनंद झाला तसा दुसऱ्या वेळीं झाला नाहीं. ज्या कारणांमुळें याचा यापुढें उरलेला आयुष्याचा भाग दुःखानें मिश्रित झाला आणि याचा काल अकालीं झाला तीं अनेक कारणें यापूर्वीच सुरू झालीं होतीं. दैरेक्तर लोकांमधील याचे जुने शत्रु अझून अंमल बाळगून होते व ते याच्या अकल्याणाविषयीं अद्यापि यत्न करीत होते. त्यांच्या मदतीला आणखी दुसरे पुष्कळ येऊन मिळाले. त्यांचा सपाटा तर पूर्वींच्यापेक्षांही अतिशय होता. ज्या चोरांच्या आणि झोंडांच्या हातून बंगाल प्रांत यानें सोडविला ते सर्व आपल्यासारख्या नीच लोकां-

च्या स्वभावाप्रमाणें मोठ्या दुष्टपणानें याला छळूं लागले. यानें दृढनिश्चयानें त्यांची पुंडाई बंद केली होती म्हणून याला विशेष रीतीनें छळतां यावें एवढ्याच हेतूनें ते कंपनीचे भागीदार झाले. त्यांनीं याला शिव्या देण्यासाठीं खोटा मजकूर लिहिणारीं कितीएक वर्तमानपत्रें काढलीं. बहुधा जेथें सत्य व योग्यता आहे तेथें अशा युक्ति सिद्धीस जावयाच्या नव्हेत; परंतु त्यावेळीं लोकांच्या मनाची अशी स्थिति झाली होती कीं, त्यांपासून त्याप्रसंगीं विलक्षण परिणाम झाला.

हिंदुस्थानामध्यें ज्या मोठ्या विना घडून आल्या होत्या त्यांहींकरून एका नव्या प्रकारचे इंग्लिश लोक उदयास आले होते. यांना यांचे देशबांधव नवाब असें म्हणत असत. हे पिढीजादे श्रीमान् किंवा कुलीन नसत; परंतु लहानपणीं हिंदुस्थानांत येऊन तेथें पुष्कळ संपत्ति मिळवीत आणि ती घेऊन आपल्या देशास परत जात. उंच पदवीच्या लोकांमध्यें वागण्याची विशेष संवय नसल्यामुळें एकाएकी श्रीमंत झालेल्या लोकांप्रमाणें कांहीं थोडा अडाणीपणा व कांहीं डौल ते दाखवीत; व असें होणें हें स्वाभाविकच होतें. हिंदुस्थानामध्यें राहिल्यानें त्यांना अशा कांहीं संवयी लागाव्या व अशा कांहीं गोष्टींची आवड लागावी कीं, जे लोक युरोप सोडून कधीं कोठें बाहेर गेले नसत त्यांना त्यांविषयीं आश्चर्य वाटावें, किंबहुना त्रास यावा, हेंही स्वाभाविकच होतें. हिंदुस्थानामध्यें मोठें महत्त्व भोगल्यामुळें परत आपल्या देशास आल्यावर लहानपणा सोसण्याची त्यांची इच्छा नसावी हेंही स्वाभाविकच होतें. आणि त्यांजवळ पैका

होता; परंतु ते पिढीजादे थोर नव्हते अथवा त्यांचे संबंधी थोर नव्हते यास्तव आपला केवळ पैशाचा थोरपणा थोडासा लोकांच्या नजरेंत खुपण्यासारखा त्यांनीं मिरवावा हेंही स्वाभाविकच होतें. जिकडे जिकडे ते जाऊन राहत तिकडे तिकडे तेथील जुने शेती भाती व मानकऱ्यांच्या घराण्यांतील लोक यांच्या मध्यें व या नवाबांमध्यें एका प्रकारचें वैमनस्य उत्पन्न होई. अशा प्रकारें थोर लोकांशीं वैमनस्य असणें हें कंपनीच्या नोकरांचें पुष्कळ वर्षेंपर्यंत एक विशेष लक्षणच होऊन गेलें होतें.

अशा कारणामुळें हे नवाब लवकरच अगदीं आवडेनातसे झाले. त्यांतून कितीएकांनीं हिंदुस्थानांत असतां आपल्या कामामध्यें मोटी बुद्धि दर्शविली होती व सरकारची चाकरी चांगली बजाविली होती; परंतु परत गेल्यावर ती त्यांची बुद्धि उपयोगास पडेना व त्यांची बजावलेली चाकरी फारशी कोणास माहीत नसे. ते मूळचे गरीब; परंतु त्यांनीं पुष्कळ संपत्ति मिळविली. ती संपत्ति ते डौलानें दुसऱ्यांस राग येई अशी मिरवीत व उधळेपणानें खर्चीत. ते जेथें जाऊन राहत तेथें आसमंतात सर्व प्रकारच्या जिनसांची महागाई करून सोडीत. त्यांच्या गाड्या, घोडे व त्यांचे चाकर इंग्लंदांतील जे अति मोठे लोक त्यांपेक्षां छानदार असत. त्यांच्या घरचा मोठा कारखाना व त्यांतील अव्यवस्था यांहींकरून जिकडे तिकडे चाकर लोक बिघडून जात आणि त्यांचा असा जरी डौल असे, तरी सभ्य लोकांचे गुण त्यांतून कितीएकांच्या आंगीं न येतां मूळचा हलके-

पणा त्यांचे आंगीं राही. या अशा अनेक कारणांमुळें ते जरी फार खर्च करून डौलानें राहत, तरी ज्या लोकांमध्यें ते उत्पन्न झालेले व ज्या लोकांमध्यें ते आपणांस मोडण्यास पाहत त्या लोकांमध्यें तिरस्कार व मत्सर झाल्याच्या योगानें त्यांविषयीं अति धिक्कार उत्पन्न होई; परंतु ही अशी विशाल संपत्ति त्यांनीं विश्वासघातानें खरे वारस राजे पदच्युत करून प्रांताचे प्रांत भिकेस मिळवून जमविली होती, असें जेव्हां लोक बोलूं लागले तेव्हां तर त्या दुष्ट प्राण्यांनीं ती संपत्ति दुराचरणानें व बेअब्रूनें मिळविली व ती ते आतां मिरवून गैरशिस्त रीतीनें खर्चीत आहेत हें पाहून त्या दुष्टांविषयीं मनुष्य जातीचे सर्व योग्य व अयोग्य, उंच व नीच जे मनोविकार ते चेतले. दयावंत लोक या नवाबांनीं कोणत्या रीतीनें पैसा मिळविला हें जेव्हां ऐकत तेव्हां त्यांच्या आंगावर रोमांच उभे राहत आणि ते कोणत्या रीतीनें खर्च करतात तें पाहून लोभी मनुष्यांची ही तशीच अवस्था होई. रंगेले लोक होते ते त्यांना अनाडी समजून आपल्या मंडळीमध्यें गणीनात. रसिक असत ते त्यांची अरसिकता पाहून चेष्टा करीत. अगदीं निरनिराळ्या शैलीनें लिहिणारे व निरनिराळ्या मतांचे ग्रंथकार गंभीर विद्वज्जन व चावट लोक, या सर्व परस्पर विरुद्ध मतांच्या लोकांचीं मतें या एवढ्या गोष्टीविषयीं खचित सारखीं जमलीं. ह्या ज्या मनोवृत्ति वर सांगितल्या त्या इंग्लंदांतील सर्व मनोरंजक ग्रंथांमध्यें सुमारें तीस वर्षेपर्यंत एक सारख्या दृष्टीस पडत होत्या असें ह्मटलें असतां हरकत नाहीं. एका प्रख्यात सोंगाड्यानें

नाटयस्थलांवर एका नवावाचें सोंग आणिलें, तो वाईट चालीचा, उधळया, निर्दय व जुलमी होता; त्याला आपले लहानपणचे गरीब मित्र पाहून लाज वाटत असे, तो मानकरी लोकांचा द्वेष करी; तथापि आपणांस लोकांनीं त्यांत मोजावें ह्मणून पोराप्रमाणें उत्सुक असे, कुटणकी करणाऱ्या व हांजी हांजी करणाऱ्या लोकांकडे तो आपला पैसा उडवीत असे, आपल्या अध्यक्षास अति खर्चानें उष्णदेशांतील लाविलेल्या फुलांनीं शोभवीत असे; आणि गैरमाहीत लोकांस **जहागिरी, रुपये, लाखो,** अशा शब्दांनीं भरलेल्या गोष्टी सांगून चकित करीत असे. माकेनजी ह्मणून एक कल्पित कादंबरी लिहिण्यामध्यें प्रख्यात मनुष्य होता. त्यानें एक गोष्ट रचली आहे तिच्या मध्यें नाजूक थट्टेनें गांवढ्यांत राहणाऱ्या एका साध्या कुटुंबाचें वर्णन केलेलें आहे. त्यांत लिहिलें आहे कीं, त्या कुटुंबांतल्या एका मनुष्यानें हिंदुस्थानांतून एकाएकीं संपत्ति मिळवून आणल्यानें तें श्रीमान झालें होतें. त्यांतले लोक थोर लोकांप्रमाणें वर्तण्यास जात, परंतु तें त्यांस साधेना, ह्मणून लोक त्यांची टर उडवीत. कौपर ह्मणून एक धार्मिक प्रख्यात कवि त्यावेळीं होऊन गेला. त्यानें इंग्लिश लोकांच्या ज्या दोषांवरून ईश्वरानें त्यांजकरवीं फार नाशकारक लढाया कितीएक वर्षेपर्यंत चालविल्या; त्यांच्या आरमाराचा त्यांच्याच आसमंतात पराभव केला व अतलांतिक महासागरापलीकडील त्यांचें राज्य घालविलें; या नशीबाच्या फेऱ्यास जीं लोकांचीं पातकें

त्याच्या मतें कारण झालीं त्यांत हिंदुस्थानावर त्यांनीं फार जुलूम केला, ही गोष्ट मुख्य मानिली.

याविषयीं निर्णय करण्यास आपल्या हातीं जो आधार सांप्रत आहे त्यावरून नवावांविषयीं लोकांची त्यावेळीं अशी कल्पना होती असें दिसतें. अशा त्या नवावांच्या पक्तींत क्लैव हा तर प्रमुखच होता. नवाव असें नांव पावण्यास जर ते गृहस्थ योग्य होते तर त्यांत क्लैव हा विशेषेंकरून होता. त्या सर्वांमध्यें हा अतिहुशार, अति कीर्तिमान्, आति अब्रूस चढलेला आणि अतिसंपत्ति मिळविलेला होता. तो आपली संपत्ति अशा रीतीनें मिरवीत असे कीं, तेणेंकरून लोकांच्या मनांत द्वेष उत्पन्न झाल्यावांचून राहूंच नये. तो लंदनामध्यें मोठ्या डौलानें राहत असे. लंदनाबाहेर त्यानें दोन वाडे उठविले होते. पार्लमेंतामध्येंही त्याचें वजन आति वजनदार घराण्याबरोबर टक्कर देण्यासारखें होतें; परंतु अशा प्रकारें जरी याचा अंमल व वैभव होतें, तरी लोकांनीं हेवा करण्यासारख्या याजमध्यें कांहीं गोष्टी होत्या. याच्या कितीएक नातलगांना संपत्तीचा उपभोग सुरेख रीतीनें घेतां येईना व त्याच्याही आंगीं जरी मोठे गुण होते तरी त्याच्या वर्गाचीं विशेष लक्षणें नाटककारानें जीं दाखविलीं आहेत तींही अगदींच नव्हतीं असें नाहीं. रणभूमीवर याची आयुष्यक्रमणाची पद्धत्ति विलक्षण रीतीची साधी असे खरी—ह्मणजे तो पाहावा तेव्हां घोड्यावर असे, पलटणी पोषाग केल्याशिवाय नजरेस पडत नसे, रेशमी वस्त्रें कधीं वापरीत नसे, मेण्यांत तर कधीं वसलाच नाहीं आणि अगदीं साधें अन्न खाऊन

संतुष्ट असे; परंतु फौजेबरोबरचें काम संपलें ह्मणजे हा साधेपणा टाकून देऊन तो मोठी मिजास भोगूं लागे. याचें शरीर जरी सुंदर नव्हतें व याच्या चेहऱ्यावर धीटपणा, उग्रता व मोठेपणा यांचीं चिन्हें होतीं त्यामुळें मात्र तो रांठ व कुरूप दिसला नाहीं, तरी मौल्यवान व छानदार पोषाख करण्याचा याला फार शोक असे आणि विलक्षण रीतीचा उधळेपणा करून हा आपल्याजवळ अनेक व तऱ्हतऱ्हांचे पोषाख बाळगीत असे. सर जान मालकम याच्या ग्रंथामध्यें एक त्याचें पत्र आहे; त्यांत तो लिहितो कीं, अति उत्तम व छानदार ह्मणून ज्या बंड्या मिळत असतील, त्या दोनशें मला पाठवून द्याव्या. अशा प्रकारचा वेडेपणा कितीएक वेळां केल्यामुळें व इतरांच्या तोंडांत त्याची विशेष अतिशयोक्ति झाल्यामुळें लोकांच्या मनामध्यें याविषयीं वाईट ग्रह होऊं लागला; परंतु अशा प्रकारचाच वाईट ग्रह झाला असें नाहीं, तर हिंदुस्थानांतील त्याच्या वर्तणुकेविषयीं कलंक लागण्यासारख्या गोष्टी चहूंकडे पसरल्या. त्या बहुतेक खऱ्या नव्हत्या. तशांत त्याच्या हातून एक दोन वेळां जीं वाईट कृत्यें झालीं होतीं त्यांचाच दोष याजवर आला असें नाहीं. तर सर्व इंग्रजांनीं जीं वाईट कृत्यें केलीं होतीं त्यांचा व तो नसतांना जीं कृत्यें झालीं त्यांचा, इतकेंच नाहीं, तर ज्या वाईट कृत्यांविषयीं त्यानें जबर शिक्षा केल्या होत्या व जीं बंद करण्याविषयीं तो मोठ्या धिटाईनें भांडला होता, त्या सर्वांचा दोष त्याजवर येऊन पडला.

जे जुलूम बंद करण्यासाठीं तो निकरानें, भलेपणानें व विजयानें लढत होता तेच जुलूम त्यानें केले असें लोक ह्मणूं लागले. सारांश एशियामध्यें रुपये मिळविण्यासाठीं गेलेल्या इंग्लिश लोकांनीं जी अनीति व ज्या गैरशिस्त गोष्टी केल्या असें जन, सबळ कारणांवरून किंवा विनाकारण मानीत असत, त्या सर्व गोष्टी मूर्तिमंत याच्या मध्यें आहेत असा ग्रह झाला. ज्या लोकांना याविषयीं कांहीं माहिती नव्हती ते देखील लोकांचें ऐकून याला राक्षस असें मानीत. मोठ मोठे विद्वान लोकही असेंच समजत. ब्रौन नांवाचा एक मनुष्य क्लैव यानें ऐष आरामासाठीं बगीचा वगैरे जागा तयार करण्यास ठेविला होता. त्यानें आपल्या श्रीमान् यजमानाच्या घरीं मुर्शिदाबाद येथील खजिन्यांतून आणलेल्या सोन्यानें पूर्वीं कधीं भरलेली अशी एक पेटी पाहिली, तेव्हां क्लैव याला अशी पेटी आपल्या निजण्याच्या खोलीच्या इतकी जवळ घेऊन निजण्यास त्याचें मन कसें खात नाहीं हें ब्रौन याला अजब वाटलें. तो जे दोन वाडे बांधीत होता त्यांतून एकाच्या भोंवतालीं जे शेती भाती होते त्यांना तो वाडा पाहून भय वाटे आणि ते असें ह्मणत कीं, भुतानें येऊन सगळ्याचा सगळाच याला रात्रीं घेऊन जाऊं नये ह्मणून हा दुष्ट श्रीमान् गृहस्थ वाड्याच्या भिंती इतक्या जाडी बांधीत आहे.

इकडे क्लैव यानें बंगालच्या कारभारामध्यें जी व्यवस्था सुरू केली होती ती दिवसानुदिवस कमी कमी होत चालली. याची बहुतेक पद्धत सुटून कारभार होऊं लागला. ज्या गैरशिस्त वहिवाटी यानें मोडून

टाकिल्या होत्या त्या पुनः सुरू झाल्या आणि अखेरीस वाईट राज्यापासून जीं अरिष्टें उत्पन्न होतात तीं होऊन त्यांत विशेष असें एक झालें कीं, राज्यनीति जरी अति उत्तम असली, तरी त्याचें निवारण व्हावयाचें नाहीं. इसवी सन १७७० मध्यें अवर्षण पडलें तें अशा प्रकारचें कीं, जमीन सुकून गेली, तलाव कोरडे खडखडीत पडले आणि नद्यांमधील पाणी जिरून गेलें येणें करून असा दुष्काळ पडला कीं, गंगा नदीच्या दोन्ही तीरांचा प्रदेश विपत्तीनें आणि मृत्यूनें भरून गेला असें ह्मटल्यास चिंता नाहीं. ज्या देशामध्यें प्रत्येक कुटुंबाला उदरनिर्वाहाचा आधार काय तो आपल्या लहानशा शेताचाच असतो त्याच देशांतील लोकांस अशा प्रकारचा दुष्काळ ह्मणजे काय तें समजेल, दुसऱ्यास समजावयाचें नाहीं. ज्या कोमल आणि नाजुक स्त्रियांनीं कधीं लोकांच्या दृष्टीस पडण्याच्या ठिकाणीं तोंडावरील बुरखा काढलाच नव्हता व आपलें सौंदर्य लोकांच्या दृष्टीस पाडलेंच नव्हतें त्या आपली लज्जा एकीकडे ठेवून खोलींतून बाहेर पडूं लागल्या आणि रस्त्यांतील लोकांच्या पुढें लोटांगणें घालून "मुलांना मूठभर भिक्षा घाला" असें मोठ्या विलापानें ह्मणूं लागल्या. सत्ताधारी इंग्रज लोकांचे बंगले व बगीचे हुगळी नदीच्या बाजूनें होते, त्यांतून पाहिलें असतां रोज हजारो मुर्दे वाहून जातांना दृष्टीस पडूं लागले. कलकत्त्यांतील रस्ते देखील मेलेल्या आणि मरावयास टेंकलेल्या माणसांनीं अडून गेले आणि जे लोक जिवंत राहिले ते इतके कृश व अशक्त होऊन

गेले होते कीं, सगयासोयऱ्यांचे मुर्दे जाळावयास नेण्यापुरती अथवा गंगंत नेऊन टाकण्यापुरती देखील कुवत त्यांच्या आंगीं राहिली नव्हती. गिधाडें आणि कोल्हे, दिवसास गांवांत येऊन उघड रीतीनें माणसांचें मांस खात. या अनर्थानें एकंदर किती मनुष्यें मेलीं याचा कधीं कोणीं आडावाही काढिला नाहीं; परंतु लक्षावधि मेलीं असें लोक ह्मणत असत; इंग्लंदांतील लोकांचीं मनें हिंदुस्थानांतील व्यवस्थेविषयीं चंचल झालेलीं होतींच तीं या दुःखकारक बातमीनें अगदीं गलबलून गेलीं. कंपनीचे भागीदार आपला फायद्याचा हिस्सा थोडा येईल ह्मणून घाबरून गेले. त्या दुर्दैवी प्रजेचीं दुःखें ऐकून ज्यांच्या ऱ्हदयांत फार थोडी दया होती तसे देखील सर्व मनुष्य कळवळले. इतक्यामध्यें अशी बातमी उठली कीं, कंपनीच्या चाकरांनीं सर्व तांदूळ खरेदी करून ठेविल्यानें हा दुष्काळ पडला. धान्य विकत घेऊन तें त्यांनीं मूळच्या किमतीपेक्षां आठपट, दसपट व कधीं कधीं बारापट देखील किमतीनें विकलें आणि कोणा एका कामदाराजवळ एका वर्षाच्या पूर्वीं एक हजार देखील रुपये नव्हते त्यानें या दुष्काळाच्या समयीं लंदनास सहा लक्ष रुपये पाठविले अशा या बातमीमुळें पूर्वीं उत्पन्न झालेल्या दयेंत त्वेष मिळाला. आह्मांला तर असें वाटतें कीं, हे दोष यांजवर विनाकारण आले होते. क्लैव गेल्यानंतर कंपनीचे नौकर तांदुळांचा व्यापार करूं लागले असतील असा संभव होता खरा, आणि जर तो तसा केला असला, तर

दुष्काळामुळें त्यांना फार फायदाही झाला असेल खरा; परंतु सृष्टिनियमानें जें अरिष्ट आलें तें यांनीं आणलें किंवा वाढविलें असें ह्मणण्यास कारण नाहीं; परंतु हा बोभाटा इतका वाढला होता कीं, मोठ मोठाले समंजस आणि विद्वानही यावर भरंवसा टेवूं लागले. यांत आणखी विशेष सांगण्याचें हें कीं, या वातम्यांवरून क्लैव याविषयीं लोकांच्या मनामध्यें अधिकाधिक वाईट येऊं लागलें; परंतु हा दुष्काळ पडला त्याच्या पूर्वींच कितीएक वर्षें क्लैव हिंदुस्थानांतून निघून गेला होता व यानें जे बंदोबस्त केले त्यांतून कोणत्याचाही असा परिणाम होण्यासारखा अगदीं संभव नव्हता. जर कंपनीच्या चाकरांनीं तांदुळांचा व्यापार केला असला तर तो क्लैव याच्या हुकुमाच्या अगदीं विरुद्ध केला व जेथपर्यंत त्याच्या हातीं अधिकार होता तेथपर्यंत तो हुकूम त्यानें मोठ्या सक्तीनें अमलांत आणला होता; परंतु वर सांगितल्याप्रमाणें इंग्लिश लोक त्याला नवाबांतील मुख्य नवाब व हिंदुस्थानांत आलेले जे इंग्रज लोक त्यांच्या सर्व गुणांची हा एक मूर्तिच असें समजत असत, आणि तो इंग्लंदाच्या एका कोनांत घरदार बांधून वतनवाडी बनवीत होता त्या वेळीं बंगाल्यांत पडलेल्या दुष्काळाविषयींची जबाबदारी लोक त्याजकडे लावीत असत.

हा वेळेपर्यंत हिंदुस्थानांतील राज्याकडे पार्लमेंतानें सांगण्यासारखें लक्ष दिलें नव्हतें. दुसरा जार्ज राजा मरण पावल्यापासून प्रधानांच्या बदल्या वरचेवर झाल्या व जे प्रधानांचा अधिकार पावत त्यांचें वजन

विशेष नसे. तशांत राजदरबारीं एकमेकांच्या कल्याणाविषयीं व अकल्याणाविषयीं पुष्कळ मसलती चाललेल्या असत. लंदनामध्यें पुंडावे चाललेले असत. अमेरिकेंतील वसाहत केलेल्या देशामध्यें बंडें झालीं होतीं. अशा या कारणांमुळें हिंदुस्थानांतील राज्यकारभाराकडे लक्ष देण्यास प्रधानमंडळीस फावलें नाहीं. तशांतूनही त्यांनीं कितीएक वेळां हात घालून पाहिला; परंतु त्याविषयीं त्यांचा निर्धार नसल्यानें सांगण्यासारखें कांहीं निष्पन्न झालें नाहीं. शेवटीं सन १७७२ यामध्यें असें लोकांस वाटूं लागलें कीं, आतां यापुढें हिंदुस्थानाच्या राज्यकारभाराविषयीं हयगय करून पार्लमेंताचें चालावयाचें नाहीं. व मागील दहा वर्षांमध्यें प्रधानांच्या हातीं जो अंमल होता त्यापेक्षां यावेळीं विशेष आला होता. इंग्लंदांतील कारभाराविषयीं अथवा दुसऱ्या देशांतील कारभाराविषयीं पार्लमेंतांतील लोकांनीं लक्ष देण्यासारखी कोणतीही गोष्ट अडलेली नव्हती; तशांत कंपनीला पैक्याविषयीं अडचण पडली; या सर्व कारणांमुळें प्रधानांस हा विषय हातीं धरणें जरूर पडलें आणि हें वादळ इतके दिवस जमतां जमतां अखेरीस क्लैव हात्यामध्यें सांपडला.

यावेळीं क्लैव याची अवस्था विलक्षण दुर्दैवाची झाली होती. सर्व देशभर लोक याचा द्वेष करीत. हिंदुस्थानचे कारभारी याचा द्वेष करीत. व याहीपेक्षां विशेष हें कीं, कंपनीच्या ज्या श्रीमान व बलाढ्य चाकरांचा जुलूम व पुंडाई यानें बंद केली होती, ते

सर्व याचा द्वेष करीत. याला दोहींकडून दोष सोसावा लागला—यानें ज्या चांगल्या गोष्टी केल्या त्यांबद्दल व ज्या वाईट केल्या त्यांबद्दल, हिंदुस्थानांतील जी अव्यवस्था होती तिजबद्दल आणि जी सुधारणा झाली तिजबद्दल. पार्लमेंतामध्येंही याला विशेष मदत मिळण्यासारखी नव्हती. हा ज्या पक्षास पूर्वी पासून सामील होता तो मोडून गेला होता. याच्या वजनानें पार्लमेंतांत जे सभासद गेलेले होते ते मात्र याच्या तर्फेनें खचीत मतें देण्यासारखे होते. याचे शत्रु, दुष्ट, नीतिअनीतींचा विचार न करणारे व दीर्घद्वेषी असे होते. त्यांतही याच्या सद्गुणावरून याचा द्वेष करणारे जे होते ते तर विशेषंकरून तसे होते. याची संपत्ति व कीर्ति सर्व लयास जावी असा त्यांचा पूर्ण हेतु होता. याला पार्लमेंतांतून काढून टाकावा, याचें वजन नाहींसें व्हावें, याची मालमत्ता जप्त व्हावी असा त्यांचा हेतु होता आणि इतकेंही होऊन त्यांचें समाधान झालें असतें किंवा नसतें याचा संशयच होता.

लढण्यामध्यें ज्या मसलती यानें पूर्वी केल्या त्याप्रमाणेंच पार्लमेंतामध्यें केल्या. याचा सर्व आश्रय सुटला होता. सर्वजण जमून याजवर टपले होते. याला मदत करणारांपेक्षां याचे शत्रु पुष्कळ होते व याचें सर्वस्व जावें अशी वेळ येऊन गुजरली होती; तथापि आपला फक्त बचाव होण्याची तजवीज पाहून उगीच राहावें असें याच्या मनांत देखील येईना. तो शत्रूवर हल्ला करण्यास सपाट्यानें सरसावला.

हिंदुस्थानच्या राज्यकारभाराविषयीं वादविवाद सुरू झाल्यावर लवकरच यानें आपणावर आलेले बहुतेक दोष उडविण्यासाठीं एक लांब व विचारानें तयार केलेलें भाषण केलें तें ऐकण्यास जे लोक जमले होते त्यांचें त्यापासून बरेंच समाधान झालें असें ह्मणतात. लार्ड चाताम ह्मणून त्या वेळीं एक अति प्रख्यात वक्ता होता. तो तें ऐकावयास आला होता. तो ह्मणाला कीं, यापेक्षां चांगलें भाषण मीं आजपर्यंत ऐकलें नाहीं. पुढें तें यानें छापविलें. तें तयार करण्यामध्यें याच्या विद्वान मित्रांनीं याला मदत केली असेल ती सर्व लक्षांत आणली तरी असें सिद्ध होतें कीं, त्याच्या आंगीं शौर्य आणि उत्तम समंजसपणा होता इतकेंच नाहीं; तर वाद करण्याची व भाषण करण्याची याची अशा रीतीची शैली होती कीं, यानें मेहनत करून जर ती वाढविली असती तर उत्तम प्रकारची झाली असती. आपण शेवटीं जो कारभार केला त्यांत जीं जीं कृत्यें केलीं त्यांविषयीं मुख्यत्वेंकरून यानें हें भाषण केलें आणि त्यावरून याच्या पक्षाचा खरेपणा इतका सिद्ध झाला कीं, त्यापुढें याच्या शत्रूंनीं यानें त्यापूर्वी केलेल्या कृत्यांवर मुख्यत्वेंकरून हल्ला चालविला.

याच्या पूर्वीच्या कृत्यांमध्यें शत्रूंचा मार लागू पडण्यासारखीं कांहीं कृत्यें होतीं खरीं. हिंदुस्थानच्या कारभाराची चौकशी करण्याविषयीं पार्लमेंतानें एक कमेटी नेमिली, तिजमध्यें ज्या मोठ्या राज्यक्रांतीमुळें सुरजउद्दवला याचें राज्यपद जाऊन मीरजाफर यास तें मिळालें, त्याविषयीं सर्व चौकशी अशा सक्तीनें

झाली कीं, ती पूर्ण द्वेषबुद्धीनें चालली आहे असें उघड दिसून आलें. त्या चौकशींत क्लैव याची अशी छळून जबानी घेतली कीं, "मी बारन आव् प्लासी असून माझी चौकशी एकाद्या मेंढरूं चोरणारासारखी केली," ह्मणून यानें पुढें फार गिल्ला केला. याला जे प्रश्न घातले त्यांचीं उत्तरें यानें कशीं धिटाईनें व निष्कपटपणानें दिलीं हें पाहूनच लक्षांत येईल कीं, एशियामध्यें तहाचीं बोलणीं करीत असतां कधीं कधीं यानें या ज्या दगलबाज्या केल्या त्या याच्या आंगच्या अगदीं नव्हेत. उमीचंद याला फसविण्यास यानें ज्या कल्पना चालविल्या होत्या त्या सर्व कबूल केल्या आणि तो धिटाईनें ह्मणाला कीं, "त्याविषयीं मला अगदीं लज्जा वाटत नाहीं व पुनः जर तसा प्रसंग येईल तर मी त्याचप्रमाणें वर्तेन." मीरजाफर याजवळून मीं पुष्कळ पैसा घेतला असें यानें कबूल केलें; परंतु असें कारण्यामध्यें मी कोणत्या प्रकारें अयोग्य किंवा अनीतीची गोष्ट केली असें मला वाटत नाहीं ह्मणून, त्यानें सांगितलें इतकेंच नाहीं; तर याच्या उलट मी विलक्षण प्रकारें निरिच्छ वागलों ह्मणून मी स्तुतीस पात्र आहें असें तो ह्मणूं लागला. याच्या या ह्मणण्यास कांहीं आधार होता खरा. आपला जय झाला तेव्हां मोठमोठ्या राजांची अवस्था मर्जी वाहील तशी आपण कशी करूं शकतों, एका श्रीमान् शहरांतील लोक लुटले जाऊं ह्मणून कसे भ्याले होते, मोठमोठाले श्रीमान् सावकार आपला शब्द झेलण्यास एकमेकावर कसा चढ टाकीत होते, सोन्यानें आणि रत्नांनीं भरले-

लीं भुयारें आपल्या एकट्यापुढें कशीं उघडून टाकि- लीं होतीं, या सर्व गोष्टी त्यानें खणखणीत रीतीनें व गौर- वानें कमिटीला सांगितल्या आणि अखेरीस असें ह्मटलें कीं, "अध्यक्ष महाराज, देवाची शपत. खरेंच ह्मणाल तर मीं किती थोडा पैसा घेतला हें पाहून माझें मलाच आज आश्चर्य वाटतें."

ही चौकशी इतकी चालली कीं, ती संपण्यापूर्वींच पार्लमेंताची एक बैठक संपली. दुसऱ्या वर्षी दुसऱ्या बैठकींत पुनः ती सुरू झाली; परंतु अखेरीस जेव्हां ती संपली तेव्हां निष्पक्षपाती व समंजस लो- कांना तिजवरून आपापल्यामध्यें याविषयीं अभिप्राय ठरविण्यास बहुत करून संशय पडला नाहीं. क्लैव यानें कांहीं अपराध केले होते हें उघड होतें. मनु- ष्या मनुष्याचा आणि राजा राजाच्या व्यवहार चाल- ण्यास कारणीभूत जे मोठे पवित्र नियम ते सर्व खोटे ह्मटल्याशिवाय तीं याचीं कृत्यें अपराध नाहींत असें ह्मणतां येत नाहीं; परंतु यानें कितीएक अपराध केले ही गोष्ट जशी उघड आहे, त्याचप्रमाणें यानें मोठी बुद्धि दर्शविली आणि मोठे सद्गुणही दर्शविले हेंही उघड आहे. यानें आपल्या देशाच्या आणि हिंदुस्थानच्या लोकांच्या मोठमोठ्या कामगिऱ्या बजावि- ल्या व त्यांविषयीं आतां ज्या शंका उत्पन्न झाल्या त्यांचा खरा प्रकार पाहिला असतां मीरजाफर गाजबरोबर जो यानें व्यवहार केला अथवा उमीचंदाशीं जी दग- लबाजी केली त्यावरून झाल्या नाहींत; परंतु पैशाचा लोभ आणि जुलूम हा बंद करण्यासाठीं तो जो

निकरानें भांडला त्याजवरूनच त्याच्याविषयीं शंका उत्पन्न झाल्या हें उघड आहे.

सामान्य फौजदारी न्यायामध्यें कैदीचा दोष ठरविण्यांत त्यानें केलेलीं सत्कृत्यें विलकूल जमेस येत नाहींत. एखादा यःकश्चित् गुन्हा असला तरी मी अमुक एक मोठें योग्य कृत्य केलें आहे ही सवब चालत नाहीं; परंतु ज्या मनुष्यांना सामान्य लोकांचीं बंधनें नसतात व जे सामान्य मोहापेक्षां अधिक मोहांत पडतात त्यांजवर सहल नजर करणें ती एरवींच्या प्रसंगापेक्षां जास्ती केली पाहिजे; यास्तव त्यांचा न्याय वर सांगिल्याप्रमाणें करणें योग्य नाहीं. त्यांविषयीं न्याय करणें तो त्यांच्या मागून होणारे लोक ज्याप्रमाणें करतील त्याप्रमाणें त्यांच्या वेळच्या लोकांनीं केला पाहिजे. त्यांच्या वाईट कृत्यांस चांगलें ह्मणावें असें तर नव्हे; परंतु चांगलीं व वाईट मिळून तीं सरासरी तुलना करून पाहावीं, आणि जर एकंदरींत चांगलें अधिक निघेल, तर केवळ सोडून देण्याचा हुकूम करावा, इतकेंच नाहीं; परंतु शाबासकीही द्यावी. जो न्यायाधीश तारतम्य सोडून एक दोनच अन्यायांच्या गोष्टींकडे लक्ष ठेवील त्याच्या कोर्टांत आजपर्यंत झालेल्या ज्या मोठमोठ्या राजांचीं वर्णनें आपण ऐकतों, त्यांतून एकही सुटून जाणार नाहीं. अशाच रीतीनें पाहूं गेलें असतां स्कातलंदाचें रक्षण करणारा ब्रूस, जर्मनीचें रक्षण करणारा मारिस, हालंदचें रक्षण करणारा विलियम, इंग्लंदाचें रक्षण करणारा त्याचा त्याच नांवाचा प्रख्यात वंशज, फ्रान्सचा चौथा हेनरी बादशाह, रशियाचा

पीतर धी ग्रेत बादशाह, इतालींतील कास्मो आणि स्कातलंदांतील राजाचें काम चालविणारा मरे यांतून उत्तम देखील पाहिला तर निष्कलंक मिळणार नाहीं. इतिहासामध्यें यापेक्षां दूरदृष्टि दिली पाहिजे आणि राजकीय कामांतील कृत्यांचा न्याय करण्यास जें कोर्त पुढील इतिहासकार काय ह्मणतील हें लक्षांत आणतें तेंच उत्तम.

सर्व पक्षांतील समंजस आणि सामदान मताचे मनुष्य यांनीं क्लैव याविषयींही असाच निर्णय केला. त्यांनीं त्याला निर्दोषी तर ठरविला नाहीं; परंतु ज्या हलक्या बुद्धीच्या आणि दीर्घद्वेषी अशा झुंडीनें आजपर्यंत त्याचा पाठलाग केला होता आणि तो मरेपर्यंत तसें करण्याची जिनें इच्छा बाळगिली होती तिच्या हातीं त्याला लागूं द्यावें अशी त्या समंजस मनुष्यांची मर्जी नव्हती. त्या वेळचा मुख्य प्रधान हा जरी विशेष याच्या पक्षाचा नव्हता, तरी याला अखेरीपर्यंत छळावें असा त्याचा हेतु नव्हता. यापूर्वी कांहीं वर्षें त्याला नैत आफ् दी बाथ ही पदवी मिळाली होती, आणि चौकशी चालली आहे तोंच आणखी एक पदवी मिळून त्याला शापशैर या प्रांताचा लार्द लेफतेनंत नेमिलें. या नेमणुकेच्या वेळीं तिसरा जार्ज राजा जो नेहमी त्याच्या पक्षाचा असे त्यास हा भेटला, तेव्हां त्यानें याजबरोबर हिंदुस्थानच्या कारभाराविषयीं वगैरे अर्धतास एकीकडे भाषण केलें. त्या वेळीं आपण पूर्वी कशी कामगिरी बजाविली व आतां आपला छळ कसा चालला आहे याची हकीकत राजास

सांगून त्याला क्लैव यानें असा कळवळा आणला कीं, तो त्या राजाच्या मुद्रेवर दृष्टोत्पत्तीस आला.

शेवटीं प्रतिनिधींच्या सभेमध्यें त्याजवर नियमित दोष आणले, तेव्हां दोन्ही पक्षांकडे मोठमोठे प्रख्यात धर्मशास्त्रवेत्ते व वजनदार प्रधान आणि शहाणे लोक होते. या वेळीं क्लैव यानें आपल्या तर्फेनें मोठ्या हिमतीनें आणि लोकांच्या मनावर ठसे असें भाषण केलें; परंतु तें पूर्वीपेक्षां थोडक्यांत संपविलें आणि याची शैली वगैरेही त्यापेक्षां कमीच होती. त्यानें आपण केलेलीं मोठमोठीं कृत्यें व आपणास झालेली छळणूक पार्लमेंताच्या कानावर घातली आणि आतां जो न्याय होणार तो केवळ माझ्याच अब्रूचा होणार असें नाहीं, तर तुमच्या सर्वांच्या अब्रूचा होणार ही गोष्ट लक्षांत ठेवा असें त्या सभेस सांगून तो तेथून निघून गेला.

नंतर प्रतिनिधींनीं ठरविलें कीं, राज्यांतील सेनेच्या मदतीनें जें जें प्राप्त झालें असेल तें सरकारच्या जमेस आलें पाहिजे आणि अशा प्रकारची प्राप्त झालेली मिळकत नौकरांना आपणाकडे घेण्यास अधिकार नाहीं. त्यांनीं आणखी असें ठरविलें कीं, बंगाल्यांतील कंपनीच्या लोकांनीं हा चांगला नियम कधींच पाळला नसावा असें दिसतें. पुढें एके दिवशीं त्यांनीं असें ठरविलें कीं, क्लैव हा हिंदुस्थानांतील ब्रितिश फौजेचा सेनाधिपति या नात्यानें जो अंमल चालवीत होता तेणेंकरून मीरजाफर याजवळून त्यानें पुष्कळ पैका घेतला. अशा प्रकारचे दोन ठराव त्यांनीं जरी केले, तरी त्यांपासून उत्पन्न होणारा जो तिसरा कीं, क्लैव

यानें आपल्या अमलाच्या बळानें गैरशिस्त वर्तणूक केली आणि तेणेंकरून सरकारी चाकरांस वाईट कित्ता घालून दिला, तो ते प्रतिनिधि मान्य करीनात. अखेरीस पुष्कळ आवेशानें सर्व रात्रभर वादविवाद होऊन सूर्योदयानंतर असा ठराव झाला कीं, क्लैव यानें इतक्या गोष्टी केल्या खऱ्या; तथापि आपल्या देशाची त्यानें मोठी व योग्य कामगिरी बजाविली. या ठरावास सभेपैकीं ना ह्मणणारा कोणी नव्हता. ही चौकशी स्मरणांत राहण्यासारखी झाली व पुष्कळ दिवस चालली. तिचा परिणाम असा झाला. हा सरासरी पाहिलें असतां प्रतिनिधींच्या न्यायदृष्टीस, तारतम्यास आणि नेमस्तपणास योग्य दिसतो.

यानंतर क्लैव याच्या संपत्तिसुखास आणि मानप्रतिष्ठेस कांहीं भय राहिलें नव्हतें. याच्या जवळ लोभ करणारे मित्र व नातलग जमले होते. याच्या मनाची व शरीराची हुशारी कमी होण्याचा काळ अझून आला नव्हता; परंतु फार दिवसांपासून त्याच्या बुद्धीवर काळिमा येत चालली होती. ती आतां तर अगदीं दाटून गेली. फार लहानपणापासून याला वरचेवर खिन्नता उत्पन्न होत असे. हा मद्रास येथें रैतर असतांच यानें आत्महत्या करण्याचा यत्न दोन वेळां केला होता; परंतु सदोदित उद्योग असल्यामुळें व बढती होत गेल्यामुळें याच्या आंगचा या रोगाचा विकार नाहींसा झाला होता. हिंदुस्थानांत असतां तो मोठमोठाल्या कारभारांत पडला होता आणि इंग्लंदांत गेल्यावर संपत्ति व पदवी यांचा उपभोग नुक्ताच घेऊं लागला होता.

त्यामुळें या त्याच्या मूळच्या रोगापासून त्यानें बराच टिकाव काढला होता; परंतु जशी संपत्तीचीं व मानप्रतिष्ठेची सुखें जुनीं झालीं व कांहीं उद्योग राहिला नाहीं आणि कांहीं आशाही राहिली नाहीं; तेव्हां जसें एकादें झाड भलत्याच हवेमध्यें नेऊन लाविलें असतां कोमेजतें आणि सुकतें त्याप्रमाणें याला कांहीं धंदा नसल्यामुळें याची चंचलवृत्ति मंदावून गेली. तशांत याच्या शत्रूंनीं याला मोठ्या हटवैरानें छळलें. याची चौकशी करण्यास जी कमेटी नेमिली होती तिनें याचा अपमान केला; पार्लमेंतानें याला टपका दिला, तो जरी क्षुल्लक होता तरी तो आपल्या देशांतील पुष्कळ लोक आपणास दुष्ट, निर्दय आणि जुलमी अंमलदार असें समजतात ही कल्पना; या सर्व कारणांवरून याची प्रकृति फार चेतवली आणि याची हुशारी नाहींशी होऊन गेली. तशांत याच वेळीं याला कांहीं अति दुःखदायक शरीरभोग झाला. तो पुष्कळ दिवसपर्यंत उष्णदेशामध्यें होता यामुळें त्याच्या आंगांत पुष्कळ दुःखकारक रोग भरले. या सर्व विपत्तींपासून दुःख होऊं नये ह्मणून त्यानें अफूशीं स्नेह केला; परंतु त्या दगलबाज दोस्तानें याला आपला गुलाम करून टाकिलें; तथापि अखेरीपर्यंत या काळोखांतूनही याची बुद्धि मधून मधून चमकत असे. असेंही ह्मणतात कीं, कधीं कधीं तो तासाचे तास लोटतपर्यंत स्वस्थ गुंगींत बसे आणि मग एकदम एकाद्या मोठ्या विषयावर वादविवाद करण्यास तयार होई. त्या वादामध्यें राज्यकारभारप्रकरणीं व लढाईप्रकरणीं

आपली पूर्ण बुद्धि दर्शवी आणि पुन्हा पूर्ववत्प्रमाणें दुःखी व मंद पडे. या वेळीं अमेरिकेबरोबर जो इंग्लंदाचा तंटा चालला होता तो लढाईशिवाय मोडत नाहीं असें दिसलें, ह्मणून क्लैव याला तिकडे त्या कामावर नेमावें असें प्रधानांच्या मनांत आलें होतें. यानें जेव्हां पाटणा येथील वेढा उठविला आणि गंगानदीच्या मुखाजवळील दच लोकांची फौज व आरमार ज्या वेळीं जमीनदोस्त करून टाकिलीं त्या वेळीं हा जसा होता त्याचप्रमाणें आतां असता तर यानें अमेरिकन लोकांची गडबड कदाचित् मोडून टाकिली असती आणि कधीं ना कधीं होणारी जी फूट ती कांहीं दिवसपर्यंत बंद पाडिली असती, असा अदमास केल्यास असंभव नाहीं; परंतु आतां ती वेळ निघून गेली होती. अनेक दुःखांनीं याची विशाळ बुद्धि त्वरित लयास चालली होती. अखेरीस यानें सन इसवी १७७४ च्या नोवेंबर महिन्यांत बाविसाव्या तारखेस आत्महत्या केली. त्या वेळीं त्याच्या वयाला नुक्तींच ४९ वर्षे होऊन गेलीं होतीं.

ज्या गृहस्थाचा इतका भरभराट झाला होता आणि ज्याला इतकी कीर्ति प्राप्त झाली होती त्याचा हा असा भयंकर परिणाम झाला हें पाहून सामान्य लोकांस असें वाटलें कीं, त्याविषयीं आपण जी कल्पना केली होती ती खरीच असावी व कितीएक खरे धार्मिक व विद्वान् होते तेही धर्म व ज्ञान यांचा उपदेश इतका विसरले कीं, अशी दुःखकारक गोष्ट होणें हा दुष्टबुद्धीचा परिणाम आणि ईश्वराकडून योग्य शिक्षा आहे असें समजले;

परंतु असा विशाळ कर्तृत्वाचा प्राणी अतितृप्ततेमुळें थकून गेला, मानहानीमुळें दुःख पावला आणि जबर रोगांनीं व त्याहीपेक्षां वाईट परिणाम करणाऱ्या जबर औषधांनीं भयाभंगास गेला, हें पाहून आमच्या मनामध्यें तर निराळेच उद्गार उत्पन्न होतात.

क्लैव याच्या हातून मोठाले दोष घडले त्यांचें स्वरूप बदलण्यास आह्मी यत्न केला नाहीं; परंतु याचे अपराध याच्या सद्गुणांशीं तोलून पाहिले असतां आणि याला अपराध करण्यास जे मोहाचे प्रसंग पडले ते लक्षांत आणले असतां पुढें होणारी जी संतति तिनें याची वाहवा करूं नये असें ह्मणण्यास कांहीं कारण दिसत नाहीं.

तो हिंदुस्थानांत प्रथम आल्यापासून इंग्लिश फौजेची एशियांत कीर्ति होऊं लागली. तो येण्याच्या पूर्वीं इंग्रज फक्त मालविके असे समजले जाऊन त्यांची हेळणा होत असे, आणि फ्रेंच लोक ह्मणजे जय मिळविण्यास व अंमल चालविण्यास योग्य असे समजले जाऊन त्यांना मान मिळत असे; परंतु क्लैव यानें आपल्या धैर्यानें व बुद्धीनें हा भ्रम उडवून टाकला. हिंदुस्थानामध्यें इंग्लिशांनीं जे फार दिवसपर्यंत जय मिळविले त्यांचा आरंभ यानें अर्काट किल्ल्याचा बचाव केला तेव्हांपासून झाला आणि गिझनी हस्तगत झाली तेव्हां त्यांची अखेरी झाली. तरुणांत आपल्या आंगीं सेनेचें आधिपत्य करण्याचा गुण आहे असें त्याला वाटलें. त्या वेळीं तो

केवळ २५ वर्षांचा होता हेंही आपणास विसरतां कामा नये. हा गुण जरी अद्वितीय नव्हे तरी विरळ खरा. आलेक्झांदर, कांदी व बारावा चार्लस यांनीं याहीपेक्षां लहान वयांत मोठमोठल्या लढाया मारून जय मिळविले खरे; परंतु त्यांच्या मदतीस मोठमोठाले अनुभवशीर व कौशल्याविषयीं प्रख्यात असे सरदार होते, तेव्हां वरील योद्ध्यांनीं मिळविलेले जे जय ते त्या सरदारांची बुद्धि ऐकल्यानें मिळविले असें मानलें पाहिजे. क्लैव हा केवळ गैरमाहीत मूल होता; परंतु त्याच्या हाताखालीं जे होते त्यांजपेक्षां त्याला विशेष अनुभव होता असें समजलें पाहिजे. आपणाला, आपल्या सरदारांना व आपल्या फौजेला शिकविणें हें सर्व याजवरच पडलें होतें. नेपोलियन बोनापार्त यानें मात्र याच्या इतक्या लहान वयांत याच्या इतकें लढण्याचें कौशल्य दाखविलें. याखेरीज क्लैव याजबरोबर तुलना करण्यास कोणी दिसत नाहीं.

क्लैव हिंदुस्थानांत दुसऱ्या खेपेस आल्यापासून या देशामध्यें इंग्लिश लोकांचें राज्यकारभारामध्यें महत्त्व चढलें. दुप्ली यानें जे कैक दिवसपर्यंत मनामध्यें मोठ्या डौलाचे बेत घोळवले होते त्यांच्याहीपेक्षां विशेष गोष्टी यानें आपल्या कौशल्यानें व दृढ निश्चयानें थोड्या महिन्यांत करून टाकिल्या. रोमच्या राज्यांतील जे मोठे पराक्रमी सर सुभेदार (प्रोकान्सल) त्यांतूनही कोणी त्या राज्यास इतका लागवड झालेला मुलूख, इतकी जमाबंदी व इतकी प्रजा मिळविली नाहीं

आणि त्यांतून कोणीही अशी संपत्ति लुटीनें मिळवून नेली नाहीं. रोमच्या अति मोठ्या कीर्तिमान् सरदारांनीं जी कीर्ति मिळविली व त्यांजवळ जी फौज होती तिची आणि क्लैव याच्या फौजेच्या कीर्तीच्या प्रकाशाची तुलना करून पाहिली असतां ती रोमन लोकांची कीर्ति केवळ अंधुक होऊन जाते.

क्लैव तिसऱ्या खेपेस हिंदुस्थानांत आला, तेंव्हांपासून इंग्लिशांच्या राज्याचा कारभार चोख व सत्यानें होऊं लागला. सन इसवी १७६५ सालमध्यें तो कलकत्त्यास आला. त्यापूर्वीं बंगालचें राज्य ह्मणजे तेथें इंग्लिश लोकांनीं जाऊन पाहिजे तें करून साधेल तितक्या थोड्या वेळांत मिळेल तितकी संपत्ति मिळविण्यासाठीं आहे असें मानलेलें होतें. त्या वेळीं जीं जिकडे तिकडे जुलूमजबरदस्ती व अन्याय होत असत तीं यानें प्रथम मोठ्या निर्भयतेनें व सर्वांशीं मोडून मोडून टाकिलीं. या लढाईमध्यें त्यानें शौर्यानें आपल्या सुखाची, कीर्तीची आणि विशाळ संपत्तीची परवा केली नाहीं. त्यानें लहानपणीं केलेले दोष लपविणें अथवा कमी करणें आमच्यानें ज्या न्यायबुद्धीनें होत नाहीं त्याच न्यायबुद्धीनें आह्मांला असें कबूल करणें अवश्य आहे कीं, पुढें जीं त्यानें चांगलीं कृत्यें केलीं तीं होंकरून त्या दोषांचा परिहार झाला. आतां कंपनीवरील आणि तिच्या नौकरांवरील दोष उडाला आहे. इतर ठिकाणीं परदेशीय लोकांचें राज्य ह्मटलें म्हणजे सर्व ओझ्यापेक्षां विशेष मोठें ओझें. तें स्वदेशीय राज्यापेक्षाही आतां हलकें झालें आहे व सरकारी चो-

रांची जी झुंड पूर्वी सर्व बंगालभर हाहाकार करून सोडी ती जाऊन तिच्या ठिकाणीं आतां हुशार आणि उद्योगी तसेच विश्वासु, निर्लोभी आणि राज्याच्या कल्याणाकडे लक्ष देणारे असे प्रख्यात कामगार झाले आहेत. या गोष्टींबद्दल जी स्तुति करणें योग्य आहे तींत क्लैव याचा वांटा लहान नाहीं, व याचप्रमाणें हिंदुस्थान ह्मणजे कंपनीच्या प्रत्येक बुभुक्षित कारभाऱ्याला अपार संपत्ति मिळविण्याची जागा असें जें होतें, त्या देशांतून मनरो, एल्फिन्स्तन, मेतकाफ वगैरे कामगार आपल्या इच्छेप्रमाणें राजांस पदच्युत करून अथवा गादीवर बसवून परत जाऊन आपल्या गरीबपणाची बढाई सांगतात व त्यांबद्दल लोक त्यांस माना डोलवितात, असें ज्या शिस्तीपासून झालें आहे तिजसाठीं जी प्रशंसा करणें जरूर आहे तींत क्लैव याचा हिस्सा मोठा आहे. आजपर्यंत जगांत जे विजयी होऊन गेले त्यांच्या यादीमध्यें याचें नांव वरच्या प्रतीस आहे. शिवाय हें त्यांच्या यादीमध्यें आहे इतकेंच नाहीं; तर ज्यांनीं मनुष्यमात्राच्या सुखाकरितां आजपर्यंत बहुत श्रम घेतले व दुःख भोगिलें त्यांची जी वरील यादीपेक्षां उत्तम याद तिजमध्येंही आहे. याच्या युद्धकौशल्यावरून याला लकलस आणि त्रेजन यांची बरोबरी इतिहासकारांकडून मिळेल, आणि फ्रान्स देशामध्यें तरगो याचें स्मरण झालें असतां जो त्याला लोक मान देतात आणि लार्द विलियम बेन्तिक याचा पुतळा पाहून पुढील होणारी जी हिंदूची संतति त्याला मान देईल, त्या प्रकारचा कांहीं तरी मान क्लैव

यास त्याच्या सुधारणुकेच्या कृत्यांवरून मिळाल्यावांचून राहणार नाहीं अशी आमची खातरी आहे.

समाप्त.

BHJ